couch puffy
THE BIG MONSOON SALE
FLAT 50% OFF
ON DISPLAY / LAST PIECE
BUY 1 GET 1 FREE On Home Decor
85, ड्रिमलँड, ... अमरावती | 99300-94691 8585-9552-85

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
✦ अमरावती, शनिवार ११ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

पूनम इलेक्ट्रॉनिक्स & फर्निचर
COMPANY DEALER ALSO AVAILABLE
SAMSUNG Godrej Panasonic LG Haier INTEX
मोती नगर, अमरावती. 0721-2540397 | 99216-02388

## बळीराजाला मोठा दिलासा! 50 हजार भरण्याची अट रद्द

# 56 लाख शेतक-यांना 36 हजार 585 कोटींचा लाभ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील कर्जबाजारी शेतक-यांसाठी राज्य सरकारने पावसाळी अधिवेशनात मोठा आणि महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतक-यांना स्वतःकडून ५० हजार रुपये भरण्याची अट सरकारने पूर्णपणे रद्द केली आहे. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतक-यांना मोठा दिलासा मिळणार असून, कर्जमुक्ती योजनेची व्याप्तीही मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत कर्जमुक्ती योजनेची सविस्तर माहिती देताना विरोधकांकडून करण्यात येत असलेल्या आरोपांना आकडेवारीसह उत्तर दिले. या योजनेचा केवळ ३६ लाख शेतक-यांना फायदा होईल आणि प्रत्यक्ष कर्जमाफीचा लाभ केवळ १२ ते १३ हजार कोटी रुपयांचा असेल, हा दावा चुकीचा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. राष्ट्रीयकृत बँका, व्यापारी बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांकडून संकलित करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार, या कर्जमुक्ती योजनेचा राज्यातील तब्बल ५६ लाख शेतक-यांना फायदा होणार आहे. या शेतक-यांना एकूण ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ मिळणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**प्रवीण परदेशी समितीच्या शिफारशींचा अभ्यास-** शेतकरी कर्जमाफीच्या विविध पैलूंचा अभ्यास करण्यासाठी राज्य सरकारने प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. वारंवार कर्जमाफी जाहीर केल्यास नियमित कर्जफेडीच्या संस्कृतीवर परिणाम होउ शकतो, शेतकरी कर्जाची परतफेड करण्याबाबत उदासीन होउ शकतात आणि त्याचा बँकिंग व्यवस्थेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे, अशी चिंता समितीने व्यक्त केली होती. त्यामुळे पूर्वीच्या कर्जमाफी योजनेचा लाभ घेतलेल्या शेतक-यांना नव्या योजनेचा लाभ देताना त्यांनी काही रक्कम स्वतः भरावी, अशी अट सुचविण्यात आली होती. त्यानुसार ५० हजार रुपये भरण्याची अट चर्चेत आली होती. मात्र, महायुतीच्या आमदारांनी या अटीला तीव्र विरोध केला. आर्थिक अडचणीत असलेल्या शेतक-यांना ५० हजार रुपये भरणे शक्य होणार नाही आणि त्यामुळे अनेक गरजू शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहण्याची शक्यता असल्याचे आमदारांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर व्यापक शेतकरी हिताचा विचार करून सरकारने ही अट पूर्णपणे रद्द करण्याचा निर्णय घेतला.

**तिजोरीवर ३ ते ४ हजार कोटींचा अतिरिक्त भार-** ५० हजार रुपयांची अट रद्द केल्यामुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर सुमारे ३ ते ४ हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडण्याची शक्यता आहे. मात्र, आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतक-यांना दिलासा देणे आणि त्यांना पुन्हा संस्थात्मक कर्जव्यवस्थेत आणणे अधिक महत्त्वाचे असल्याची भूमिका सरकारने (पान २ वर)

## दादांच्या विमान अपघात प्रकरणाची फडणवीसांनी विधानसभेत दिली माहिती



अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी एक प्राथमिक अहवाल आपल्यासमोर आणलेला आहे. यासंदर्भात केंद्र सरकारशी चर्चा केली. हा सगळा अहवाल किती दिवसांत अपेक्षित आहे, याबाबत संबंधित मंत्रालय आणि मंत्र्यांना विचारले. यावर, त्यांनी सांगितले की, साधारणपणे जानेवारी पूर्वी अंतिम अहवाल येईल, अशी माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. अंतिम आठवडा प्रस्तावावर बोलताना मुख्यमंत्री फडणवीस यांनी अनेक मुद्द्यांना सविस्तर उत्तरे दिली. अंतिम आठवडा प्रस्तावात माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या विमान अपघात प्रकरणी चर्चा झाली. अजित पवार यांच्या संदर्भात घटना घडली, ते आपल्यातून निघून गेले. दोन प्रकारे तपास सुरू आहे. एक म्हणजे सीआयडी तपास करत आहे आणि दुसरे म्हणजे एएआयबी तपास करत आहे. एएआयबीचा अहवाल महत्त्वाचा आहे, (पान २ वर)

## कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम; गुन्हे सिद्धतेच्या दरात वाढ

### सायबर गुन्ह्यांवर प्रभावी नियंत्रण

**मुंबई :** कायदा व सुव्यवस्था, सायबर गुन्ह्यांवरील नियंत्रण, अमली पदार्थांविरोधातील कारवाई, पोलीस आधुनिकीकरण, जलसंपदा, कृषी आणि विविध विकासकामांबाबत शासनाने केलेल्या उपाययोजनांची माहिती सभागृहात दिली. कृषी क्षेत्रासाठी राज्य शासन दरवर्षी सुमारे ९५ हजार कोटी रुपयांचा खर्च करीत असल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतक-यांच्या वीजबिलासाठी २५ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. कापसाची १३६ लाख क्विंटल खरेदी करून १० हजार ८८३ कोटी रुपयांचे चुकारे अदा करण्यात आले आहेत. सोयाबीनचे ६ लाख टन उत्पादन ३ हजार १९८ कोटी रुपयांना खरेदी करण्यात आले, तर कांदा खरेदीमुळे बाजारभाव स्थिर राहण्यास मदत झाली आहे. ठिबक सिंचनासाठी प्रलंबित २१७ कोटी रुपये (पान २ वर)

# सरन्यायाधीशांना शिवीगाळ, न्यायाधीशांच्या दिशेने कागद फेकले

## सर्वोच्च न्यायालयात याचिकाकर्त्याचा राडा



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर बूट भिरकावल्याच्या घटनेनंतर पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाच्या कोर्ट रुममध्ये गोंधळ झाला आहे. शुक्रवारी एका याचिकाकर्त्याच्या याचिकेवर सुनावणी सुरू असताना याचिकाकर्त्याने न्यायाधीशांच्या दिशेने कागद भिरकावले आणि सरन्यायाधीशांबद्दल अश्लील शिवीगाळ केली. याचिकाकर्त्याचा बदललेला नूर पाहून सुरक्षा रक्षकांनी त्याला तात्काळ बाहेर काढले, त्यामुळे पुढील अनुचित प्रकार टळला. शुक्रवारी न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या खंडपीठासमोर प्रबल प्रताप नावाच्या याचिकाकर्त्याच्या याचिकेवर सुनावणी सुरू होती. खंडपीठासमोर हजर होताच न्यायाधीशांनी विचारले, तुम्ही स्वत? पक्षकार आहात का? श्री प्रबल प्रताप? यावर होकारार्थी उत्तर देत याचिकाकर्त्याने खंडपीठालाच आदेश देण्यास सुरुवात केली. याचिकाकर्ता म्हणाला, माननीय न्यायिक सेवक, मी तुम्हाला आदेश देतो की, तुम्ही लखनौच्या विकासनगर येथील जिल्हा पोलीस अधीक्षकांविरोधात एफआयआर दाखल करण्याचो आदेश द्यावेत. याचिकाकर्त्याच्या या अजब कथनावर न्यायमूर्ती विश्वनाथन म्हणाले की, तुम्ही मला आदेश देत आहात? तुम्ही मला आदेश देत आहात? न्यायाधीशांच्या प्रश्नावरही याचिकाकर्ता पुढे बोलत राहिला. त्याने एका कंपनीचे नाव घेउन ती देशभरात सायबर क्राइमची टोळी चालवत असल्याचा आरोप केला. त्यानंतर तो पुढे म्हणाला, माझ्याकडून इतकेच. फाईलच्या १५५ पानांमध्ये सर्व काही माहिती नमूद आहे. यानंतर अचानक त्याने फाईलमधून कागदपत्रांचा गठ्ठा बाहेर काढला आणि माझ्याकडे ही काही कागदपत्रे आहेत, असे सांगून ती हवेत उडवली. ही कागदपत्रे सरन्यायाधीशांना द्यावीत, असे सांगून त्याने शिवीगाळही केली. मागच्या वर्षीय (पान २ वर)

## राजपाल यादव पुन्हा जेलमध्ये जाणार



**नवी दिल्ली :** बालिवूडमधील लोकप्रिय अभिनेते आणि विनोदी कलाकार यांना दिल्ली उच्च न्यायालयाकडून मोठा कायदेशीर धक्का बसला आहे. चेक बाउन्सशी संबंधित सात प्रकरणांमध्ये कनिष्ठ न्यायालयाने सुनावलेली दोषसिद्धी आणि तीन महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा उच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. राजपाल यादव यांनी दाखल केलेल्या पुनर्विचार याचिका न्यायालयाने फेटाळल्याने त्यांच्यासमोरील कायदेशीर अडचणी वाढल्या आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाच्या निर्णयामुळे राजपाल यादव यांना पुन्हा कारावासाला (पान २ वर)

## शिक्षकाने अभ्यासाकरिता रागावणे म्हणजे विद्यार्थ्याला आत्महत्येस प्रवृत्त करणे नव्हे

### नागपूर उच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय



**नागपूर/प्रतिनिधी :** शिक्षकाने अभ्यास किंवा शिस्तीकरिता रागावणे म्हणजे विद्यार्थ्याला आत्महत्येस प्रवृत्त करणे नव्हे, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाचे न्यायमूर्ती महेंद्र चांदवाणी यांनी बुलडाणा जिल्ह्यातील एका प्रकरणामध्ये दिला आहे. तसेच, संबंधित शिक्षकाविरोधातील गुन्हा अवैध ठरवून रद्द केला आहे. गोपाल सूर्यवंशी, असे शिक्षकाचे नाव असून ते लखनवाडा, खामगाव येथील रहिवासी आहेत. ही घटना १ जुलै २०२५ रोजी नांदुरा तालुक्यातील वासाडी (बु.) येथील जय बजरंग शाळेत घडली.

**वर्गात नेमके काय घडले होते?-** शिक्षकाने वर्गात शिकवत असताना विद्यार्थी विवेकला विज्ञानातील एका संकल्पनेची व्याख्या विचारली. विवेकला त्याचे उत्तर देता आले नाही. त्यामुळे शिक्षकाने त्याला १०० उठाबशा काढायला सांगितल्या. विवेकने २०-२५ उठाबशा काढल्यानंतर पायाला दुखापत असल्याचे सांगत अधिक उठाबशा काढण्यास नकार दिला. (पान २ वर)

## एफडीएची मोठी कारवाई

# 22 लाखांचा गुटखा जप्त



**बुलढाणा/प्रतिनिधी :** आयुक्ततुकाराम मुंढे यांच्या नेतृत्वाखालील अन्न औषध प्रशासन ( एफडीए ) च्या पथकाने बुलढाणा जिल्हा व मध्यप्रदेश राज्याच्या सीमावर्ती भागात मोठी कारवाई केली आहे. बुलढाणा जिल्ह्याच्या सीमेवरील जळगाव जामोद येथील निमखेडी वन विभाग तपासणी नाक्यावर आज शुक्रवारी उत्तररात्री अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने ही धाडसी कारवाई केली. या बृहत कारवाईत तब्बल २२ लाख ३७ हजार रुपयांचा प्रतिबंधित सुगंधी गुटखा व पानमसाला जप्त करण्यात आला आहे. मात्र पथकाने मोठा साठा जप्त केला असला तरी या अवैध गुटख्याची वाहतूक करणारा वाहन चालक एफडीए पथकाच्या हातावर तुरी देउन पसार होण्यात यशस्वी झाला आहे. यामुळे या मोठ्या कारवाईला किंचित गालबोट लागले आहे.

**निमखेडी वन नाक्यावर उत्तररात्री रंगला थरार-** आज या मार्गाने मोठ्या साठ्याची वाहतूक होणार असल्याची टिप अन्न औषध प्रशासन विभागाला मिळाली होती. मिळालेल्या खात्री लायक माहितीवरून आज शुक्रवारी १० जुलै २०२६ रोजी उत्तररात्री अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वसावे यांच्या नेतृत्वाखालील एफडीए च्या पथकाने निमखेडी नाक्यावर नाकाबंदी केली होती. तपासणी दरम्यान टाटा इंट्रा गोल्ड या वाहनाला अडवून तपासणी करण्यात आली. यावेळी शासनाने प्रतिबंधित केलेला गुटख्याचा मोठा साठा आढळून आला.

**चालक फरार-** मात्र या कारवाईदरम्यान गाडीचा चालक पोलिसांना चकवा देउन फरार झाला आहे. या कारवाईमध्ये पानमसाला १० लाख ३९ हजार ५०० रुपयांचे ११,५५० पाकिट्स, ६ लाख ९३ हजार रुपयांचे ११,५०० पाकिट्स, ५ लाख रुपयांचे टाटा इंट्रा गोल्ड वाहन,५ हजार रुपये किमतीचा मोबाईल असा एकूण किंमत २२ लाख ३७ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. फिर्यादी अन्न सुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वसावे यांच्या तक्रारीवरून जळगाव जामोद पोलीस ठाण्या मध्ये फरार चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता -२०२३ च्या कलम २२३, २७४, २७५, १२३ आणि अन्न सुरक्षा मानके कायदा २००६ च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास ठाणेदार सचिन बागुल यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश कायंदे करत आहेत.

**मकोका लावण्याची मागणी-** दरम्यान या प्रकरणातील मुख्य सूत्रधाराचा शोध घेउन त्याच्यावर मकोका अंतर्गत (पान २ वर)

## दीड वर्षांच्या चिमुरड्याला 27 सेकंदात 8 वेळा रस्त्यावर आपटून मारले

# आरव हत्याकांडातील दोषीला फाशीची शिक्षा!



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** काही गुन्हे आणि त्यातील क्रूरता केवळ एका जिवाचा अंत झाला म्हणून मानवी मनाला घाबरवत नाही, तर त्यामागील अमानुषता पाहून संपूर्ण समाज सुन्न होतो. उत्तर प्रदेशातील फिरोजाबाद येथील दीड वर्षांच्या निष्पाप आरवच्या हत्येने संपूर्ण देशाला हादरवून सोडले होते. एकतर्फी प्रेमात अंध झालेल्या एका नराधमाने ज्या चिमुरड्याला अजून नीट बोलताही येत नव्हते, त्याला आपल्या रागाचा बळी बनवले. या हत्याकांडात जिल्हा व सत्र न्यायालयाने ऐतिहासिक निकाल देत दोषी विराज उर्फ जितेंद्र पाठक याला फाशीची शिक्षा सुनावली आहे. अवघ्या ४० दिवसांत न्यायालयाने हा खटला निकाली काढला आहे.

**एकतर्फी प्रेम आणि लग्नाला नकार ठरला कारण**

अरांव परिसरातील रहिवासी असलेल्या रती देवी यांचा विवाह २०२४ मध्ये बदायू येथील सुमित कुमार याच्याशी झाला होता. मात्र, संसारात वाद वाढल्याने रती गेल्या पाच महिन्यांपासून आपल्या दीड वर्षाचा मुलगा आरव याच्यासह माहेरी राहत होती. याच दरम्यान पती सुमितचा नातेवाईक जितेंद्र पाठक हा रती यांच्या संपर्कात आला. सुरुवातीला मदतीचा आणि आधाराचा बहाणा करत त्याने रतीशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केला. काही दिवसांतच जितेंद्रने रतीसमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला. मात्र, रतीने त्याला स्पष्ट शब्दांत नकार दिला. पोलिसांच्या तपासानुसार, जितेंद्रला हा नकार (पान २ वर)

## वाशीम जिल्हा न्यायालयाने दिले टोलप्लाझा जप्तीची आदेश



**वाशीम/प्रतिनिधी :** राष्ट्रीय महामार्गासाठी शेतक-याकडून भूसंपादन कमी दरात केल्याप्रकरणी वाशीम जिल्हा न्यायालयाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचा पथकर नाका जप्तीचे आदेश दिले आहेत. या प्रकरणात जप्तीची प्रक्रिया करून पथकर नाक्यावर न्यायालयाचा वारंट चिटकवण्यात आला. दवंडीद्वारे पथकर नाका जप्तीची कारवाई केल्याचे जप्ती अधिकारी जितेंद्र नेमाने यांनी शुक्रवारी जाहीर केले. दरम्यान, प्राधिकरणाच्या अधिका-यांनी आता शेतक-यांना नुकसान भरपाई देण्याची तयारी दर्शवल्याची माहिती आहे. राष्ट्रीय महामार्ग क. १६१ वर बेबीताई दिनकर गर्जे व त्यांचा मुलगा विठ्ठल दिनकर गर्जे यांची मौजे जांभरूण नावजी येथील राज्य महामार्ग ५१ वाशीम ते रिसोड लगत असलेले गट नं. ५५, ५६, ५७ मध्ये जमीन होती. ही जमीन अकृषक (पान २ वर)

सबसे सस्ते 3 दिन
दि. 09 10 11 जुलै
गुरूवार | शुक्रवार | शनिवार
फ्रेश स्टॉक
डायरेक्ट फॅक्टरी सेल
आराधना®
होलसेल शॉपिंग मॉल
बनारसी शालू • डिझायनर साड्या • घाघरा ओढनी • सलवार सुट
ड्रेस मटेरियल • रेडीमेड कोट • सुटिंग-शर्टिंग • टिनेज वेअर • किड्स वेअर
फॅशन | ज्वेलरी | चिल्ड्रेन्स वेअर | शूज व सॅंडल | होम डेकोर | मॅचिंग
जवाहर रोड, अमरावती. ✆ 2574594
L -2, बिझीलॅण्ड, नांदगावपेठ, अमरावती.

# देशात वर्षभरात 4,791 शाळांना टाळे

## दररोज सरासरी 13 शाळा बंद, उच्च शिक्षणात मात्र मुलींची आघाडी





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था ::** देशाच्या शिक्षण व्यवस्थेचे दोन परस्परविरोधी चित्र समोर आले आहे. एका बाजूला शालेय शिक्षण व्यवस्थेत शाळांची संख्या कमी होत असून २०२५-२६ या एका शैक्षणिक वर्षात देशभरातील तब्बल ४ हजार ७९१ शाळा बंद झाल्या आहेत. म्हणजेच देशात दररोज सरासरी १३ शाळा बंद झाल्याचे चित्र आहे. दुसरीकडे, उच्च शिक्षण क्षेत्रात विद्यार्थ्यांची नोंदणी वाढत असून विशेषतः मुलींच्या सहभागात लक्षणीय वाढ नोंदवण्यात आली आहे. शालेय शिक्षणाशी संबंधित एकात्मिक जिल्हा शिक्षण माहिती प्रणालीतील आकडेवारी आणि उच्च शिक्षणासंदर्भातील ऑल इंडिया सर्व्हे ऑन हायर एज्युकेशनच्या आकडेवारीतून देशातील शिक्षण व्यवस्थेतील हे बदलते चित्र समोर आले आहे. विशेष म्हणजे, उच्च शिक्षणातील एकूण नोंदणी प्रमाणाने प्रथमच ३० चा टप्पा गाठल्याचे अहवालातील आकडेवारीतून दिसून येते.

**२०२५-२६ मध्ये ४,७९१ शाळा कमी-** उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात देशात एकूण १४ लाख ७१ हजार ४७३ शाळा होत्या. मात्र २०२५-२६ मध्ये ही संख्या घटून १४ लाख ६६ हजार ६८२ झाली. त्यामुळे एका वर्षाच्या कालावधीत देशातील शाळांची संख्या ४ हजार ७९१ ने कमी झाल्याचे दिसते. ही आकडेवारी दिवसांच्या प्रमाणात पाहिल्यास देशात दररोज सरासरी १३ शाळा कमी झाल्याचे चित्र समोर येते. काही राज्यांमध्ये शाळांची संख्या मोठ्या प्रमाणावर घटली आहे. यामध्ये मध्य प्रदेशातील आकडेवारी सर्वाधिक लक्षवेधी आहे.

**मध्य प्रदेशात सर्वाधिक शाळा बंद-** देशातील शाळांच्या संख्येत झालेल्या एकूण घटीमध्ये मध्य प्रदेशाचा मोठा वाटा असल्याचे आकडेवारीत दिसते. देशात कमी झालेल्या एकूण ४,७९१ शाळांपैकी २,४२६ शाळा मध्य प्रदेशातील असल्याचे नमूद करण्यात आले आहे. त्यानंतर तेलंगणामध्ये १,३९२, पश्चिम बंगालमध्ये ५६८, आंध्र प्रदेशमध्ये ४७४, तामिळनाडूमध्ये ३६९, कर्नाटकमध्ये २८१ आणि हिमाचल प्रदेशमध्ये २६६ शाळांची संख्या कमी झाल्याचे आकडेवारीतून समोर आले आहे. शाळांची संख्या कमी होण्यामागे विद्यार्थी संख्या घटणे, शाळांचे एकत्रीकरण, लोकसंख्येचे स्थलांतर, ग्रामीण भागातील बदलते लोकसंख्या प्रमाण आणि शैक्षणिक व्यवस्थेतील पुनर्रचना अशा विविध बाबींचा संबंध असू शकतो. मात्र प्रत्येक राज्यातील परिस्थिती वेगळी असल्याने राज्यनिहाय कारणांचा स्वतंत्र अभ्यास आवश्यक ठरणार आहे.

**विद्यार्थी नसलेल्या शाळांची संख्या घटली-** शाळांची एकूण संख्या कमी होत असतानाच एक दिलासादायक बाबही समोर आली आहे. देशातील शून्य पटसंख्या असलेल्या, म्हणजे (पान २ वर)

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय


## पान १ व १० वरून

### 'एटीएस'ची अकोल्यातही धडक

संपर्काचीही कसून पडताळणी केली जात आहे.तपास यंत्रणांच्या प्राथमिक माहितीनुसार, पाकिस्तानस्थित शहजाद भट्टीचे कथित नेटवर्क सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतातील काही तरुणांशी संपर्क साधत असल्याचा संशय आहे. मोठ्या पैशांचे आमिष, परदेशातील संधी आणि आलिशान जीवनशैलीची स्वप्ने दाखवून काही युवकांना कथित गुन्हेगारी जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न होत असल्याचा तपासाचा प्राथमिक अंदाज आहे.

### ६७ कोटींच्या बडनेरा

असा सवाल उपस्थित होत असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा वाद आणखी चिघळण्याची चिन्हे आहेत. दरम्यान, या प्रकरणावर खासदार बळवंत वानखडे किंवा आमदार प्रवीण पोटे-पाटील यांची अधिकृत प्रतिक्रिया अद्याप समोर आलेली नाही. मात्र बडनेरा उड्डाणपुलाच्या लोकार्पणापूर्वीच श्रेयवादाच्या राजकारणाने वातावरण चांगलेच तापले आहे.

### अचलपुरात बल्लू जवंजाळ

आमदार बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त प्रहार-शिवसेना जनसंपर्क कार्यालयाजवळ महेंद्र उर्फ बल्लू जवंजाळ यांच्या शुभेच्छांचे बॅनर लावण्यात आले होते.दरम्यान ९ जुलै रोजी मध्यरात्री १२.५५ ते १२.५८ या वेळेत चेहऱ्यावर कापड बांधलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी संबंधित बॅनरवर काळे फासून तेथून पलायन केले. ही संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असल्याची माहिती समोर आली आहे . यात एक संशयित व्यक्ती घटना मोबाईलवर चित्रित करत असल्याचेही दिसून येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. प्रहार संघटना व शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी हा प्रकार राजकीय द्वेषातून घडवून आणल्याचा आरोप केला असून, यामुळे शहरातील शांतता व कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो, असे ही त्यांनी म्हटले आहे. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित आरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच या प्रकरणात तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेने दिला आहे.यावेळी माजी नगरसेवक संजय तट्टे, बंडू घोम , मनोज नंदवंशी, माणिक देशपांडे,नितीन आखुड ,बंटी ककरानिया,सचिन वाडेगावकर, अश्फाक खान, प्रीतेश अवघड ,मनीष डांगे, आतिश अहिर, विवेक महल्ले, राम बघेल,अनंत हरणे, हर्ष गुप्ता,प्यारेलाल प्रजापती, विजय थावाणी, मोहन ठाकूर, भास्कर मासूदकर, जे.डी वानखेडे, मो. बाकीर यांच्यासह प्रहार संघटना व शिवसेनेचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

### चेक अनादर प्रकरणी

विरुद्ध गुन्हा सिद्ध झाला. त्यामुळे न्यायालयाने आरोपीला तीन महिन्याची शिक्षा सुनावली आहे. सोबतच २ लाख ४० हजार रुपये दंडाचा आदेश करण्यात आला आहे. ही दंडाची रक्कम न भरल्यास एक महिना अधिकची शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणात ॲड. सतीश भंडारी यांनी काम पाहिले होते. त्यामुळे चेक देऊन उसनवारी घेणाऱ्यांचे या आदेशामुळे धाबे दणाणले आहे.

### ऑनलाइन चक्री जुगारावर

शहरातील अवैध धंद्यांविरोधात प्रभावी मोहीम राबविण्याचे आदेश दिल्यानंतर पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने ही कारवाई केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल वर यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे यशोदा नगरातील 'अरमान ट्रेडर्स' या दुकानावर छापा टाकण्यात आला. तेथे 'फन टार्गेट' आणि 'गोल्डन चान्स' या वेबसाईटच्या माध्यमातून पैशांची देवाणघेवाण करून अवैध ऑनलाइन चक्री जुगार सुरू असल्याचे आढळून आले. छाप्यावेळी दोन जण जुगार चालविताना, तर तीन जण जुगार खेळताना आढळून आले. त्यांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून रोख रक्कम, ऑनलाइन जुगारासाठी वापरण्यात येणारे साहित्य आणि मोबाईल असा एकूण १ लाख ६६ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या कारवाईत अरमान संतोष पाल (२१, रा. यशोदा नगर), संतोष रघुनाथ पाल (४५, रा. यशोदा नगर), सुमित अवधूत खिराडे (३३, रा. बेनोडा), यश पुरुषोत्तम लाडुकर (२२, रा. किरण नगर) आणि सतीश प्रकाश पोजगे (३०, रा. यावली शहीद, ता. तिवसा) यांना ताब्यात घेण्यात आले.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे, प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त कैलास पुंडकर यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक अतुल वर यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस उपनिरीक्षक गजानन सोनुने तसेच गुन्हे शाखा युनिट-२च्या पथकाने केली.

### 'संवाद तरुणाईशी'तून तरुणांना

अमरावती येथे उपलब्ध आहेत. तसेच दैनिक मतदार ,दैनिक जनमाध्यम, दैनिक मंडल,दैनिक मातृभूमी,दैनिक हिंदुस्थान या ठिकाणी देखील पासेस उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत शहर व जिल्ह्यातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवार, पालक आणि युवकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन तुकाराम मुंढे यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

### बांधकामाधीन घरातील वायर

चौकशीदरम्यान त्याने चोरीची कबुली दिली. चोरी केलेल्या वायर जाळून त्यातील सुमारे चार किलो तांब्याची तार तयार केल्याचेही त्याने सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडून सुमारे ८ हजार रुपये किमतीची तांब्याची तार तसेच गुन्ह्यात वापरण्यात आलेली एमएच-२७-सीडब्ल्यू-१४५७ क्रमांकाची ऑटोरिक्षा जप्त केली. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत १ लाख ५८ हजार रुपये आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त निलेश ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, पोलीस निरीक्षक विजया पंधरे, पोलीस निरीक्षक प्रमोद पाचकवडे, उपनिरीक्षक सागर ठाकरे तसेच गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने केली.

### दर्यापूर जिल्हा वकील संघ

चौरपगार , ॲड. पवन प्रभे,ॲड.रूपाली आठवले, ॲड.कृपाली आठवले, ॲड. श्रुतिका कोरडे, ॲड.सम्राट चौरपगार,ॲड.अंकुश गावंडे, ॲड.संदीप मानकर, ॲड.विनोद शिरसाट यांनी परिवर्तन पॅनलच्या उमेदवाराच्या विजयासाठी परिश्रम घेतले होते. सुरुवातीपासूनचे प्रचारात परिवर्तन पॅनलने आघाडी घेतली होती. परिवर्तन पॅनलने विजयाचा कुठलाही गाजावाजा न करता समता पॅनलच्या पराभूत उमेदवारांना सोबत घेऊन विजयाचा आनंद अगदी साध्या पद्धतीने साजरा केला.

### जिल्ह्यातील उद्योगांना अखंडित

करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी अधीक्षक अभियंत्यांना यावेळी दिल्या.उद्योजकांना महावितरणकडून वीज देयके नियमित तारखेला प्राप्त न झाल्याने, तसेच बिल भरूनही चुकीच्या कार्यपद्धतीमुळे 'प्रॉम्प्ट पेमेंट' अनुदान योजनेचा लाभ मिळत नसल्याची तक्रारही यावेळी करण्यात आली. यावर तोडगा म्हणून महावितरणने दरमहा १० तारखेपर्यंत उद्योजकांना वीज देयके उपलब्ध करून द्यावीत, जेणेकरून त्यांना शासकीय अनुदान योजनेचा लाभ मिळेल, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच उद्योजकांच्या अडीअडचणींचे नियमित निवारण करण्यासाठी दर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात बैठक आयोजित करण्याचे आदेश जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापकांना देण्यात आले.

### 'भाजपात या, मगच जिम

समितीचे गटविकास अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चांदूरवाडी येथील सार्वजनिक समाजमंदिरामध्ये गावातील युवकांसाठी जिमची सुविधा उपलब्ध आहे. मात्र, उपसरपंच अब्दुल शहजाद उर्फ सानू हे जाणूनबुजून काही युवकांना व त्यांच्या मुलांना जिमचा वापर करू देत नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. निवेदनानुसार, संबंधित नागरिकांच्या मुलांनी, युवकांनी जिममध्ये जाण्याचा प्रयत्न केल्यास त्यांना उपसरपंच शेख सोनू जाणूनबुजून हेतूपुरस्पर मनाई करीत असल्याचा आरोप करण्यात आला. एवढेच नव्हे तर, 'तुम्ही भाजपाचे नाही. जोपर्यंत भाजपामध्ये येत नाही, तोपर्यंत तुम्हाला आणि तुमच्या मुलांना जिम वापरू देणार नाही,' असे सांगितले जात असल्याचाही गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

सार्वजनिक सुविधा ही सर्व गावकऱ्यांसाठी समान असतांना तिचा वापर राजकीय भूमिका किंवा पक्षनिष्ठेच्या आधारावर रोखणे हे अन्यायकारक असल्याचा आरोप गावकऱ्यांकडून करण्यात आला आहे. या प्रकारामुळे गावात भविष्यात वाद-विवाद निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, अशी भीतीही ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून समाजमंदिरातील जिम सर्वांसाठी खुली करावी, कोणत्याही प्रकारचा राजकीय भेदभाव थांबवावा आणि गावातील शांतता व सलोखा कायम ठेवण्यासाठी आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यावेळी लखन शेळके, सोनू सैय्यद, लियाकत शाह, रितेश श्रीरामे, राहुल शेळके, कलाम शाह, संतोष शेळके, गुलफाम शाह, रुशीकेश राऊत, किशोर केने, कैलाश शेळके, शंकर शेळके, सुनील मैहीद, फिरोज शाह, प्रवीण माताडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

### अमरावतीच्या 'आयुष'

चिकित्सा पद्धतींचा लाभ एकाच छताखाली मिळण्यासाठी या रुग्णालयाची मंजुरी अत्यंत महत्त्वाची आहे. या ५० खाटांच्या प्रस्तावित रुग्णालयासाठी आवश्यक असलेली जमीन, इमारतीचा आराखडा आणि सर्व तांत्रिक दस्तावेज आधीच तयार करून मंत्रालयाकडे सादर करण्यात आले आहेत. आता केवळ केंद्र सरकारच्या अंतिम मंजुरीची प्रतीक्षा आहे. जनहित आणि अमरावतीची निकड लक्षात घेता, केंद्रीय सचिवांनी या प्रस्तावाला प्राधान्य देऊन तात्काळ प्रशासकीय मंजुरी प्रदान करावी, अशी मागणी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी या भेटीत केली. केंद्रीय सचिव वैद्य राजेश कोटेचा यांनी या प्रस्तावावर सकारात्मकता दाखवत, मंजुरीची प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. या भेटीमुळे अमरावतीच्या 'आयुष' रुग्णालयाच्या मंजुरीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

### अचलपूर येथे उपप्रादेशिक

चिखलदरा, धारणी तसेच मध्यप्रदेश सीमावर्ती भागातील लाखो नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून एस.टी. वाहतूक नियोजनालाही मोठी गती मिळणार आहे. या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित प्रक्रिया तातडीने सुरू करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे अचलपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू होण्याच्या हालचालींना आता वेग आला आहे.बैठकीत बच्चू कडू यांनी मेळघाट संघर्ष यात्रेदरम्यान अनुभवलेल्या वास्तवाचे जिवंत चित्र मांडले. डोंगरदऱ्यांतील अनेक गावांमध्ये आजही एस.टी. सेवा विस्कळीत असून एका गावातून दुसऱ्या गावात जाण्यासाठी नागरिकांना संपूर्ण दिवस वाट पाहावी लागते किंवा मुक्काम करावा लागतो. हातरूसारख्या गावांमध्ये बस रात्री उशिरा येते आणि पहाटे गावकरी उठण्यापूर्वीच निघून जाते. अशा वाहतुकीचा सामान्य नागरिकांना कोणताही उपयोग होत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मेळघाटातील अरुंद व वळणावळणाच्या रस्त्यांवर मोठ्या बसेस धावणे कठीण असल्याने छोट्या मिनीबस सुरू करण्याची मागणी बच्चू कडू यांनी यापूर्वी विधान परिषदेतही केली होती. या मागणीची दखल घेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मेळघाटासाठी विशेष मिनीबस सेवा सुरू करण्यास तत्त्वतः मान्यता दिली. लवकरच या बसेस हातरू, चूर्णी, रायपूर, जारीदा, काटकुंभ, धारणी, चिखलदरा आणि इतर दुर्गम भागात धावणार असल्याने आदिवासी बांधवांच्या वाहतुकीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार आहे. सेमाडोह येथे तात्पुरता एस.टी. बस डेपो उभारण्याच्या मागणीलाही हिरवा कंदील मिळाला आहे. सेमाडोह हे मेळघाटाचे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथून विविध दुर्गम गावांसाठी मिनीबस सेवा सुरू करण्याचा प्रस्ताव बच्चू कडू यांनी मांडला. या प्रस्तावालाही परिवहन मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यामुळे मेळघाटातील दुर्गम गावांचा परस्पर संपर्क अधिक मजबूत होणार असून विद्यार्थी, शेतकरी, रुग्ण आणि सर्वसामान्य नागरिकांना मोठा फायदा होणार आहे.

याशिवाय दिव्यांग बांधवांच्या एस.टी. प्रवास सवलतीतील अडचणी, यू-डीआयडी पडताळणी प्रक्रिया सुलभ करणे, ई-बस सवलतीची प्रभावी अंमलबजावणी आणि बसस्थानकांवरील मूलभूत सुविधा या सर्व प्रश्नांवरही बैठकीत सविस्तर चर्चा झाली. या सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन परिवहन मंत्र्यांनी दिले. मेळघाट संघर्ष यात्रेत जनतेने मांडलेल्या प्रश्नांना आता शासन स्तरावर न्याय मिळू लागला असून, अचलपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, मेळघाटात मिनीबस सेवा आणि सेमाडोह येथे बस डेपो या निर्णयांमुळे बच्चू कडू यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाल्याची भावना परिसरात व्यक्त होत आहे.

### खुनाच्या प्रयत्नातील फरार

कारवाई सुरू आहे. २ जुलै रोजी राजापेठ पोलीस ठाण्यात खुनाचा प्रयत्न, मारहाण आणि इतर संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक उमेश मुंढे करत होते. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आरोपीचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र पथके तयार करण्यात आली होती. आरोपीचा माग काढण्यासाठी शेगाव, कारंजा आणि अमरावती शहरात विविध ठिकाणी शोधमोहीम राबविण्यात आली. तांत्रिक पुरावे उपलब्ध नसतानाही पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू ठेवला.तपासादरम्यान मुख्य आरोपी योगेश केशव स्वर्गे (वय ३६, रा. भानखेडा बु.) हा परतवाड्यातील गुलाबबाबा मिश्रा चौक परिसरात लपून असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे आणि डीबी पथकाने सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. पुढील चौकशीत आरोपीला लपविण्यास मदत केल्याचे समोर आल्यानंतर त्याचे काका दिपक मोतीराम स्वर्गे (वय ४८) आणि आतेभाऊ देवाशीष विलास इंगोले (वय १८, रा. परतवाडा) यांनाही अटक करण्यात आली.

### 56 लाख शेतक-यांना 36 हजार

घेतली आहे. ही अट कायम ठेवली असती तर सुमारे दोन लाख शेतकरी योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता होती. त्यामुळे अतिरिक्त आर्थिक भार स्वीकारू न सरकारने अट मागे घेण्याचा निर्णय घेतल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. यासोबतच योजनेतील जुन्या २६ ते २७ प्रकारच्या अटी आणि निर्बंधही वगळण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यात यापूर्वी राबविण्यात आलेल्या महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील काही त्रु टी नव्या योजनेत दूर करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना अधिक व्यापक आणि लवचिक करण्यात आली आहे. पूर्वीच्या योजनेत शेतक-याची थकबाकी दोन लाख रु पयांपेक्षा केवळ एक रु पयाने जरी अधिक असली, तरी संबंधित शेतक-याला कर्जमाफीचा लाभ मिळत नव्हता. उदाहरणार्थ, एखाद्या शेतक-याची थकबाकी दोन लाख एक रु पये असेल, तरी तो योजनेसाठी अपात्र ठरत होता. नव्या योजनेत ही अडचण दूर करण्यात आली आहे. आता दोन लाख रु पयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतक-यांनाही दोन लाख रु पयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे मोठ्या थकबाकीमुळे योजनेबाहेर राहणा-या शेतक-यांनाही दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### दादांच्या विमान अपघात प्रकरणाची

त्यानंतर पुढे तपास होणार आहे. सीआयडी तपासानुसार पायलट सुमित कपूर यांच्यावर शंका होती, त्यांचे सर्व बँक खाते तपासले, पण त्याच संशयास्पद आढळले नाही. ब्लॅक बॉक्समधील सर्व माहिती घेतली आहे. जेवढे डाउनलोड करायचे ते डाक्युमेंट डाउनलोड झाले आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. एएआयबीचा अहवाल सर्वांत महत्त्वाचा आहे. रोहित पवारांनी सांगितले की, तीन-चार वर्ष लागतात. हे खरे आहे. परंतु, या प्रकरणात विशेष करू न केंद्र सरकारने विनंती केली आहे. परदेशातील सगळे तज्ज्ञ यात घेतलेले आहेत. अमेरिकेतील एक संस्था यावर काम करत आहे. त्यांना केलेली विनंती मान्य करण्यात आली आहे. म्हणून असे म्हणू नये, पण दादांची पुण्यतिथी येईल, त्या अगोदर हा अहवाल यावा, अशा प्रकारचा प्रयत्न आहे, अशी माहिती फडणवीस यांनी दिली. तसेच हा अहवाल आल्यानंतर सीआयडी असेल किंवा सीबीआय असेल, तपास करतील. कारण विमानात काय घडले, ते या अहवालाशिवाय समजूच शकत नाही. सगळे धागेदोरे यातच मिळणार आहेत, असेही फडणवीसांनी नमूद केले. कुणी शंका घ्यायची गरज नाही, कर्नाटकमध्ये एफआयआर केला. यानंतरची प्रक्रिया चार्जशीटची आहे. पहिले दोषी कोण हे ठरवावे लागेल. तरच त्या एफआयआरला अर्थ राहतो. जोपर्यंत एएआयबीचा अहवाल येत नाही, तोपर्यंत ते होउ शकत नाही. प्राथमिक अहवालाच्या आधारे हे करता येत नाही, त्याला अंतिम अहवाल यावा लागेल. यात भावना महत्त्वाची आहे. परंतु, कायदा भावनेने चालत नाही. न्यायालयात ते टिकणार नाही, चपराक बसेल. म्हणून पुन्हा सांगतो की, या प्रकरणातील सत्य बाहेर आल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही. काही झाले, तरी ते सत्य बाहेर आणू, त्यासाठी त्याचा योग्य पाठपुरावा करू , अशी ग्वाही फडणवीस यांनी दिली.

### कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम;

लवकरच वितरित करण्यात येतील, तसेच कृषी समृद्धी योजनेतील उर्वरित निधी पुरवणी मागण्यांतून उपलब्ध करू न दिला जाईल, असे त्यांनी सांगितले. राज्यात कुठेही नियोजित भारनियमन नसल्याचे स्पष्ट करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यंदा ३२ हजार मेगावॅटपर्यंतची वीज मागणी पूर्ण करण्यात आली आहे. ७६ टक्के कृषी फिडरवर दिवसा वीजपुरवठा सुरू असून उर्वरित भागातही काम सुरू आहे. स्मार्ट मीटरबाबत प्राप्त झालेल्या बहुतांश तक्रारी तपासणीत चुकीच्या आढळल्या असून वाढीव वीजबिलांचा संबंध स्मार्ट मीटरशी नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### सरन्यायाधीशांना शिवीगाळ,

६ ऑक्टोबर रोजी माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर वकील राकेश किशोर यांनी बूट फेकण्याचा प्रयत्न केला होता. ही वस्तू सरन्यायाधीशांना लागली नाही. या घटनेनंतरही सरन्यायाधीशांनी न्यायालयाचे कामकाज सुरू च ठेवले होते. खजुराहो येथील विष्णू मूर्तीच्या पुनर्स्थापनेची मागणी करणा-या याचिकेवरील सुनावणीदरम्यान सरन्यायाधीशांनी केलेल्या कथित विधानामुळे नवल किशोर नाराज होते. या घटनेनंतर भूषण गवई यांनी नवल किशोर यांच्याविरोधात तक्रार करणार नसल्याची भूमिका घेतली. मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या बार असोसिएशनने नवल किशोर यांचे नाव नोंदणीवरू न काढले. तसेच बार कौन्सिल ऑफ इंडियाने पुढील कार्यवाहीपर्यंत त्यांची सनद रद्द केली.

### शिक्षकाने अभ्यासाकरिता रागावणे

त्यामुळे सूर्यवंशी यांनी संतापून त्याला अत्यंत कडक शब्दांत सुनावले. या अपमानास्पद वागणुकीमुळे दुखावलेला विवेक शाळेच्या मधल्या सुट्टीत घरी निघून गेला आणि त्याने स्वतःच्या शेतातील एका पडक्या खोलीत गळफास लावून आत्महत्या केली. त्याच्या खिशात सापडलेल्या सुसाईड नोटमध्ये शिक्षकाच्या वाईट वागणुकीचा उल्लेख होता. त्यावरून पोलिसांनी शिक्षकाविरोधात गुन्हा दाखल केला होता.वारंवार छळ केल्याचा पुरावा नाही-शिक्षकाने विद्यार्थ्याचा सातत्याने मानसिक छळ केला होता, ज्यामुळे विद्यार्थ्यासमोर आत्महत्येशिवाय दुसरा कोणताही मार्ग उरला नाही, असा कोणताही पुरावा समोर आला नाही. शिक्षकाने वापरलेले शब्द चुकीचे आणि आक्षेपार्ह असले, तरी सामान्य बुद्धीचा कोणताही विद्यार्थी यामुळे एवढे टोकाचे पाउल उचलणार नाही. मृत विद्यार्थी अतिसंवेदनशील होता आणि त्याने भावनांच्या भरात स्वत?चे जीवन संपवले. त्याने अशी कृत्ती करावी हा शिक्षकाचा हेतू नव्हता, याकडे न्यायालयाने लक्ष वेधले.

### राजपाल यादव पुन्हा

सामोरे जावे लागू शकते. हे प्रकरण अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या आर्थिक व्यवहार आणि कर्जाच्या परतफेडीशी संबंधित आहे. वृत्तांनुसार, चित्रपट निर्मितीसाठी घेतलेल्या कर्जातून हा वाद निर्माण झाला आणि त्यानंतर जारी करण्यात आलेले अनेक धनादेश अनादरित झाल्याने संबंधित कंपनीने न्यायालयात धाव घेतली. उपलब्ध वृत्तांनुसार, चित्रपट निर्मितीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड न झाल्याने आर्थिक वाद सुरू झाला. कर्जाच्या परतफेडीसाठी देण्यात आलेले धनादेश बाउन्स झाल्यानंतर निगोशिएबल इन्स्ट्रु मेंट्स कायद्यांतर्गत सात स्वतंत्र प्रकरणे दाखल झाली. दीर्घकाळ चाललेल्या न्यायालयीन प्रक्रियेनंतर कनिष्ठ न्यायालयाने राजपाल यादव यांना दोषी ठरवत तीन महिन्यांच्या साध्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. या निर्णयाविरोधात राजपाल यादव यांनी दिल्ली उच्च न्यायालयात दाद मागितली होती. मात्र उच्च न्यायालयाने संबंधित याचिका फेटाळून कनिष्ठ न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला. त्यामुळे तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा प्रभावी राहणार आहे.

### वाशीम जिल्हा न्यायालयाने

करण्यात आली होती. या जमिनीचे भूसंपादन केले. तत्कालीन भूसंपादन तथा उपविभागीय अधिकारी यांनी अधिकृत केलेल्या प्ल?टचाच मोबदला दिला. भूसंपादनामध्ये लेआउटमधील रस्ते, खुली जागा व सुखसोयीसाठी सोडलेल्या जागेची नुकसान भरपाई दिली नाही. नुकसान भरपाईसाठी शेतक-यांनी लवाद अपर जिल्हाधिका-यांकडे दावा दाखल केला. वाढीव भाव व भूसंपादन केलेल्या रस्ते, खुली जागा व सुखसोयीच्या जमिनीची नव्या भावाने नुकसान भरपाईचे आदेश लवादाने दिले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने आदेशाप्रमाणे रक्कम दिली नाही. शेतक-यांनी वाशीम जिल्हा न्यायालयात धाव घेउन वसुलीसाठी ६ दरखास्ती दाखल केल्या. तोंडगाव धुमका पथकर नाक्यावर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण दररोज दोन ते तीन लाखाची रक्कम वाहनधारकांकडून वसूल केली जाते. तो जप्त करण्याची मागणी केली. ही मागणी वाशीमचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश यांनी मान्य करू न ०७ जुलै रोजी तोंडगाव-धूमका पथकर नाका जप्त करण्याचे वारंट काढले.

### 22 लाखांचा गुटखा

कारवाई करावी, अशी मागणी शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख गजानन वाघ यांनी केली आहे आहे.? गजानन वाघ यांनी १ जुलै रोजी अवैध गुटखा वाहतूक संदर्भात तक्रार दिली होती . हा केवळ एक ट्रक नसून अवैध गुटख्याचे मोठे रॅकेट आहे. फरार वाहन चालकाला आणि मुख्य आरोपीला त्वरित अटक करू न त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करावी. तसेच, जळगाव जामोद तालुक्यात गुटख्याची अवैध वाहतूक करणा?या इतर वाहनांचाही शोध घेउन त्यांच्यावरही कठोर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.? दरम्यान या कारवाईमुळे गुटखा माफियांमध्ये मोठी खळबळ उडाली असून, पसार झालेला चालक आणि गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार पोलिसांच्या हाती कधी लागणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आरव हत्याकांडातील

पचवता आला नाही. तो सतत रतीवर लग्नासाठी दबाव टाकत होता, पण प्रत्येक वेळी अपयश आल्याने त्याचा राग अनावर झाला.३० मे रोजी रती देवी एका कायदेशीर कामासाठी आपल्या आईसोबत शिकोहाबाद येथे आल्या होत्या. याच वेळी जितेंद्रही तिथे पोहोचला. त्याने दीड वर्षाच्या आरवला ट?फी देण्याचे आमिष दाखवले आणि त्याला आपल्यासोबत घेउन गेला. काही अंतरावर एका निर्जन ठिकाणी नेउन जितेंद्रने जी क्रू रता केली, तिची कल्पनाही करवत नाही. त्याने अवघ्या २७ सेकंदांच्या आत आरवला रस्त्यावर एकापाठोपाठ एक तब्बल ८ वेळा जोरात आपटले. गंभीर दुखापतींमुळे चिमुरड्या आरवचा जागीच मृत्यू झाला. यानंतर तो आरवचा मृतदेह रतीच्या घराबाहेर टाकून फरार झाला. या संपूर्ण घटनेचे काळजाचा थरकाप उडवणारे सीसीटीव्ही फुटेजही समोर आले होते.

### देशात वर्षभरात 4,791

एकही विद्यार्थी नसलेल्या शाळांची संख्या प्रथमच मोठ्या प्रमाणावर कमी झाली आहे. गेल्या वर्षी देशात अशा ७,९९३ शाळा होत्या. २०२५-२६ मध्ये ही संख्या घटून ५,६६३ झाली आहे. म्हणजेच एका वर्षात विद्यार्थी नसलेल्या शाळांच्या संख्येत २,३३० ने घट झाली. मात्र या ५,६६३ शाळांमध्ये तब्बल २० हजार ६६७ शिक्षक कार्यरत असल्याची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे एकही विद्यार्थी नसताना हजारो शिक्षकांची नियुक्ती असलेल्या शाळांचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे.

**पश्चिम बंगालमध्ये गंभीर चित्र-**शून्य विद्यार्थी असलेल्या शाळांच्या बाबतीत पश्चिम बंगालमधील आकडेवारी विशेष लक्ष वेधून घेणारी आहे. गेल्या वर्षी अशा शाळांच्या संख्येत ३२१ ने वाढ झाली होती. या शाळांमध्ये १,५७३ शिक्षक कार्यरत होते. आकडेवारीनुसार, पश्चिम बंगालमध्ये आता ४,१३३ शून्य पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये १९,५०२ शिक्षक कार्यरत आहेत. विद्यार्थीच नसल्याने या शिक्षकांकडे प्रत्यक्ष अध्यापनासाठी विद्यार्थी उपलब्ध नसल्याचे चित्र आहे.

*लोकराज्य मासिकातील गंभीर प्रकार*

## बाबासाहेब आंबेडकरांचा अपमान करणाऱ्यांवर कारवाई करा

### वंचित बहुजन आघाडीची मागणी

**अमरावती-** लोकराज्य मासिकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे उलटे छायाचित्र छापणाऱ्यांवर योग्य कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे. ही मागणी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आज शुक्रवार १० जुलै रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना मानणाऱ्या १२५ कोटी जनतेचा अपमान केला आहे तरीसुद्धा महाराष्ट्र सरकार यावर मुग जुळून बसल्याचा प्रकार घडत आहे. उलटे छायाचित्र छापून मासिकामधून काम करणाऱ्या मुख्य जबाबदार व्यक्तीने महामानवाचा अपमान केला आहे. त्यावर योग्य कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. निवेदन देताना सुरेश तायडे, बाळासाहेब गारोडी, अक्षय देवकर, दत्ता गजभिये, महादेव रंगारी ,अरविंद नगराळे, सुधीर कांबळे, अमृत इंगळे, विजयपाल तायडे ,मनोज माटे, शिवाजी बाबुर्डे ,करण जाधव, अंबादास कोकाटे ,वासुदेव तायडे, अमृत इंगळे, नरेंद्र डोंगरे, साहेबराव नाईक, विकास तेलगोटे, रमेश आठवले, बबलू रामटेके आदि उपस्थित होते.

---

मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१७३/२०२६ ने.ता.१०.०८.२०२६

१. लता नागोराव वानरे
**रा.बारभाई पुरा, अंबाडा, ता.जि.अमरावती**

// वि //
निरंक

**ज्याअर्थी** मयत शांताबाई राजाराम बिस्के **यांचा** मृत्यू दि.२६.११.२०१७ **मध्ये** फुबगांव, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती **येथे झाला. मयताचे** अर्जदार क्र.१ ही मुलगी आहे. **मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.**

**त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी** १०.३० **वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.**

आज दिनांक ०२ जुलै २०२६ **रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

## -सायटेशन/जाहीरनामा-

विद्यमान व्यवहार न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.४४४/२०२६** **ने.ता.२१.०८.२०२६**

अर्जदार -
१. श्रीमती मंदाबाई बाबुरावजी काळमेघ, **वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम**
२. श्री.प्रफुल्ल बाबुरावजी काळमेघ, **वय ४० वर्षे, धंदा - शेती**
३. श्री.निखिल बाबुरावजी काळमेघ, **वय ३४ वर्षे, धंदा - शेती**
**सर्व रा.भिलापुर, पो.मंगरुळ, ता.मोर्शी, जि.अमरावती**

-- विरुध्द --
कोणीही नाही

**वरील सर्व अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-(८) १८२७ प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदाराप्रमाणे अर्जदार क्र.१ ची सासु तर अर्जदार क्र.२ व ३ ची आजी नामे** नर्मदाबाई पंजाबराव काळमेघ **ही** दिनांक ०७/०३/२०२२ **रोजी तिचे राहते घरी भिलापुर,ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मय्यत झालेली आहे. त्यांचे मृत्यूनंतर त्यांचे वारस हे वरीलप्रमाणे आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

**दिनांक ०९.०७.२०२६**

शिक्का

**आदेशान्वये,**
सहाय्यक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय, मोर्शी**

---

मयत प्रतिवादीचे प्रतिनिधीस समन्स — PR No. 540/2026
O.22.R.4 — Dt. 01/07/2026

चांदूर बाजार येथिल वि.दिवाणी न्यायाधिश, यांच्या न्यायालयात

R.C.S.No. 76/2023 — F.F. 30-07-2026

वादी - शरद शेरेकर व इतर
-- विरुध्द --
प्रतिवादी - मोहन मानेकर व इतर

बनाम -
१. श्रीमती शोभा शिवदास मानेकर
२. प्रफुल्ल शिवदास मानेकर
३. प्रीती वैभव गोडसे
४. रोहित शिवदास मानेकर
**सर्व रा. शिवार्पण कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती**

**ज्याअर्थी, वादी यांनी या न्यायालयामध्ये प्रतिवादी यांच्या विरुध्द दावा दाखल केला असून, प्रस्तुत प्रकरण प्रलंबित असतांना वादी शिवदास नामदेवराव मानेकर हे मरण पावले आहे. त्यांचे मृत्यूनंतर तुम्ही उक्त वादी यांचे प्रतिनिधी आहात आणि त्यांचे जागी तुम्हाला प्रतिवादी करायचा आहे असे कथन करणारा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.**

**म्हणून सदर अर्जावर आपले म्हणणे मांडण्यासाठी ही दिनांक ३०/०७/२०२६ रोजी मध्यान्ह ११ वाजता या न्यायालयामध्ये हजर होण्यासाठी बोलावण्यात येत आहे. आणि उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्यांची सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल.**

**आज दि.३०/०६/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.**

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय,
चांदूर बाजार

---

मा.दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र.९, अमरावती

एम.जे.केस क्र.१०२८/२०२६ ने.ता. १८.०८.२०२६

अर्जदार : दिवाकर कमलाकर धुवे
**वय ६२ वर्षे, व्यवसाय- मजुरी**
**रा.वाघोली बु, ता. व जि. अमरावती**

-- विरुध्द --
निरंक

**ज्याअर्थी अर्जदार यांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ च्या कलम २७६ अन्वये दिवंगत श्रीमती शकुंतला कमलाकर धुवे यांनी दिनांक १४/०५/२०२५ रोजी केलेल्या इच्छापत्रास (Will) प्रोबेट मंजूर करण्यासाठी अर्जदाराने मा.न्यायालयात वरील अर्ज दाखल केला आहे.**

**सदर ईच्छापत्रामध्ये कॉग्रेस नगर रोड, अमरावती येथील नजुल प्लॉट क्र.१/५ शीट क्र.२९, क्षेत्रफळ १९४.१८ चौ.मीटर व त्यावरील बांधकाम असलेली मालमत्ता अर्जदार दिवाकर कमलाकर धुवे, सुधाकर कमलाकर धुवे व रंजना ओमप्रकाश गडलिंगे यांना समप्रमाणात देण्यात आलेली आहे.**

**सदर प्रोबेट अर्जास कोणत्याही व्यक्तीस हरकत असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून मा.न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र.९, अमरावती यांच्या न्यायालयात हरकत घेऊ ईच्छित असेल, त्याने आपल्या हरकती दिनांक १८/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः हजर राहून किंवा योग्य वकिलामार्फत लेखी स्वरुपात सादर कराव्यात. अन्यथा, कोणतीही हरकत नसल्याचे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.**

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय,**
**अमरावती**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ शनिवार, ११ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# खोलेश्वर संस्थानच्या कोट्यवधींच्या मालमत्ता गैरव्यवहारप्रकरणी गुन्हा

## सार्वजनिक संस्थेला खाजगी दाखविल्याचाही आरोप ; धर्मादाय विभागाच्या चौकशीनंतर सिटी कोतवाली पोलिसांची कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■


*शहरातील ऐतिहासिक आणि धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणीकृत श्रीरामचंद्र खोलेश्वर संस्थान यांच्या कोट्यवधी रुपयांच्या स्थावर व जंगम मालमत्तेच्या कथित गैरव्यवहारप्रकरणी सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे संस्थेच्या जमिनी स्वतःच्या नावावर करून त्यांची विक्री, महसूल अभिलेखांमध्ये फेरफार, संस्थेच्या निधीचा अपहार, भूसंपादनाची भरपाई स्वतःकडे वळविणे आणि सोन्या-चांदीच्या मौल्यवान दागिन्यांची विल्हेवाट लावल्याचे गंभीर आरोप या प्रकरणात करण्यात आले आहेत. धर्मादाय विभागाच्या प्राथमिक चौकशीत तक्रारीतील बाबी प्रथमदर्शनी आढळून आल्यानंतर आवश्यक परवानगी घेऊन पोलिसांनी ही कारवाई केली आहे.*

सामाजिक कार्यकर्ते रमेश सुरेश गायकवाड यांच्या तक्रारीवरून रामकिशारदास गुरु जयरामदास, चंदनदास गुरु रामकिशारदास व इतरांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३१८ (४), ३३५, ३३६ (३) व ३ (५) अन्वये गुन्हा क्रमांक २५०/२०२६ दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीनुसार, श्रीरामचंद्र खोलेश्वर संस्थान ही धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणी क्रमांक अ-४१७ अंतर्गत नोंदणीकृत सार्वजनिक धार्मिक संस्था आहे. संस्थेच्या नावावर दैलखेड, भाकराबाद, जलालाबाद, सावरखेडा, कान्हेरी सरप, अधोळंदा, रुस्तमाबाद आदी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर शेती असून सोन्या-चांदीचे दागिने व इतर मौल्यवान मालमत्ताही संस्थेकडे आहे.

तक्रारीनुसार, संशयितांकडे संस्थेच्या मालमत्तेची केवळ देखरेख आणि व्यवस्थापनाची जबाबदारी होती. मात्र, त्यांनी कथितरीत्या बनावट कागदपत्रे तयार करून महसूल अधिकाऱ्यांची दिशाभूल केली. महसूल नोंदींमध्ये फेरफार करून संस्थेच्या जमिनी स्वतःच्या नावावर करून घेतल्या आणि त्यानंतर त्या जमिनींची परस्पर विक्री करून कोट्यवधी रुपयांचे व्यवहार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या व्यवहारातून मिळालेली रक्कम संस्थेच्या खात्यात जमा न करता स्वतःच्या खात्यात वळविण्यात आल्याने संस्थेच्या निधीचा अपहार झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच भूसंपादन विभागाकडून संस्थेला मिळालेली सुमारे ५८ लाख रुपयांची भरपाई देखील संस्थेच्या





खात्यात जमा न करता स्वतःच्या ताब्यात घेतल्याचा आरोप आहे.

याशिवाय संस्थेकडे असलेले सुमारे २५५ तोळे सोन्याचे दागिने तसेच सुमारे एक किलो चांदीचे दागिने व भांडी यांची कोणतीही अधिकृत नोंद न ठेवता विल्हेवाट लावल्याचाही आरोप करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, महंत जयरामदास यांच्या निधनानंतर रामकिशारदास यांची व्यवस्थापक म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांना केवळ 'केअरटेकर' म्हणून जबाबदारी देण्यात आली होती. संस्थेच्या मालमत्तेवर कोणताही मालकी हक्क नसतानाही स्वतःला मालक असल्याचे भासवून न्यायालयीन आदेशांचा कथित गैरवापर करण्यात आला आणि महसूल नोंदींमध्ये बदल करण्यात आल्याचा आरोप आहे.

तक्रारीत १९८९ मधील दिवाणी न्यायालयीन प्रकरणाचाही उल्लेख आहे. त्या प्रकरणातील पुढील आदेश व स्थगिती महसूल विभागापासून लपवून संस्थेच्या जमिनी स्वतःच्या नावावर करून घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. कान्हेरी सरप, कोलखेड, अधोळंदा, रुस्तमाबाद आदी गावांतील विविध गट क्रमांकांच्या जमिनींच्या व्यवहारातून संस्थेचे ३० ते ४० कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा दावा फिर्यादीने केला आहे. संस्थेची वार्षिक लेखापरीक्षणे, आर्थिक अहवाल व हिशेब धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नियमित सादर करण्यात आले नसल्याने आर्थिक व्यवहारांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला आहे.

ही तक्रार १७ जुलै २०२५ रोजी पोलिसांकडे दाखल करण्यात आली होती. त्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार चौकशी करण्यात आली. धर्मादाय विभागाच्या अहवालात तक्रारीतील बाबी प्रथमदर्शनी निष्पन्न झाल्यानंतर आवश्यक कायदेशीर परवानगी घेऊन सिटी कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला.या प्रकरणात महसूल अभिलेख, धर्मादाय विभागाची कागदपत्रे, न्यायालयीन नोंदी, जमिनींचे व्यवहार, बँक खात्यांतील आर्थिक उलाढाल तसेच संबंधित व्यक्तींच्या भूमिकेचा सखोल तपास केला जाणार आहे. सदर प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवर व पोलिसांनी नोंदविलेल्या प्रथम माहिती अहवालावर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. गुन्हा दाखल झालेल्या संशयित आरोपींची बाजू अद्याप समोर आलेली नसून, अंतिम वस्तुस्थिती पोलिस तपास व न्यायालयीन प्रक्रियेनंतरच स्पष्ट होईल.

### सार्वजनिक संस्थेला 'खाजगी' दाखविण्याचा प्रयत्न?

या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे श्रीरामचंद्र खोलेश्वर संस्थान ही धर्मादाय आयुक्त कार्यालयात नोंदणीकृत सार्वजनिक धार्मिक संस्था असून तिचा नोंदणी क्रमांक अ-४१७ आहे. असे असतानाही संबंधितांनी संस्थेला बेकायदेशीरपणे खाजगी संस्थान म्हणून दाखविण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. यासाठी मंदिर परिसरात 'खाजगी संस्थान' असल्याचे दर्शविणारे फलकही लावण्यात आल्याचा दावा आहे. सार्वजनिक धर्मादाय संस्थेचे स्वरूप बदलून ती खाजगी असल्याचा आभास निर्माण करण्यामागे संस्थेच्या मालमत्तेवर वैयक्तिक मालकीचा दावा मजबूत करण्याचा हेतू होता का, याचाही तपास आता पोलिस आणि धर्मादाय विभागाकडून होणार आहे.

---

# वज्रदेही महिला विकास संघाचा प्रेरणादायी उपक्रम; ओम डुकरे यांना मिळवून दिला स्वावलंबी व्यवसाय



■ प्रतिनिधी | वाशिम ■

समाजातील युवकांनी केवळ नोकरीच्या शोधात न राहता स्वावलंबी उद्योजक बनावे, या उद्देशाने वज्रादेही महिला विकास संघाने आणखी एक प्रेरणादायी उपक्रम राबवला आहे. संघाच्या पुढाकारातून तरुण ओम डुकरे यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, संधी आणि सहकार्य उपलब्ध करून देण्यात आले.

या उपक्रमामुळे ओम डुकरे यांच्या स्वावलंबनाचा मार्ग मोकळा झाला असून, ते आता स्वतःच्या मेहनतीच्या बळावर व्यवसाय उभारण्याच्या दिशेने वाटचाल करत आहेत. ही केवळ एका तरुणाची यशोगाथा नसून, आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी उदाहरण आहे. यावेळी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, 'युवकांनी स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवून उद्योग-व्यवसायाकडे वळावे. योग्य मार्गदर्शन, जिद्द आणि मेहनत यांच्या बळावर प्रत्येक तरुण यशस्वी उद्योजक बनू शकतो. वज्रादेही महिला विकास संघ भविष्यातही अशा अनेक युवकांना स्वावलंबी बनविण्यासाठी सातत्याने कार्यरत राहील.'

या उपक्रमाचे परिसरात सर्वत्र कौतुक होत असून, अधिकाधिक युवकांनी अशा संधींचा लाभ घेऊन रोजगार मागणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे बनावे, असे आवाहन संघाच्या वतीने करण्यात आले.

घोषवाक्य : 'युवा स्वावलंबी, समाज सक्षम! उद्योजकतेकडे एक पाऊल, उज्ज्वल भविष्याकडे मोठी झेप!'

---

# स्टॉप डायरिया अभियान राबवा: सीईओ
## गावनिहाय पाणी गुणवत्तेची होणार तपासणी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पावसाळ्यात दूषित पाणी, अस्वच्छता आणि वैयक्तिक स्वच्छतेच्या अभावामुळे अतिसारजन्य आजारांचा धोका वाढण्याची शक्यता आहे. या पार्श्वभुमिवर सर्व गावात स्टॉप डायरिया अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान प्रभावीपणे राबविण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी केले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी चौहान यांनी आरोग्य विभाग, सर्व विभाग प्रमुख आणि सर्व गट विकास अधिकारी यांना निर्देश दिले आहेत.अतिसार हा विशेषतः पाच वर्षांखालील बालकांसाठी जीवघेणा ठरू शकणारा आजार असून, सुरक्षित पिण्याचे पाणी, साबणाने हात धुण्याची सवय, परिसर स्वच्छता आणि योग्य स्वच्छताविषयक



पद्धतींचा अवलंब केल्यास या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळविता येते, असेही स्पष्ट केले. या अभियानादरम्यान गावनिहाय पाणी गुणवत्तेची खात्री करण्यासाठी सर्व स्त्रोतांची नियमित चाचणी केली जाईल. विद्यार्थी व स्वयंसेवकांना फिल्ड टेस्ट किटच्या माध्यमातून पाणी तपासणीचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. ग्रामीण पाणीपुरवठा यंत्रणेतील गळती दुरुस्ती, पाणी साठवण टाक्यांची स्वच्छता व निर्जंतुकीकरणा पिण्याच्या पाण्याचे नियमित क्लोरिनीकरण नळाद्वारे पुरवठा होणाऱ्या पाण्यात ०.२ पीपीएम मुक्त अवशिष्ट क्लोरोन राखण्यावर भर दिला जाणार आहे.

---

# सावरगावला ५० लाखांचे सभागृह ; प्रशासकीय मंजुरीची प्रतीक्षा

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सावरगाव येथे सुमारे ५० लाख रुपये खर्चून भव्य सभागृह उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या कामासाठी आमदार नितीन देशमुख यांच्या विशेष निधीतून आर्थिक तरतूद करण्यात आली असून, लवकरच प्रशासकीय मंजुरी मिळण्याची अपेक्षा आहे.

सभागृह उभारणीसंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अकोला येथील कार्यकारी अभियंत्यांना आवश्यक पत्र पाठविण्यात आले आहे. प्रशासकीय मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रक्रिया राबवून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती मिळाली.

### संगीता राठोड यांच्या पाठपुराव्याला यश; आमदार नितीन देशमुख यांच्या विशेष निधीतून उभारणी

सावरगावमध्ये सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमांसाठी सुसज्ज सभागृहाची मागणी अनेक वर्षांपासून होती. प्रस्तावित सभागृहामुळे ग्रामस्थांना आधुनिक सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच गावातील विविध उपक्रमांना चालना मिळणार असल्याचे सांगितले जात आहे. या विकासकामासाठी संगीता वामन राठोड यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांची दखल घेत आमदार नितीन देशमुख यांनी विशेष निधीतून आर्थिक तरतूद केल्याचे सांगण्यात आले. याबाबत संगीता वामन राठोड म्हणाल्या, 'सावरगावच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणे हे माझे कर्तव्य आहे. आमदार नितीन देशमुख यांनी माझ्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत विशेष निधी उपलब्ध करून दिला. प्रशासकीय मंजुरीनंतर लवकरच सभागृहाच्या कामाला सुरुवात होईल. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी पुढेही माझे प्रयत्न कायम राहतील.' या निर्णयामुळे ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत आमदार नितीन देशमुख यांच्यासह संगीता वामन राठोड यांचे आभार मानले आहेत.

---

# प्रभाग क्र. ७ मध्ये १२ जुलै रोजी विशेष SIR मतदार पडताळणी शिबिर

■ प्रतिनिधी | कारंजा ■

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) मोहिमेअंतर्गत कारंजा शहरातील प्रभाग क्रमांक ७ मधील मतदारांसाठी विशेष मतदार यादी एंई पडताळणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर रविवार, दि. १२ जुलै रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत जिल्हा परिषद शाळा, काळी, कारंजा (लाड) येथे आयोजित करण्यात आले असून, प्रभागातील सर्व पात्र मतदारांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये प्रभाग क्रमांक ७ मधील सर्व पात्र मतदारांनी स्वतः उपस्थित राहून आपल्या तसेच कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांच्या मतदार नोंदणीची पडताळणी करून आवश्यक अर्ज भरावेत. प्रत्येक अर्जासोबत रंगीत पासपोर्ट आकाराचे छायाचित्र जोडणे तसेच आवश्यक त्या ठिकाणी संबंधित मतदाराची स्वाक्षरी करणे अनिवार्य असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. भरलेले अर्ज संबंधित बूथ लेव्हल अधिकारी (BLO) यांच्याकडे वेळेत जमा करणे आवश्यक असून, पडताळणी प्रक्रिया पूर्ण न झाल्यास मतदार यादीतून नाव वगळले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोणत्याही प्रकारची गैरसोय टाळण्यासाठी नागरिकांनी अंतिम मुदतीपूर्वी आपली पडताळणी पूर्ण करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या शिबिरामध्ये मतदार यादी भाग क्रमांक १०१ (BLO – विशाल तायडे), भाग क्रमांक १०२ (BLO – निशांत कचरे), भाग क्रमांक १०३ (BLO – वैभव पवार) आणि भाग क्रमांक १९३ ((BLO – गजानन चौधरी) यांच्या कार्यक्षेत्रातील मतदारांची विशेष पडताळणी करण्यात येणार आहे. मतदार यादीतील नाव, पत्ता व इतर तपशीलांची अचूकता तपासून आवश्यक दुरुस्त्या करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असून, लोकशाही प्रक्रियेत प्रत्येक पात्र नागरिकाचा सहभाग सुनिश्चित करण्याच्या दृष्टीने ही मोहीम अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगण्यात आले. नागरिकांनी केवळ स्वतःचीच नव्हे, तर आपल्या कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांची मतदार नोंदणी तपासावी. तसेच नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातील पात्र मतदारांनाही या शिबिराची माहिती देऊन त्यांना सहभागी करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. या विशेष शिबिराचे आवाहनकर्ते कारंजा भाजपा गटनेत्या तथा नगरसेविका शालिनी प्रशांत ठाकरे, नगरसेवक सागर रामदासजी अंभोरे, नगरसेविका ज्योतीताई प्रवेश राठोड, भाजपा कार्यकर्ते प्रशांत ठाकरे आणि प्रवेश राठोड यांनी प्रभागातील सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने शिबिरात सहभागी व्हावे, आवश्यक कागदपत्रांसह अर्ज भरून त्यास रंगीत छायाचित्र जोडावे व संबंधित ७ कडे वेळेत जमा करावा, असे आवाहन केले आहे.

---

# कवठा व आसेगाव पेन येथे क्षयरोग व एचआयव्ही तपासणी शिबिर

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्हा क्षयरोग केंद्र, वाशीम यांच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र कवठा व आरोग्य उपकेंद्र आसेगाव पेन येथे शुक्रवारी क्षयरोग व एचआयव्ही तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात संशयित रुग्णांची डिजिटल व हँड हेल्ड एक्स-रे मशिनद्वारे तपासणी करण्यात आली. तसेच नागरिकांना क्षयरोग, डेंग्यू व एड्स प्रतिबंधाबाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले.

प्राथमिक आरोग्य केंद्र कवठा येथे जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग ठोंबरे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कावरखे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. परभणकर, तालुका आरोग्य

### १८० संशयितांची एक्स-रे तपासणी



अधिकारी डॉ. डाखुरे व वैद्यकीय अधिकारी डॉ. बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिबिर पार पडले. यावेळी क्ष-किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबवार यांनी ५२ संशयित रुग्णांचे डिजिटल एक्स-रे केले. तसेच ३० संशयितांचे स्पुटम नमुने संकलित करण्यात आले.

याच शिबिरात लिंक वर्कर दुर्गा गायकवाड व संघर्ष गायकवाड यांनी ३५ नागरिकांची एचआयव्ही तपासणी केली. शिबिरासाठी डॉ. यशराज देशमुख, डॉ. गणेश मगर, स्वाती म्हल्ले, प्रमोद बावणे, सदाशिव हुळगुंडे, संदीप खुळे, संदीप कांबळे, संगीता चव्हाण, प्रशांत तूरक, संतोष आरु, गणेश राऊत, अमोल तायडे तसेच आशा कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

दरम्यान, आरोग्य उपकेंद्र आसेगाव पेन येथे हँड हेल्ड एक्स-रे मशीनद्वारे एक्स-रे टेक्निशियन कार्तिक शिरसाट यांनी १२८ संशयित रुग्णांची तपासणी केली. यावेळी डॉ. ज्ञानेश्वर जाधव, राजेश महाले, भिमराव शिंदे, अर्चना भोंडवे व मनीष जाधव उपस्थित होते.

या संपूर्ण शिबिराचे नियोजन जिल्हा क्षयरोग केंद्र, वाशीमचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी केले. शिबिरादरम्यान उपस्थित नागरिकांना क्षयरोग, डेंग्यू व एड्सबाबत जनजागृती करून प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देण्यात आली.

---

# साळुंकाबाई राऊत महाविद्यालयात एनसीसी कॅडेट भरती प्रक्रिया



■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील वनोजा येथिलज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्थेद्वारे संचालित श्रीमती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालय, वनोजा येथे मंगळवार, दि. ७ जुलै रोजी राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) विभागाची शैक्षणिक सत्र २०२६-२७ साठीची नवीन कॅडेट भरती प्रक्रिया शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. यामध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत एनसीसीमध्ये प्रवेशासाठी उत्सुकता दर्शविली.

भरती प्रक्रियेसाठी ११ महाराष्ट्र एनसीसी बटालियन, अकोला येथील ट्रेनिंग जेसीओ शशी कपूर तसेच एनसीओ राजेश गुरंग हे विशेषतः उपस्थित होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आणि देखरेखीखाली एनसीसीच्या निर्धारित नियमांनुसार संपूर्ण भरती प्रक्रिया पारदर्शकपणे राबविण्यात आली. भरती प्रक्रियेदरम्यान उमेदवारांची रनिंग, पुल-अप्स, पुश-अप्स, उंची, वजन आदी निकषांवर शारीरिक चाचणी घेण्यात आली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांची लेखी परीक्षाही घेण्यात आली. या सर्व चाचण्यांच्या आधारे विद्यार्थ्यांची शारीरिक क्षमता, मानसिक तयारी, शिस्त आणि एनसीसीसाठीची पात्रता तपासण्यात आली.

यंदाच्या भरती प्रक्रियेत महाविद्यालयातील ७३ विद्यार्थी व ३४ विद्यार्थिनी, असे एकूण १०७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सर्व चाचण्यांमध्ये पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची नवीन एनसीसी कॅडेट म्हणून निवड करण्यात आली. एनसीसीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, शिस्त, नेतृत्वगुण, सामाजिक बांधिलकी, साहसवृत्ती आणि व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळत असल्याने विद्यार्थ्यांचा एनसीसीकडे असलेला ओढा दिवसेंदिवस वाढत आहे. याच उद्देशाने महाविद्यालयात दरवर्षी गुणवत्तेच्या आधारे नवीन कॅडेट्सची निवड केली जाते.

---

# 'एटीएस'ची अकोल्यातही धडक
# शहजाद भट्टीच्या कथित नेटवर्कप्रकरणी ५ ते ६ ठिकाणी छापे

■ प्रतिनिधी | अकोला ■

### पाच ते सहा जण चौकशीसाठी ताब्यात
### आणखी काही संशयित एटीएसच्या रडारवर असल्याची माहिती

महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (ATS) शुक्रवारी राज्यभर राबविलेल्या समन्वित धडक कारवाईचा फटका अकोल्यालाही बसला. शहरातील विविध भागांतील सुमारे पाच ते सहा ठिकाणी एकाचवेळी छापेमारी करण्यात आली. या कारवाईत पाच ते सहा जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

ताब्यात घेण्यात आलेल्या व्यक्तींचा पाकिस्तानस्थित गँगस्टर शहजाद भट्टीच्या कथित सोशल मीडिया नेटवर्कशी संबंध असल्याचा प्राथमिक संशय तपास यंत्रणांना आहे. मात्र, या व्यक्तींचा नेमका सहभाग, संपर्काचे स्वरूप आणि त्यामागील उद्देश काय होता, याबाबतचा अंतिम निष्कर्ष सखोल चौकशी आणि तपासानंतरच स्पष्ट होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

एटीएसच्या पथकाने छापेमारीदरम्यान संबंधितांकडील मोबाईल फोन, लॅपटॉप आणि अन्य डिजिटल उपकरणांची तपासणी केल्याची माहिती समोर येत आहे. जप्त करण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांतील माहितीचे विश्लेषण करून सोशल मीडिया व्यवहार, डिजिटल संपर्क, आर्थिक देवाणघेवाण तसेच परदेशी नेटवर्कशी संबंधित बाबींची पडताळणी केली जात आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, अकोल्यातील आणखी काही व्यक्ती एटीएसच्या चौकशीच्या रडारवर असून तपासाच्या पुढील टप्प्यात त्यांचीही चौकशी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे येत्या काही दिवसांत या प्रकरणात आणखी घडामोडी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, राज्यभर सकाळी सुमारे सात वाजल्यापासून मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, नांदेड, जळगाव, अकोला तसेच अन्य शहरांमध्ये एकाचवेळी छापेमारी करण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली. या कारवाईत राज्यभरात १०० हून अधिक संशयितांची चौकशी सुरू असून त्यांच्या डिजिटल व्यवहारांसह परदेशी संपर्कांचीही कसून पडताळणी केली जात आहे.तपास यंत्रणांच्या प्राथमिक माहितीनुसार, पाकिस्तानस्थित शहजाद भट्टीचे कथित नेटवर्क सोशल मीडियाच्या माध्यमातून भारतातील काही तरुणांशी संपर्क साधत असल्याचा संशय आहे. मोठ्या पैशांचे आमिष, परदेशातील संधी आणि आलिशान जीवनशैलीची स्वप्ने दाखवून काही युवकांना कथित गुन्हेगारी जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न होत असल्याचा तपासाचा प्राथमिक अंदाज आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २२४ ■ शनिवार, ११ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# वर्ध्यात एटीएसचा पहाटेचा सर्जिकल स्ट्राइक; पाकिस्तानी लिंकच्या संशयावरून दोघे रडारवर

## -राज्यभर १५० ठिकाणी एकाचवेळी कारवाई -सोशल मीडियावरील संपर्क तपासणीच्या रडारवर

### मोबाईल, कॉल रेकॉर्ड आणि डिजिटल पुरावे तपासले

**वर्धा जनमाध्यम :** महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) पाकिस्तानस्थित कथित आयएसआय हँडलर आणि गँगस्टर शहजाद भट्टीच्या संशयित नेटवर्कविरोधात राज्यभर व्यापक मोहीम सुरू केली असून, त्याचाच भाग म्हणून शुक्रवारी पहाटे वर्ध्यात धडक कारवाई करण्यात आली. नागपूर आणि वर्धा एटीएसच्या संयुक्त पथकाने शहरातील एका सुमारे ४० वर्षीय व्यक्तीला चौकशीसाठी ताब्यात घेतले. त्याच्यासोबत वडनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आणखी एका संशयितालाही चौकशीसाठी आणण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र, या दोघांविरुद्ध कोणताही गुन्हा दाखल झाल्याची अथवा त्यांचा दहशतवादी कारवायांशी संबंध असल्याची अधिकृत पुष्टी अद्याप करण्यात आलेली नाही.

शुक्रवारी सकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास एटीएसचे आठ सदस्यीय पथक वर्धा शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संबंधित व्यक्तीच्या घरी पोहोचले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. संशयिताला ताब्यात घेतल्यानंतर त्याचा मोबाईल, लॅपटॉप आणि इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांची तपासणी करण्यात आली. त्यातील सोशल मीडिया अकाउंट्स, चॅट हिस्ट्री, कॉल डिटेल रेकॉर्ड, आर्थिक व्यवहार तसेच इतर डिजिटल माहितीची पडताळणी सुरू असल्याचे समजते. चौकशीदरम्यान त्याच्या संपर्कात असलेल्या व्यक्तींची माहितीही तपास यंत्रणांनी गोळा केली आहे. प्राथमिक माहितीनुसार, सोशल मीडियाच्या माध्यमातून पाकिस्तानस्थित गँगस्टर शहजाद भट्टीच्या संपर्कात असल्याचा संशय या कारवाईमागे असल्याचे सांगितले जात आहे. तपास यंत्रणांच्या मते, सोशल मीडिया, एन्क्रिप्टेड मेसेजिंग ॲप्स आणि इतर डिजिटल माध्यमांचा वापर करून काही भारतीय तरुणांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला असावा. आर्थिक प्रलोभने, परदेशात नोकरीची आश्वासने किंवा इतर आमिषे दाखवून देशविरोधी




कारवायांकडे वळविण्याचा प्रयत्न होत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याच पार्श्वभूमीवर राज्यभरातील संशयित संपर्कांची पडताळणी सुरू आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, पाकिस्तानातील लाहोरचा रहिवासी असलेला शहजाद भट्टी सध्या दुबईतून कथित गुन्हेगारी नेटवर्क चालवत असल्याचा तपास यंत्रणांचा संशय आहे. डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून भारतीय तरुणांपर्यंत पोहोचून त्यांना गुन्हेगारी तसेच देशविरोधी कारवायांमध्ये ओढण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. गेल्या काही महिन्यांत हेरगिरी, दहशतवादी भरती आणि संवेदनशील माहिती गोळा करण्याशी संबंधित विविध तपासांमध्ये त्याचे नाव समोर आल्याचेही सांगितले जात आहे.

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने अलीकडेच शहजाद भट्टीशी संबंधित दोन संशयित गटांचा पर्दाफाश करून दिल्ली आणि पंजाबमधून सहा जणांना अटक केली होती. तपासात काही संशयितांनी दिल्लीतील महत्त्वाच्या ठिकाणांची रेकी करून त्याचे व्हिडिओ प्रतिबंधित मेसेजिंग ॲपद्वारे परदेशात पाठवल्याची बाब समोर आली होती. त्यानंतर महाराष्ट्र एटीएसनेही राज्यभर सुमारे १५० संशयित ठिकाणी एकाचवेळी शोधमोहीम सुरू केली आहे. वर्ध्यातील कारवाई ही त्याच व्यापक मोहिमेचा भाग असल्याचे मानले जात आहे. दरम्यान, वर्ध्यात ताब्यात घेण्यात आलेल्या दोन्ही संशयितांचा या प्रकरणाशी नेमका किती संबंध आहे, याबाबत एटीएसने अद्याप कोणतीही अधिकृत माहिती जाहीर केलेली नाही. तपासाच्या हितासाठी अधिक तपशील गोपनीय ठेवण्यात आला असून, चौकशी पूर्ण झाल्यानंतरच वस्तुस्थिती स्पष्ट होणार आहे. त्यामुळे या टप्प्यावर संशयितांविषयी कोणताही अंतिम निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नसल्याचे तपास यंत्रणांनी स्पष्ट केले आहे. सायंकाळपर्यंत एटीएसचे पथक दोन्ही संशयितांची सखोल चौकशी करत होते आणि त्यांच्या डिजिटल व्यवहारांचा तपास सुरू होता. या कारवाईमुळे वर्धा जिल्ह्यात एकच खळबळ उडाली असून, राज्यातील सुरक्षा यंत्रणांनी सोशल मीडियाद्वारे होणाऱ्या संशयास्पद संपर्कांवर अधिक बारीक लक्ष केंद्रित केल्याचे स्पष्ट झाले आहे.

# नाकेबंदीत दारूतस्कर जाळ्यात ३.६७ लाखांचा विदेशी मद्यसाठा आणि वाहन जप्त

## -पंचवटी-उल्हापूर नाक्यावर पोलिसांची धडक कारवाई; वर्ध्यातील युवक ताब्यात



**आर्वी जनमाध्यम :** आर्वी तालुक्यातील पंचवटी-उल्हापूर नाका येथे पोलिसांनी नाकेबंदीदरम्यान धडक कारवाई करत विदेशी मद्याची अवैध वाहतूक उघडकीस आणली. या कारवाईत ३ लाख ६७ हजार रुपयांचा विदेशी मद्यसाठा आणि वाहन जप्त करण्यात आले असून, शेख साहिल उर्फ शेख शब्बीर (वय २६, रा. आनंदनगर, वर्धा) याला ताब्यात घेण्यात आले आहे.

नाकेबंदीदरम्यान संशयित वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १८० मिली क्षमतेच्या विदेशी मद्याच्या १९२ बाटल्या आढळून आल्या. पोलिसांनी मद्यसाठ्यासह वाहन जप्त करून एकूण ३ लाख ६७ हजार रुपयांचा मुद्देमाल ताब्यात घेतला.

या विदेशी मद्याची तस्करी नेमकी कुठून करण्यात आली होती आणि हा साठा आर्वी शहरात कोणाकडे पोहोचविला जाणार होता, याचा पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे. या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात असून, तपासाची व्याप्ती वाढविण्यात आली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे आणि पोलीस उपअधीक्षक प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सतीश डेहनकर यांच्या नेतृत्वात गजानन वडनेरकर, अमित जुवारे, निलेश करडे आणि भूषण इखार यांनी संयुक्तपणे पार पाडली.

विदेशी मद्याच्या अवैध वाहतुकीविरोधात पोलिसांनी उचललेल्या या कारवाईमुळे दारूतस्करांचे धाबे दणाणले असून, अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

# मोबाईलच्या विळख्यात हरवतंय बालपणः पालकांनो वेळीच सावध व्हा

## अंगणवाडीतील गणवेश वाटप कार्यक्रमात खा.अमर काळे यांचे भावनिक आवाहन

**सेलू जनमाध्यम :** मोबाईलच्या अतिवापरामुळे लहान मुलांचे बालपण धोक्यात आले असून त्यांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. पालकांनी मुलांना मोबाईलच्या व्यसनापासून दूर ठेवून त्यांना संस्कार खेळ आणि शिक्षणाकडे वळवावे असे कळकळीचे आवाहन खासदार अमर काळे यांनी केले. खडकी आमगाव आणि कोटंबा येथील अंगणवाडी विद्यार्थ्यांच्या गणवेश वाटप कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमात खासदार काळे यांनी चिमुकल्यांशी संवाद साधत आयोजक सतीश भावरकर यांच्या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले. समाजात अनेकांकडे संपत्ती असते मात्र समाजाला काहीतरी परत देण्याची दानत सर्वांकडे नसते. सलग दुसऱ्या वर्षी अंगणवाडीतील विद्यार्थ्यांसाठी गणवेश वाटप करून सतीश भावरकर यांनी सामाजिक बांधिलकी जपल्याचे सांगत त्यांचे अभिनंदन केले.



यावेळी खासदार काळे यांनी मोबाईलच्या वाढत्या वापराबाबत पालकांना सावध केले. आजची लहान मुले मोबाईलच्या आहारी जात असून त्याचा त्यांच्या मानसिक विकासावर विपरीत परिणाम होत आहे. विविध संशोधनांनुसार मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये एकाग्रतेचा अभाव चिडचिड नैराश्य आणि मानसिक तणाव वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे मुलांच्या हातात मोबाईल देण्याऐवजी त्यांच्यासोबत वेळ घालवा. त्यांना मैदानी खेळ वाचन आणि सर्जनशील उपक्रमांची सवय लावा असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाला प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे माजी सचिव शेखरभाऊ शेंडे शैलेंद्र दप्तरी रेणुकाताई कोटंबकर आचल बांगरे चांदणी शिवरकर हमीद अली राजेंद्र मिश्रा चुडानंद हांडे सौरभ शेळके गणेश खोपडे हनिफ सैयद सतीश भावरकर अर्चनाताई भोमले यांच्यासह परिसरातील पालक महिला आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दुकानासमोरून दुचाकी लंपास करणारा चोरटा एलसीबीच्या जाळ्यात

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील आर्वी नाका परिसरातून दुकानासमोर उभी असलेली दुचाकी चोरी करणाऱ्या चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) जेरबंद करत ४० हजार रुपये किमतीची दुचाकी जप्त केली. या कारवाईमुळे दुचाकी चोरीच्या गुन्ह्याचा छडा लागला आहे.

सानेवाडी येथील ललित गांधी यांचे आर्वी नाका येथे व्यावसायिक प्रतिष्ठान असून, दुकानासमोर उभी केलेली त्यांची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली होती. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान एलसीबीच्या पथकाने चंद्रकांत उर्फ चंदू गोपाळ दाभणे (वय ४६, रा. डेहनकर ले-आऊट, वर्धा) याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने दुचाकी चोरीची कबुली दिली. त्याच्याकडून ४० हजार रुपये किमतीची चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली.

ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक विनोद चौधरी, पोलिस उपनिरीक्षक राहुल इटेकार तसेच सचिन इंगोले, विक्रम काळमेघ, अरविंद इंगोले आणि राहुल अधवाल यांनी केली.

# चौका-चौकांत मोकाट कळपांचा विळखा, अपघाताचे वाढते संकट

## वाहनचालक हैराण, नागरिकांची मागणी-जनावरे तातडीने बंदिस्त करा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरातील प्रमुख चौक आणि मुख्य रस्त्यांवर मोकाट जनावरांचा अक्षरशः सुळसुळाट झाला असून वाहनचालक, पादचारी आणि नागरिकांना रोजच जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. चौका-चौकांत जनावरांचे कळप ठाण मांडून उभे राहत असतानाही नगरपालिका प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.



छत्रपती शिवाजी महाराज चौक, जमनालाल बजाज चौक, लालबहादूर शास्त्री चौक, इंदिरा गांधी चौक, महात्मा गांधी चौक, पावडे चौक तसेच आर्वी नाका परिसरात मोकाट जनावरांचे कळप रस्त्यावर वावरताना दिसतात. भरधाव वाहनांसमोर अचानक जनावरे आल्याने वाहनचालकांची मोठी तारांबळ उडते. अनेकदा वाहतूक विस्कळीत होत असून किरकोळ अपघातांच्या घटनाही घडत आहेत. मोठा अपघात झाल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. वाहतुकीची कोंडी, अपघाताचा धोका आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असतानाही संबंधित विभागाकडून कोणतीही प्रभावी कारवाई होत नसल्याचे चित्र आहे. मोकाट जनावरांना पकडून गोशाळेत किंवा कोंडवाड्यात हलविण्याची जबाबदारी असलेल्या नगरपालिकेला शहरातील नागरिकांनी तातडीने विशेष मोहीम राबवून मोकाट जनावरे बंदिस्त करावीत, प्रमुख चौक जनावरांपासून मुक्त करावेत आणि नागरिकांना सुरक्षित वाहतुकीचा हक्क मिळवून द्यावा, अशी मागणी केली आहे.

# सभागृहात गोंधळ अन् कामकाज ठप्प; वर्धा पालिकेची सभा रद्द

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत शुक्रवारी सुरुवातीलाच मोठा गदारोळ झाला. मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा मुद्दा विषयसूचीत समाविष्ट नसल्याचा आक्षेप घेत नगरसेवकांनी तीव्र विरोध दर्शविला. प्रथम इतिवृत्त मंजुरीचा विषय घ्या, त्यानंतरच पुढील कामकाज सुरू करा, अशी एकमुखी मागणी करत नगरसेवकांनी सभागृहात जोरदार घोषणाबाजी केली. अखेर सुमारे अर्धा तास चाललेल्या गोंधळानंतर प्रशासनाला सर्वसाधारण सभा रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागला.

शुक्रवारी नगरपालिकेच्या सभागृहात सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेची विषयसूची यापूर्वी सर्व निवडून आलेल्या व स्वीकृत नगरसेवकांना देण्यात आली होती. मात्र, सभा सुरू होताच काही नगरसेवकांनी विषयसूचीत मागील सभेचे इतिवृत्त कायम करण्याचा मुद्दा नसल्याचे निदर्शनास आणून दिले. ही प्रक्रिया नियमबाह्य असल्याचा आरोप करत त्यांनी सभेच्या कामकाजास तीव्र विरोध केला.

नगरसेवकांनी प्रथम मागील सभेचे इतिवृत्त मंजुरीसाठी विषयसूचीत समाविष्ट करावे आणि त्यानंतरच इतर विषयांवर चर्चा करावी, अशी भूमिका घेतली. या मागणीवरून सभागृहात जोरदार गदारोळ झाला. वातावरण चांगलेच तापल्याने प्रशासनाने कामकाज पुढे नेणे अशक्य असल्याचे लक्षात घेऊन अखेर सभा रद्द करण्याची घोषणा केली. लोकप्रतिनिधी निवडून आल्यानंतर वर्धा नगरपालिकेची ही चौथी सर्वसाधारण सभा होती. मात्र, सुरुवातीलाच निर्माण झालेल्या वादामुळे कोणत्याही विषयावर चर्चा न होता सभा तहकूब करावी लागल्याने पालिकेच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



वर्धा नगरपालिकेत निवडून आलेले व स्वीकृत असे एकूण ४४ नगरसेवक आहेत. शुक्रवारी झालेल्या सभेस नगराध्यक्षांसह ४१ लोकप्रतिनिधी उपस्थित होते. नगरसेविका वंदना भुते, सोनाली तडसे, शेख तरन्नुम शेख नवशाद तसेच स्वीकृत नगरसेवक कमलेश आकरे हे सभेला अनुपस्थित होते.

# विठुरायाच्या भेटीसाठी धावली एसटी:वारकऱ्यांच्या सेवेसाठी रापम सज्ज

## -आषाढी एकादशीनिमित्त वर्धा विभागातून विशेष बससेवा

**वर्धा जनमाध्यम :** ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषात पंढरीची वाट धरलेल्या वारकऱ्यांच्या सेवेसाठी राज्य परिवहन महामंडळही सज्ज झाले आहे. आषाढी एकादशीनिमित्त विठ्ठल-रुख्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरला जाणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन वर्धा विभागाने विशेष बससेवेचे नियोजन केले आहे. वर्धा विभागातील पाच आगारांतून पंढरपूरसाठी विशेष बसगाड्या धावणार असून आतापर्यंत १० बसेसचे आगाऊ बुकिंग झाले आहे. भाविकांची मागणी वाढल्यास 'मागेल त्याला बस' या तत्त्वावर अतिरिक्त बसेस उपलब्ध करून देण्याची तयारी परिवहन महामंडळाने केली आहे.

आषाढी एकादशी हा वारकरी संप्रदायासाठी श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाचा महासोहळा मानला जातो. लाखो वारकरी पायी दिंड्यांमधून विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करतात. मात्र ज्येष्ठ नागरिक, महिला, लहान मुले तसेच पायी वारी करणे शक्य नसलेल्या भाविकांसाठी एसटीची विशेष बससेवा मोठा आधार ठरते. याच पार्श्वभूमीवर राज्य परिवहन महामंडळाने यंदाही व्यापक नियोजन केले आहे.



वर्धा, पुलगाव, हिंगणघाट, आर्वी आणि तळेगाव या पाच आगारांतून पंढरपूरसाठी विशेष बसेस सोडण्यात येणार आहेत. यंदा सुमारे १२० विशेष बसेस उपलब्ध ठेवण्याचा विभागाचा मानस असून प्रवाशांची संख्या वाढल्यास अतिरिक्त बसगाड्याही तत्काळ उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे कोणत्याही भाविकाला प्रवासासाठी अडचण येणार नसल्याचा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही जिल्ह्यातील हजारो भाविक विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरला रवाना होणार आहेत. सुरक्षित, किफायतशीर आणि विश्वासार्ह प्रवासामुळे एसटीला भाविकांची नेहमीच पसंती मिळते. त्यामुळे इच्छुकांनी आगाऊ बुकिंग करून आपल्या प्रवासाचे नियोजन करावे, असे आवाहन परिवहन महामंडळाने केले आहे. यासाठी संबंधित आगार प्रमुख किंवा बसस्थानक प्रमुखांशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले आहे.

> आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरला दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक जातात. त्यांच्या सुरक्षित आणि सुखकर प्रवासासाठी विशेष बससेवेचे नियोजन करण्यात आले आहे. मागणीनुसार अतिरिक्त बसेसही उपलब्ध करून दिल्या जातील. भाविकांनी आगाऊ बुकिंग करून या सुविधेचा लाभ घ्यावा.
>
> – **भगवान जगनोर,** विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, वर्धा

# मागण्यांसाठी आशा अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन

## काळा दिवस पाळत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न

**वर्धा जनमाध्यम :** विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आशा सेविका गटप्रवर्तक अंगणवाडी सेविका मदतनिस आणि स्त्री परिचारिकांनी शुक्रवारी सिव्हील लाईन येथील महात्मा गांधी पुतळा परिसरात धरणे आंदोलन केले. सिटू संलग्न आशा व गटप्रवर्तक कर्मचारी संघटना तसेच अंगणवाडी कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वात झालेल्या आंदोलनात काळा दिवस पाळून शासनाच्या धोरणांचा निषेध करण्यात आला.

आंदोलनकर्त्यांनी संसदेत ११ मार्च २०२५ रोजी दिलेल्या आश्वासनानुसार वाढीव प्रोत्साहन भत्ता थकबाकीसह तातडीने द्यावा अशी मागणी केली. नियमितीकरण होईपर्यंत किमान वेतन लागू करावे. वेतन ग्राहक किंमत निर्देशांकाशी जोडावे. प्रोत्साहन रक्कम दरवर्षी वाढवावी. सहा महिन्यांची प्रसूती रजा वीस दिवसांची सवेतन किरकोळ रजा तसेच वैद्यकीय रजा मंजूर करावी. पेन्शन योजना लागू होईपर्यंत सामाजिक सुरक्षा लाभ द्यावेत अशीही मागणी करण्यात आली.

आरोग्य क्षेत्राचे खासगीकरण थांबवावे. चारही कामगार संहिता व श्रमशक्ती धोरण २०२५ मागे घ्यावे.

आशा सेविका अंगणवाडी सेविका व मदतनिसांना कामगार कायद्याच्या कक्षेत आणावे. बीएलओ सहाय्यक बीएलओ किंवा इतर अतिरिक्त कामांची सक्ती करू नये अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

व्हीएचएनएससी ग्राम स्वच्छता व पाणीपुरवठा समितीच्या सचिवपदाची जबाबदारी आशा सेविकांवर टाकल्यामुळे कामाचा ताण वाढत असल्याचे सांगत ही जबाबदारीही काढून घ्यावी अशी मागणी करण्यात आली. आंदोलनानंतर विविध मागण्यांचे निवेदन जिल्हा प्रशासनाला सादर करण्यात आले.

आंदोलनात जिल्ह्यातील मोठ्या संख्येने आशा सेविका गटप्रवर्तक अंगणवाडी सेविका मदतनिस आणि स्त्री परिचारिका सहभागी झाल्या. शासनाने प्रलंबित मागण्यांवर तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# अमरावतीचा चोर वर्ध्यात जेरबंद; चोरीच्या दोन दुचाकी जप्त

## आरोपीला तीन दिवसांची पोलिस कोठडी

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे दुचाकी चोरी करणाऱ्या अमरावतीतील सराईत चोरट्याला अटक करत चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणले. आरोपीकडून चोरीच्या दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या असून, न्यायालयाने त्याला तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

समतानगर येथील धर्मपाल पाटील यांची एमएच-३२ एजी-३९९९ क्रमांकाची दुचाकी बजाज चौकातून चोरीला गेल्यानंतर त्यांनी शहर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. पोलिस निरीक्षक नागेशकुमार चतरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने तपास सुरू करत परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने विश्लेषण केले. या तपासातून आरोपीचा माग काढण्यात पोलिसांना यश आले. त्यानंतर अमरावती पोलिसांच्या मदतीने सय्यद



दानिश अली सय्यद जावेद अली (वय २७, रा. आझादनगर, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडून चोरीची दुचाकी जप्त करण्यात आली. पोलिस कोठडीत चौकशीदरम्यान आरोपीने सुमारे अडीच महिन्यांपूर्वी जेल रोड परिसरातून एमएच-२७ बीडी-७८८० क्रमांकाची आणखी एक दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. या कारवाईमुळे शहरातील दुचाकी चोरीच्या दोन गुन्ह्यांचा छडा लागला असून, आरोपीने अन्य ठिकाणीही अशाच प्रकारचे गुन्हे केले आहेत का, याचा तपास शहर पोलिसांकडून सुरू आहे. ही कारवाई पोलिस उपनिरीक्षक शरद गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली राजेंद्र हाडके, प्रशांत वंजारी, नरेंद्र कांबळे, वैभव जाधव, श्रावण पवार, राजेश डाळ, संतोष ईघरे आणि चेतन दुबे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.


**NAME CHANGE**

माझे पूर्वी **ASMA BANO MOHD ASIF** असे नाव होते. माझ्या आधार व पॅन कार्ड वरील **ASMA SHADAB KHAN** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-**
हिंद नगर वर्धा ४४२००१

**NAME CHANGE**

माझे पासपोर्ट नंबर K7570359 वरील माझे **REHANA BANO HUSSAIN** असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व बँक पासबुक वरील **REHANA AZHER SAIFEE** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता :-**
शिवाजी वॉर्ड हिंगणघाट वर्धा ४४२३०१

# आमदारांच्या जेवणात निघाली माशी

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या राज्यभर अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या नेतृत्त्वात विविध हाटेल्स, पदार्थ विक्रीचे प्रतिष्ठान, कारखान्यांवर धडक मोहिम सुरू आहे. मात्र, विधानभवनात आमदारांना पुरविण्यात येणा-या जेवणापर्यंत त्यांचा विभाग पोहोचला नसल्याची खंत आज आमदारांनीही व्यक्त केली असेल. चक्क आमदारांना पुरविण्यात येणा-या जेवणात माशी निघाल्याचा धक्कादायक प्रकार पुढे आला. या प्रकरणाची अखेर विधानसभा अध्यक्षांनाही दखल घ्यावी लागली.

सध्या मुंबईत पावसाळी अधिवेशन सुरू आहे. आज, शुक्रवारी अधिवेशनाचा शेवटचा दिवस आहे. अनेक आमदार परतीच्या वाटेवर आहेत. परंतु जे थांबले, त्यांच्या जेवणात चक्क माशी निघाल्याने खळबळ माजली आहे. विधान भवनातील आमदारांना पुरविण्यात आलेल्या जेवणात रिसोडचे आमदार अमित झनक यांच्या जेवणात माशी आढळल्याचा अत्यंत धक्कादायक आणि गंभीर प्रकार पश्चिम नागपूरचे आमदार विकास ठाकरे यांनी विधानसभेत उघडकीस आणला. या घटनेमुळे विधान भवनातील अन्नसुरक्षा व्यवस्थेवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.



अन्न सुरक्षेवर प्रश्न उपस्थित ज्या विधान भवनात राज्याच्या जनतेचे प्रतिनिधित्व करणा-या आमदारांनाच सुरक्षित व स्वच्छ अन्न मिळत नाही, त्या राज्यातील कोट्यवधी नागरिकांच्या अन्नसुरक्षेची हमी शासन कशी देणार? असा थेट सवाल उपस्थित करीत विकास ठाकरे यांनी सरकारला धारेवर धरले. ही केवळ एका आमदाराच्या जेवणातील माशीची घटना नसून, राज्यातील अन्नसुरक्षा व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारी बाब असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**विधानसभा अध्यक्षांनी दिले चौकशीचे आदेश**

या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेत विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी हा विषय अत्यंत गंभीर असल्याचे सभागृहात नमूद केले. संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून विधानभवनस्तरावर आवश्यक त्या सुधारात्मक उपाययोजना तातडीने राबविण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले. महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकापर्यंत सुरक्षित, स्वच्छ व दर्जेदार अन्न पोहोचविणे ही महाराष्ट्र शासनाची घटनात्मक व नैतिक जबाबदारी आहे. मात्र, राज्याच्या सर्वोच्च लोकशाही संस्थेतील विधान भवनातच आमदारांना निकृष्ट दर्जाचे व असुरक्षित अन्न पुरविले जात असेल, तर संपूर्ण राज्यातील अन्नसुरक्षा यंत्रणेच्या कार्यक्षमतेबाबत गंभीर शंका निर्माण होणे स्वाभाविक आहे.

## महाराष्ट्रात एटीएसची राज्यव्यापी धाडसत्र

### पाकिस्तानी ISI हँडलर शहजाद भट्टीशी सोशल मीडियाद्वारे संपर्काच्या संशयावरून कारवाई




**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) शुक्रवारी राज्यातील विविध ठिकाणी एकाचवेळी धाडसत्र राबवले. पाकिस्तानस्थित क्ष्क्ष हँडलर शहजाद भट्टी याच्याशी सोशल मीडियाद्वारे संपर्कात असल्याच्या संशयावरून काही व्यक्तींविरुद्ध ही कारवाई करण्यात आली.

एटीएसने दिलेल्या माहितीनुसार, मुंबई, ठाणे, कुर्ला, वांद्रे, जोगेश्वरी, नवी मुंबई, मीरा रोड, भाईंदर, सांगली, सातारा आणि छत्रपती संभाजीनगरसह अनेक ठिकाणी शोधमोहीम सुरू आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून शहजाद भट्टीच्या संपर्कात असल्याचा संशय असलेल्या व्यक्तींच्या हालचालींची चौकशी केली जात आहे.

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने बुधवारी पाकिस्तानस्थित क्ष्क्ष हँडलर शहजाद भट्टीशी संबंधित दोन कथित माड्यूलचा पर्दाफाश करत दिल्ली आणि पंजाबमधून सहा संशयितांना अटक केली होती. त्यानंतर महाराष्ट्र एटीएसनेही या प्रकरणाशी संबंधित तपासाचा भाग म्हणून राज्यात धाडी टाकल्या.तपासादरम्यान आरोपींकडून मिळालेल्या माहितीनुसार, शहजाद भट्टीच्या सूचनेनुसार दिल्लीतील महत्त्वाच्या ठिकाणांवर पेट्रोल बाम्ब हल्ल्याचा कट रचण्यात आल्याचा संशय आहे. या कटासाठी सिव्हिल लाइन्समधील न्यू पोलिस लाइन्स, आनंद विहार आंतरराज्य बसस्थानक एका रेल्वे स्थानकासह दिल्लीतील गर्दीच्या बाजारपेठांची रेकी करण्यात आली होती. आरोपींच्या मोबाईल फोनमधून या ठिकाणांचे व्हिडिओ जप्त करण्यात आले असून, ते प्रतिबंधित मेसेजिंग ॲपद्वारे शहजाद भट्टीला पाठविण्यात आल्याचे तपासात समोर आले आहे.तपासादरम्यान मिळालेल्या सोशल मीडिया चॅटमधून शहजाद भट्टी हा आरोपी दानिश उर्फ चांद मियाँ याला साहित्याची डिलिव्हरी आणि साठवणुकीबाबत सूचना देत असल्याचे आढळल्याचे सूत्रांनी सांगितले. तपास यंत्रणांच्या मते, या साहित्याचा संबंध हल्ल्यासाठी वापरल्या जाणा-या पेट्रोल बाम्बशी असू शकतो. यापूर्वी दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने राजघाटमागील विजय घाट परिसरातून पेट्रोल बाम्ब जप्त केले होते.अधिका-यांच्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेले सहाही आरोपी पाकिस्तानातील आणखी दहा व्यक्तींच्या संपर्कात होते. हे सर्वजण शहजाद भट्टीसाठी काम करत असल्याचा संशय असून, या व्यापक कटातील त्यांच्या भूमिकेचा तपास सुरू आहे.तपास अधिका-यांच्या म्हणण्यानुसार, दानिश उर्फ चांद मियाँ याच्यावर दिल्लीतील संभाव्य हल्ल्यांसाठी रेकी आणि नियोजनाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. हे ऑपरेशन यशस्वी झाल्यास त्याला २० हजार रुपयांचे मानधन देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्याचा साथीदार सलमान याच्यावर हल्ल्याचे चित्रीकरण करून त्याचे फुटेज शहजाद भट्टीकडे पाठविण्याची जबाबदारी होती. तर तैयब याच्यावर शस्त्रास्त्रांची खेप स्वीकारणे आणि ती विक्रीसाठी पुढे पाठविण्याचे काम सोपविण्यात आले होते. याशिवाय, झुबैर खान याने अमृतसरहून शस्त्रास्त्रांची खेप पोहोचवल्याचा संशय आहे. अली फजल याच्यावर शस्त्रास्त्रांच्या विक्रीची जबाबदारी होती, तर मलकीत सिंह याने पाकिस्तानातून ड्रोनद्वारे टाकण्यात आलेली शस्त्रास्त्रे नेटवर्कमधील इतर सदस्यांपर्यंत पोहोचवल्याचा आरोप आहे. या कथित आंतरराष्ट्रीय नेटवर्कचा तसेच पाकिस्तानस्थित इतर हँडलर्सच्या भूमिकेचाही तपास सुरू आहे.

## इराण विरोधातील संघर्ष अद्याप संपलेला नाही; नेतान्याहूंचा मोठा इशारा

**जेरु सलेम/वृत्तसंस्था :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका-इराण युद्धविराम करार संपुष्टात आल्याचे घोषित केल्यानंतर मध्यपूर्वेतील तणाव पुन्हा एकदा शिगेला पोहोचला आहे. दरम्यान, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी गुरुवारी मोठे वक्तव्य करत इशारा दिला की इराणसोबतचा संघर्ष अद्याप संपलेला नाही आणि इस्रायलसमोर नव्या सुरक्षा आव्हानांचा सामना उभा आहे. नेतान्याहू यांचे हे वक्तव्य अशा वेळी आले आहे, जेव्हा अलीकडेच पाकिस्तानच्या मध्यस्थीने झालेला शांतता करार पूर्णपणे कोलमडला आहे. त्यामुळे दोन्ही देशांमधील मोठ्या प्रमाणावरील संघर्षाची शक्यता पुन्हा वाढली आहे.हात्झोरिम हवाई तळावर आयोजित इस्रायली हवाई दलाच्या दीक्षांत समारंभात बोलताना बेंजामिन नेतान्याहू यांनी राष्ट्रीय सुरक्षेबाबत देशाची भूमिका स्पष्ट केली. त्यांनी सांगितले की इस्रायली हवाई दलाचे वर्चस्व कायम राखणे हा देशाच्या संरक्षण धोरणाचा सर्वात महत्त्वाचा भाग आहे. मध्यपूर्वेत स्थैर्य आणि शांतता टिकवून ठेवण्यासाठी इस्रायली हवाई दल मजबूत असणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. नेतान्याहू यांचा हा कठोर इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या त्या विधानानंतर आला आहे, ज्यामध्ये ट्रम्प यांनी बुधवारी स्पष्ट केले की इराणसोबत पाकिस्तानच्या मध्यस्थीने तयार करण्यात आलेला सहमती करार आता पूर्णपणे रद्द झाला आहे. ट्रम्प यांच्या या घोषणेमुळे दोन्ही देशांमधील वैर थांबवण्यासाठी करण्यात आलेले सर्व राजनैतिक प्रयत्न निष्फळ ठरले आहेत. पंतप्रधान



नेतान्याहू यांच्या भूमिकेला पाठिंबा देत इस्रायली संरक्षण दलाचे प्रमुख लेफ्टनंट जनरल एयाल झामिर यांनीही लष्करी तयारीबाबत महत्त्वाचे विधान केले. त्यांनी स्पष्ट केले की इराणविरोधातील लष्करी मोहीम अद्याप संपलेली नाही.झामिर यांनी सांगितले की आगामी मोहिमांसाठी नव्या लष्करी योजना आधीच तयार करण्यात आल्या आहेत. त्यांनी इशारा देत म्हटले की, येत्या काळात आपल्याला आणखी अनेक मोठ्या लष्करी कारवायांचा सामना करावा लागू शकतो.







## देशभर मुसळधार पावसाचा कहर; उत्तराखंड, हिमाचल, उत्तर प्रदेशसह अनेक राज्यांत जनजीवन विस्कळीत

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशभरात सुरू असलेल्या मुसळधार मान्सून पावसामुळे अनेक राज्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर हानी झाली असून पूरस्थिती, भूस्खलन, घर कोसळण्याच्या घटना आणि वीज कोसळल्यामुळे अनेक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. उत्तराखंड, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, दिल्ली, राजस्थान आणि गुजरात या राज्यांमध्ये पावसाने जनजीवन पूर्णपणे विस्कळीत केले आहे. दिल्लीत गुरुवारी मुसळधार पावसामुळे चार जणांचा मृत्यू झाला, तर उत्तर प्रदेशात पाउस आणि वीज कोसळल्याच्या विविध घटनांमध्ये किमान १९ जणांचा जीव गेला आहे. केरळमधील वायनाड येथे ७ जुलै रोजी झालेल्या भूस्खलनातील मृतांचा आकडा सहावर पोहोचला आहे. उत्तराखंड हे सर्वाधिक प्रभावित राज्य ठरले असून डोंगराळ भागात मोठ्या प्रमाणावर भूस्खलन झाल्याने १०७ संपर्क मार्ग बंद झाले आहेत. त्यामुळे चारधाम यात्रेवरही परिणाम झाला आहे. हवामान विभागाने राज्यातील अनेक जिल्ह्यांसाठी रेड अलर्ट जारी केला असून देहरादून, पौडी, टिहरी, चमोली, रुद्रप्रयाग, हरिद्वार, नैनीताल, उधमसिंहनगर, चंपावत आणि बागेश्वर जिल्ह्यांतील बारावीपर्यंतच्या सर्व शाळा आणि अंगणवाडी केंद्रांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. हिमाचल प्रदेशातील किन्नौर जिल्ह्यात अचानक आलेल्या पुरामुळे १०० फूट लांबीचा लोखंडी पूल पाण्याखाली गेला असून काही गावे बाहेरील संपर्कापासून तुटली आहेत. राज्यात मुसळधार पावसामुळे ७५ रस्ते बंद करण्यात आले आहेत. उत्तर प्रदेशात बुलंदशहरमध्ये घराची भिंत कोसळून एका कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला, तर गाझियाबादमध्ये पाण्यात बुडून दोन लहान मुलांचा मृत्यू झाला. तर पूर्वांचमधील चार जिल्ह्यांमध्ये वीज कोसळल्याने सात जणांचा मृत्यू झाला आहे.राजस्थानातील धौलपूर येथे मुसळधार पावसामुळे घर कोसळून सहा जण ढिगा?याखाली अडकले, तर अजमेर जिल्ह्यातही कच्चे घर कोसळल्याची घटना घडली. पावसामुळे राज्यातील सहा रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या असून अनेक गाड्या उशिराने धावत आहेत. दिल्ली-एनसीआरमध्ये सततच्या पावसामुळे अनेक रस्त्यांवर पाणी साचले असून वाहतुकीवर मोठा परिणाम झाला आहे. काही भागांत २४ ते ३० तासांत १०० ते १६० मिमीपर्यंत पावसाची नोंद झाली आहे. सफदरजंग हवामान केंद्रातही विक्रमी पावसाची नोंद झाली असून शुक्रवारपासून पावसाचा जोर काहीसा कमी होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे.गुजरातमध्येही मुसळधार पावसामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून सुरतसह विविध भागांत पावसाशी संबंधित घटनांमध्ये नउ जणांचा मृत्यू झाला आहे. पूरस्थितीमुळे सुमारे ३,९०० नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. दुसरीकडे मध्य प्रदेशात मात्र पुढील तीन ते चार दिवस मान्सूनची तीव्रता कमी राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला असून केवळ पन्ना आणि सतना जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. भोपालसह राज्यातील बहुतांश भागांत हलक्या सरी आणि मेघगर्जनेची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

## बूट कारखान्यात आग; 28 जणांचा मृत्यू

**बीजिंग/वृत्तसंस्था :** चीनमधील एका बूट उत्पादन कारखान्याला लागलेल्या भीषण आगीत २८ कामगारांचा मृत्यू झाला आहे. चीनच्या जिनजियांग शहरातील एका बूट कारखान्यात गुरुवारी आग लागली. या दुर्घटनेत कारखान्यात काम करणा?या २८ जणांचा मृत्यू झाला, तर अनेकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, आग कारखान्याच्या पहिल्या मजल्यावर लागली आणि काही वेळातच तिने पाच मजली इमारतीला वेढले. याच इमारतीत कंपनीचे गोदाम आणि वेअरहाउसही होते. कारखान्यात बूट निर्मितीसाठी वापरल्या जाणा?या ज्वलनशील साहित्याचा मोठा साठा असल्याने आग झपाट्याने पसरली. अग्निशमन दलाने सुमारे चार तासांच्या प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. मात्र, तोपर्यंत २८ जणांचा मृत्यू झाला होता. आग लागली तेव्हा कारखान्यात सुमारे २३७ कर्मचारी काम करत होते. याशिवाय दोन अभ्यागतही (व्हिजिटर्स) उपस्थित होते. अग्निशमन आणि बचाव पथकांनी २१३ जणांना सुरक्षित बाहेर काढले, मात्र २८ जणांना वाचवता आले नाही.या घटनेनंतर पोलिसांनी कारखान्याच्या मालकाला अटक केली असून कंपनीची बँक खाती गोठविण्यात (फ्रीज) आली आहेत. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. चीनच्या आपत्कालीन व्यवस्थापन मंत्रालयाने सांगितले की, आग लागल्यानंतर बचाव आणि मदतकार्यांवर देखरेख ठेवण्यासाठी संयुक्त पथक जिनजियांग शहरात पाठविण्यात आले आहे. हे शहर पूर्व चीनमधील फुजियान प्रांतातील क्वानझोऊ परिसरात स्थित आहे.

### आशियाई अंडर-23 एथलेटिक्स चैंपियनशिप

## भारताने पहिल्याच दिवशी 1 सुवर्णासह 5 पदके जिंकली

ओरडोस (चीन)/ नवी दिल्ली, १० जुलै /**वृत्तसंस्था :** आशियाई अंडर-२३ एथलेटिक्स चॅंपियनशिप २०२६ मध्ये भारताने शानदार सुरुवात करत गुरुवारी पहिल्याच दिवशी एक सुवर्ण, एक रौप्य आणि तीन कांस्य



अशी एकूण पाच पदके आपल्या नावावर केली. भारताचे एकमेव सुवर्णपदक मिश्र ४X४०० मीटर रिले संघाने जिंकले.आस्तिक प्रधान, सॅंड्रा मोल साबू, सेतु मिश्रा आणि श्रावणी सचिन सांगले या भारतीय चौकडीने ३:१८.६४ सेकंदांची वेळ नोंदवत सुवर्णपदक पटकावले. हा भारतासाठी दिवसातील अखेरचा स्पर्धात्मक प्रकार होता. भारताला पहिले पदक भरतप्रीत सिंह यांनी मिळवून दिले. त्यांनी पुरुष डिस्कस थ्रोमध्ये ५२.९१ मीटरच्या सर्वोत्तम प्रयत्नासह कांस्यपदक जिंकले. चीनच्या ली झिक्सिन यांनी ६०.७९ मीटरसह सुवर्ण, तर त्यांच्याच देशातील जियांग जेहाओ यांनी ५९.६० मीटरसह रौप्यपदक जिंकले. पुरुषांच्या ५००० मीटर शर्यतीत भारताने दोन पदके मिळवली. शिवाजी परशुराम मदप्पागौडा यांनी १४:०८.१९ मिनिटांच्या वेळेसह रौप्यपदक जिंकले, तर विनोद सिंह यांनी १४:२३.६७ मिनिटांत शर्यत पूर्ण करत कांस्यपदक आपल्या नावावर केले. जपानच्या रुई सुझुकी यांनी १४:०१.२४ मिनिटांच्या वेळेसह सुवर्णपदक जिंकले. दिवसातील पाचवे पदक प्राची देवकर यांनी महिलांच्या ३००० मीटर स्टीपलचेस स्पर्धेत जिंकले. त्यांनी १०:३२.६९ मिनिटांची वेळ नोंदवत कांस्यपदक मिळवले. या स्पर्धेत चीनच्या यांग यीतिंग यांनी १०:१४.६८ मिनिटांच्या वेळेसह सुवर्ण, तर लियू युक्सिन यांनी १०:२५.५१ मिनिटांच्या वेळेसह रौप्यपदक जिंकले. आशियाई अंडर-२३ एथलेटिक्स चॅंपियनशिप स्पर्धेच्या पहिल्या आवृत्तीत भारताकडून ५३ खेळाडू सहभागी झाले आहेत.

## मला गप्प करायचे असेल तर आधी मला मारावे लागेल, ममता बॅनर्जींचा भाजपला थेट इशारा

**कोलकाता/वृत्तसंस्था :** पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी शुक्रवारी एक व्हिडिओ संदेश जारी केला. या व्हिडिओ संदेशात ममता बॅनर्जी यांनी भाजपवर जोरदार टीका करत सत्ताधारी पक्षावर तृणमूल कॉंग्रेस (टीएमसी)च्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना लक्ष्य केल्याचा आरोप केला. ममता बॅनर्जी म्हणाल्या, जर सत्ताधारी पक्षाला मला गप्प बसवायचे असेल किंवा टीएमसीचा अंत करायचा असेल, तर त्यासाठी आधी मला मारावे लागेल.

या व्हिडिओ संदेशात ममता बॅनर्जी यांनी टीएमसी पक्षात सुरू असलेल्या बंडखोरीबाबत आणि पक्षातील नेत्यांच्या कथित छळाबाबत आपली भूमिका मांडली. त्यांनी आरोप केला की भाजप त्यांच्या पक्षातील नेते आणि कार्यकर्त्यांना धमकावण्याचे व दडपण्याचे काम करत आहे. ममता बॅनर्जी म्हणाल्या की टीएमसीच्या अनेक नेत्यांवर हल्ले झाले असून त्यांचा अपमान करण्यात आला आहे. यामध्ये महुआ मोईत्रा, अभिषेक बॅनर्जी आणि कल्याण बॅनर्जी यांसारख्या वरिष्ठ नेत्यांचा समावेश आहे. ममता बॅनर्जी म्हणाल्या, तुम्ही कोणावर हल्ला केलेला नाही? तुम्ही महुआ, अभिषेक बॅनर्जी आणि कल्याण बॅनर्जी यांच्यावर हल्ला केला. तुम्ही माझ्या घरावरही हल्ला केला.व्हिडिओ संदेशात ममता बॅनर्जी यांनी दावा केला की त्यांच्या अनेक सहका-यांशी पोलीस कोठडीत अमानुष वर्तन करण्यात आले.



टीएमसी प्रमुख म्हणाल्या, माझे अनेक सहकारी तुरुंगात आहेत. त्यांना जमिनीवर झोपण्यास भाग पाडले जात आहे. काहींना कमरेला दोरखंड बांधून आणि पायांत बेड्या घालून फिरवले जात आहे. काहींची डोकी मुंडण करण्यात आली आहेत. अनेकांवर अत्यंत घृणास्पद वस्तू फेकण्यात आल्या आहेत, ज्यांचा उल्लेख करणेही लाजिरवाणे आहे.ममता बॅनर्जी यांचा हा व्हिडिओ संदेश अशा वेळी समोर आला आहे, जेव्हा टीएमसी पक्षाला मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. पक्षात अंतर्गत मतभेद आणि बंडखोरी उफाळून आली असून पक्षात फूट पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. बंडखोर आमदार ऋतब्रत बॅनर्जी यांना सुमारे ६० आमदारांचा पाठिंबा असल्याचे सांगितले जात आहे. गुरुवारी टीएमसीचे तीन माजी खासदार भाजपमध्ये दाखल झाले. यामध्ये सुष्मिता देव, सुखेंदू शेखर राय आणि प्रकाश चिक बराईक यांचा समावेश आहे. कोलकात्यातील साल्ट लेक येथील भाजप कार्यालयात या तिघांनी भाजपचे सदस्यत्व स्वीकारले. यानंतर ममता बॅनर्जी यांनी एका निवेदनात बंडखोर नेत्यांवर निशाणा साधत त्यांच्यावर पक्षाशी विश्वासघात केल्याचा आरोप केला होता. ममता बॅनर्जी म्हणाल्या, जे टीएमसी नेते गद्दारी करून भाजपमध्ये सामील झाले आहेत, त्यांना लोकांनी माफ करू नये. दोन होड्यांवर पाय ठेवण्याचा प्रयत्न करू नका. अजूनही मागे वळून पाहण्याची आणि या क्रूरतेकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

## निवृत्त होत असल्यास सदस्यांनी जनतेच्या हितासाठी केलेले काम मोलाचे-उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**मुंबई/प्रतिनिधी :** विधान परिषदेतून निवृत्त होत असलेल्या सदस्यांनी त्यांच्या कार्यकाळात जनतेच्या हितासाठी केलेले काम आणि विधान परिषदेच्या कामकाजात त्यांनी दिलेले योगदान मोलाचे असल्याचे प्रतिपादन एकनाथ शिंदे यांनी दिले. विधान परिषदेतून निवृत्त होत असलेले सदस्य सतीश चव्हाण, अरुण लाड, अभिजित वंजारी, किरण सरनाईक आणि जयंत आसगावकर या पाच सदस्यांना निरोप देण्यात आला. शिक्षण, सहकार, सामाजिक कार्य, शिक्षकांचे प्रश्न, युवकांचे प्रश्न आणि सर्वसामान्यांच्या हितासाठी सातत्याने आवाज उठविणा-या सदस्यांच्या कार्याचा गौरव करत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या सदस्यांच्या लोकसेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. ते म्हणाले, जनहिताच्या प्रश्नांवर सर्वांनी दाखविलेली बांधिलकी आणि सभागृहाच्या परंपरेचा जपणूक करण्याची भूमिका कायम स्मरणात राहील. जयंत आसगांवकर यांनी शिक्षक मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना शिक्षक, विद्यार्थी आणि शिक्षण क्षेत्रातील प्रश्न सातत्याने अभ्यासपूर्ण पद्धतीने मांडले. शिक्षण व्यवस्थेचा सखोल अभ्यास आणि शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत.सतीश चव्हाण यांनी विद्यार्थी, बेरोजगार युवक आणि मराठवाड्याच्या विकासाशी निगडित प्रश्न सातत्याने सभागृहात मांडले. युवकांना न्याय मिळावा आणि रोजगाराच्या संधी वाढाव्यात, यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केल्याचा उल्लेख उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी केला.अभिजित वंजारी यांनी सामान्य नागरिकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडले. विद्यार्थी चळवळ, शिक्षण, समाजकारण तसेच कोविड-१९ काळात वैद्यकीय मदत, अन्नधान्य आणि गरजूंना दिलेल्या सहाय्यामुळे त्यांनी लोकाभिमुख नेतृत्वाची ओळख निर्माण केल्याचे गौरवोद्‌गार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी काढले. अरुण लाड यांनी सहकार, शिक्षण आणि समाजकारण या क्षेत्रांत दिलेल्या योगदानाचा विशेष उल्लेख करत उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले सहकारी संस्थांबरोबरच रक्तदान शिबिरे, साक्षरता अभियान, महिला सक्षमीकरण, आरोग्य शिबिरे आणि पर्यावरण जनजागृतीसारख्या उपक्रमांमुळे त्यांनी समाजाशी कायमची नाळ जपली असल्याचे म्हणाले.किरण सरनाईक यांनी विधान परिषदेत विविध विषयांवर अभ्यासपूर्ण मांडणी करून लोकप्रतिनिधी म्हणून वेगळी ओळख निर्माण केली. त्यांच्या शांत, संयमी आणि अभ्यासू भूमिकेचेही उपमुखमंत्री शिंदे यांनी कौतुक केले.विधान परिषदेतून निवृत्त होणा-या. या सदस्यांनी लोकप्रतिनिधी म्हणून केलेल्या समर्पित कार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून सार्वजनिक जीवनातील त्यांची पुढील वाटचाल अधिक यशस्वी होवो, समाजसेवेची त्यांची परंपरा अशीच अखंड सुरू राहो आणि जनतेच्या सेवेसाठी त्यांचे योगदान भविष्यातही कायम राहो, अशा शुभेच्छा उपमुखमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्या.यावेळी अन्य सदस्यांसह निवृत्त होत असलेल्या सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



## ‘मी 'भाडे के टट्टू’ वाक्य मागे घेतो अन् ‘भाटक गर्दभ’ म्हणतो...’

### फडणवीस यांचा राज ठाकरेंवर निशाणा

**मुंबई/प्रतिनिधी :** आमचे मिमिक्री आर्टिस्ट मला म्हणायला लागले, हिंदीत का बोलले? पूर्ण भाषण मी मराठीतच केलं. पण मला काही अडचण नाही. ते आमचे मित्र आहेत आणि ते मित्र असल्यामुळे राजकारणात तर त्यांच्यापासून आम्हाला काही धोका नाही. पण आनंद आहे, ते राजकारणात आहेत. ते जर मिमिक्रीच्या क्षेत्रात गेले असते, तर एकाही स्टँड अप कामेडियनला या ठिकाणी मार्केट राहिल नसत. मुसळधार पावसाने मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील नव्याने बांधण्यात आलेल्या 'कनेक्टिंग लिंक'वर दरड कोसळून पुलाचे काही नुकसान झाले होते. कनेक्टिंग लिंकच्या द्वाराजवळच मोठ्या प्रमाणावर दगड आणि माती साचली होती. यामुळे हा मार्ग काही वेळ प्रवासासाठी बंद करण्यात आला होता. यासंदर्भात, विरोधकांनी सरकारवर कडाडून टीका करत कनेक्टिंग लिंकच्या दर्जावर प्रश्न उपस्थित केले होते. याला विधानसभेत उत्तर देताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदीमध्ये 'भाडे के टट्टू' असा शब्दप्रयोग केला होता.

फडणवीस यांच्या या विधानावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी त्यांच्यावर निशाणा साधत, ‘कनेक्टिंग लिंकच्या कामासंदर्भात सवाल उपस्थित केला तर त्यात महाराष्ट्राचा अपमान कसा? महाराष्ट्राच्या विधानसभेत सगळे आमदार मराठी असताना मुख्यमंत्री हिंदीत का बोलतात? असे प्रश्न करत, यावेळी फडणवीस यांनी

**मी माझं 'भाडे के टट्टू' वाक्य मागे घेतो आणि 'भाटकगर्दभ' म्हणतो -**

फडणवीस म्हणाले, ‘७ हजार कोटी रुपये पाण्यात गेले... ७ हजार कोटी पाण्यात गेले... ७ हजार कोटी पाण्यात गेले..., हा माझा अपमान नाही. हा महाराष्ट्राचाच अपमान आहे. खोट्या बातम्या पेरणं आणि अफवा पसरवणं हा महाराष्ट्राचाच अपमान आहे. पण मी बोलता बोलता त्या ठिकाणी हिंदीमध्ये बोललो 'भाडे के टट्टू' काही लोकांना



त्याचं दुःख झालं आणि ते म्हणाले मुख्यमंत्र्यांनी सुसंस्कृत बोलायला पाहिजे होतं. म्हणून नानाभाउ, मी जाउन अभ्यास केला. आता मी माझं 'भाडे के टट्टू' हे वाक्य मागे घेतो आणि त्याला सुसंस्कृतपणे 'भाटकगर्दभ' म्हणतो. जर कुणाला समजलं नसेल तर मग 'सुपारीबाज'. पण, मी तर काही सुपारी बाजांबद्दल बोललो. अनेकांना का लागली मला समजलच नाही.‘

**...तर स्टँड अप कामेडियनला मार्केट राहिल नसतं -**

फडणवीस पुढे म्हणाले, ‘बर ते जाउ द्या, आता मी एक वाक्य हिंदीमध्ये बोललो, आता आशिषजी, ते ज्यांना समजायला हवे म्हणून बोललो, त्यांच्या ऐवजी दुस-यालाच मिरची लागली आणि आमचे मिमिक्री आर्टिस्ट मला म्हणायला लागले, हिंदीत का बोलले? पूर्ण भाषण मी मराठीतच केलं. पण मला काही अडचण नाही. ते आमचे मित्र आहेत आणि ते मित्र असल्यामुळे राजकारणात तर त्यांच्यापासून आम्हाला काही धोका नाही. पण आनंद आहे, ते राजकारणात आहेत. ते जर मिमिक्रीच्या क्षेत्रात गेले असते, तर एकाही स्टँड अप कॉमेडियनला या ठिकाणी मार्केट राहिल नसत.

स्टेट ऑफ होर्मुझ सागरी क्षेत्रात व्यापारी जहाजांवर झालेल्या हल्ल्यांना चोख प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने इराणवर पुन्हा क्षेपणास्त्र आणि ड्रोनचे भीषण हल्ले चढवले, यामुळे मध्य पूर्वेत पुन्हा पूर्ण क्षमतेने युद्ध भडकण्याची शक्यता आहे. हल्ल्यांनंतर तुर्कीये येथील अंकारा येथे नाटो शिखर परिषदेत बोलताना अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत गेल्या महिन्यात स्वाक्षरी केलेला सामंजस्य करार संपुष्टात आल्याचे स्पष्ट केले. तसेच इराणसोबतची शांतता चर्चा ही केवळ 'वेळेचा अपव्यय' असल्याची भूमिका घेतली. या चिंताजनक घडामोडीने जागतिक बाजारात तेल दरातील घसरणीला लगाम बसला. १०५ दिवसांच्या तुफानी संघर्ष ६० दिवसांच्या शस्त्रसंधीच्या कराराने शमल्यामुळे कच्च्या तेलाचे दर प्रतिबॅरल १२० डॉलरवरून ७० डॉलरवर आले होते. विकसनशील व गरीब देशांच्या अर्थव्यवस्थांनी सुटकेचा निःश्वास टाकला होता. परंतु बुधवारी ट्रम्प यांनी हा शांतता करार मोडीत काढल्याची घोषणा केली आणि तेल दरांनी पुन्हा उसळी घेतली. आंतरराष्ट्रीय अभ्यासकांकडून अमेरिका-इराण यांच्यातील युद्धविराम फार काळ टिकणारा नाही, अशा अटकळी बांधल्या जात होत्या. दुर्दैवाने, त्या खऱ्या ठरल्या. तीन महिन्यांत ट्रम्प यांनी ४० हून अधिक वेळा युद्धविरामाच्या आणि इराणला बेचिराख करण्याच्या गर्जना केल्या. ताज्या घोषणेमुळे ट्रम्प यांची दुसरी टर्म ही जागतिक राजकारणात कोलांटउड्यांचा काळ म्हणून नोंदवली गेल्यास नवल नाही. आज एक निर्णय घेणे आणि दुसऱ्याच दिवशी त्याच्या अगदी उलट भूमिका मांडणे, ही त्यांची पद्धत जगासाठी चिंतेचा विषय ठरली. व्यापारी करारांमधील तणाव असो, युक्रेन युद्धाबाबतची भूमिका असो किंवा चीनला दिलेले इशारे असोत; ट्रम्प यांच्या सतत बदलत्या निर्णयांनी जागतिक अस्थिरतेला चालना दिली. शीतयुद्धकाळात 'मॅडमन थेअरी' संकल्पना मांडली गेली. या संकल्पनेचा गाभा असा की, तुम्ही अत्यंत तर्कहीन, रागीट आणि कोणत्याही थराला जाणारे आहात, असे प्रतिस्पर्ध्याला भासवू शकलात तर तो तुमच्याशी थेट संघर्ष टाळतो. आपल्या म्हणण्यावर ठाम असणाऱ्या नेत्याची कोंडी करणे विरोधकांसाठी सोपे असते; परंतु, जेव्हा नेत्याच्या पुढील पावलाचा अंदाज लावणे अशक्य होते, तेव्हा प्रतिस्पर्धी दडपणाखाली येतो. या सिद्धांताचा वापर ट्रम्प करत असल्याचे अभ्यासक मानतात. जागतिक तेल पुरवठ्यापैकी २० टक्के वाहतूक होर्मुझमधून होते. इराणने येथे तीन मोठ्या व्यावसायिक जहाजांवर

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## करार मोडीत

हल्ले केल्याचे अमेरिका म्हणते. या हल्ल्यांनंतर ट्रम्प यांनी अमेरिकन लष्कराला आदेश देत इराणवर तुफानी हल्ले केले. त्यास प्रत्युत्तर म्हणून इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने कुवेत आणि बहरीनमधील अमेरिकेच्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्रे डागली. दोन्ही बाजूंची आक्रमकता पाहता यावेळी आरपारची लढाई होणार असे संकेत मिळताहेत. ताज्या संघर्षाच्या मुळाशी होर्मुझमधून जाणाऱ्या जहाजांवर अतिरिक्त शुल्क आकारण्याचा इराणचा निर्णय कारणीभूत आहे, असे सांगतात. इराणने ही भूमिका यापूर्वीही मांडली आहे. किंबहुना, होर्मुझच्या रूपाने इराणला अल्लाउद्दीनचा दिवाच हाताशी लागला. भारतासारख्या मित्र देशांना या कर आकारणीतून सवलत असल्याने आपणास काळजीचे कारण नाही. तरी जागतिक नियमांच्या संकल्पनेला छेद देणारी ही भूमिका आहे. इराणचा युक्तिवाद आहे की, होर्मुझचा मोठा भाग आमच्या जलसीमेत येतो. त्यामुळे या मार्गावर नियंत्रण ठेवण्याचा आणि तिथून जाणाऱ्या जहाजांवर शुल्क आकारण्याचा आम्हाला कायदेशीर अधिकार आहे. हा टोल नाही, तर जहाजांना पुरवल्या जाणाऱ्या सुविधांसाठीचे सेवाशुल्क आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीचे व्यापारीकरण करून इराणला वर्षाला सुमारे ४० अब्ज डॉलर्स महसूल हवा आहे. हा महसूल इराणच्या वार्षिक खनिज तेल विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नाइतका आहे. प्रदीर्घ युद्ध आणि आर्थिक निर्बंध यांमुळे खिळखिळी झालेली अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी इराणला हे उत्पन्न हवे आहे. मित्रदेशांना सवलत देऊन इराणला जगात स्वतःचा स्वतंत्र गट करायचा आहे. ज्या देशांनी अमेरिकेला साथ दिली, त्यांच्यावर आर्थिक दबाव आणायचा आहे. ट्रम्प प्रशासन याला खंडणी म्हणते. तथापि, 'प्रोजेक्ट फ्रीडम' नावाच्या प्रकल्पांतर्गत इराणने आखून दिलेल्या अधिकृत जलमार्गाला बगल देऊन, ओमानच्या सागरी सीमेजवळून जहाजे नेण्यासाठी अमेरिकेने स्वतःचे लष्करी हवाई संरक्षण छत्र तिथे तैनात केले. ही समांतर व्यवस्था इराणच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणारी आहे. हा मार्ग असुरक्षित आहे. येथे पेरल्या गेलेल्या समुद्री सुरुंगांची अचूक माहिती केवळ इराणकडे आहे. त्यामुळे येथून जाणाऱ्या जहाजाच्या सुरक्षेची जबाबदारी घेण्यास इराणने नकार दिला. इराणच्या दृष्टिकोनातून, अमेरिकेनेच या समझोता कराराच्या मुख्य अटींचे पहिल्या दिवसापासून उल्लंघन केले आहे. करारातील पहिली अट लेबनॉनमधील युद्ध थांबवण्याची होती, मात्र इस्रायली सैन्याने मोहीम थांबवली नाही. अमेरिकेने इराणची गोठवलेली अब्जावधी डॉलर्सची मालमत्ता मुक्त करण्यास नकार दिला आणि ट्रम्प यांनी स्वित्झर्लंडमधील वाटाघाटीदरम्यान इराणी राजनैतिक अधिकाऱ्यांना थेट धमक्या दिल्या. हा संघर्ष पुन्हा उफाळून येणे जगाला परवडणारे नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने नुकताच जागतिक विकासाचा अंदाज व्यक्त केला असून सलग दुसऱ्यांदा यामध्ये कपात केली आहे. सौदी अरामको तेल कंपनीने तेल दरात प्रतिबॅरल ११ डॉलर इतकी विक्रमी कपात करण्याचा निर्णय जाहीर केला. गेल्या २६ वर्षातील ही सर्वात मोठी कपात आहे. यामुळे जागतिक बाजारात किंमतयुद्ध सुरू होईल अशा शक्यता आहेत. मागील १०० दिवसांच्या तेल दरवाढीमुळे भारतासह सर्वच देशांना मोठी झळ सोसावी लागली. सध्या घसरलेल्या तेल दरांमुळे ती भरून काढली जात असताना पुन्हा युद्ध पेटणे हिताचे नाही. तथापि दोन्ही बाजूंनी केले जाणारे दावे-प्रतिदावे पाहता हा संघर्ष आता विचित्र कोंडीत अडकला आहे. वास्तविक, अमेरिकेला मध्य पूर्वेत आणखी एका दीर्घकालीन युद्धाची राजकीय आणि आर्थिक किंमत परवडणारी नाही. निर्बंधांमुळे इराणची अर्थव्यवस्था गंभीर दबावाखाली आहे. त्यामुळे संघर्ष कायम ठेवण्यापेक्षा नियंत्रित तडजोड दोघांच्याही हिताची ठरू शकते. मध्य पूर्वेचा इतिहास सांगतो की, प्रत्येक युद्ध अखेरीस चर्चेच्या टेबलावरच संपते. कितीही बॉम्ब पडले, कितीही निर्बंध लादले किंवा कितीही कठोर भाषा वापरली, तरी शेवटी संवाद हाच संघर्ष सोडविण्याचा एकमेव मार्ग ठरतो. पण संवादाची प्रक्रिया पुढे सुरू राहण्यासाठी विश्वासाची गरज असते. इथे विश्वासाचीच कमतरता असल्यामुळे कागदावरची शस्त्रसंधी प्रत्यक्षात उतरणे आणि टिकून राहणे अशक्य ठरत आहे.

# नरेंद्रभाई, हे तुम्हाला शोभत नाही...

प्रिय नरेंद्रभाई, तुम्ही जणू यादवी युद्ध लढत असल्यासारखे देश चालवत आहात! हे तुम्हाला शोभत नाही. तुम्ही भले कितीही लोकप्रिय असाल, पण तुम्ही संसदेला उत्तरदायी आहात



**प्रिय नरेंद्रभाई,**

तुमच्या आयुष्यभरच्या महत्त्वाकांक्षेची पूर्तता झाल्याबद्दल, तुमच्या 'उत्कट' (उद्धट?) ध्येयापर्यंत पोहोचल्याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. (ते ध्येय नेमके काय असू शकेल, याचे मला कायमच कुतूहल होते!) अखेर तुम्ही नेहरूंवर एका बाबतीत तरी मात केली आहे. आता तुम्ही त्यांच्यापेक्षा जास्त दिवस 'निवडून आलेले पंतप्रधान' म्हणून सत्तेवर आहात. पण तुमचे राजकारण पाहता, एकूण कार्यकाळाच्या बाबतीतही तुम्ही त्यांना मागे टाकाल बहुतेक. ऑगस्ट १९४७ ते मे १९६४ जवळपास १७ वर्षे ते सत्तेत होते, (तुमचे काय होते पाहू!)

आणि तुम्ही नेहरूंपेक्षा फार काही वेगळेही नाही. दोघांनाही सत्ता सहज मिळाली, अगदी ताटात वाढून समोर आली म्हणा ना! नेहरूंना गांधींचे वारसदार म्हणून, तर तुम्हाला (सोनिया) गांधींनी दिलेल्या 'मौत का सौदागर' या उपाधीमुळे. 'मुसलमानांचे रक्त सांडताना कसलाही विधिनिषेध न बाळगणारा निर्दयी हिंदू राजकारणी' अशी तुमची प्रतिमा त्यांनी उभी केली. त्यांनी तुम्हाला तसे म्हटले नसते, तर कदाचित तुम्ही अजूनही गुजरातमध्येच असता. गांधींनी नेहरूंना धर्मनिरपेक्ष भारताचा चेहरा म्हणून पुढे केले; तर सोनियांनी तुम्हाला 'हिंदूंचा तारणहार' म्हणून ओळख मिळवून दिली.

नेहरूंप्रमाणेच तुम्हालाही पक्षांतर्गत विरोध झाला नाही. दुसरे म्हणजे, नेहरूंचे सगळे विरोधकही त्यांचा आदर करायचे आणि त्यांची स्तुती करण्याच्या बाबतीत त्यांच्यात अहमहमिका असायची. तुमच्या बाबतीतही पहिल्या दिवसापासून विरोधकांमध्ये चर्चा आहे. फक्त एवढाच 'किरकोळ' फरक आहे की, मोदी-चर्चेत 'आदरा'ऐवजी 'अविश्वास' आणि 'अनादर' भरलेला असतो! नेहरूंवर जनता प्रेम करत होती, पण त्यांच्या पक्षातले राजकारणी त्यांना घाबरत असत. या बाबतीतही तुम्ही त्यांना मागे टाकले आहे; तुमच्या पक्षातले लोक आणि जनता-दोघेही तुम्हाला घाबरतात!

यातला उपरोध बाजूला ठेवला तरी, नेहरू आणि तुम्ही दोघेही महत्त्वाच्या ऐतिहासिक क्षणी सत्तेवर आलात, हे मात्र नक्की. 'भारताने नियतीशी केलेला करार' साकार होत असताना, एका विविधतेने आणि कमालीच्या अंतर्विरोधांनी भरलेल्या समाजामध्ये 'आधुनिक धर्मनिरपेक्ष राष्ट्रा'चा पाया घालणे हे आव्हान मोठे होते. ते पेलण्यासाठी नेहरूंचीच गरज होती. आणि तुमच्या बाबतीत बोलायचे तर, जेव्हा आघाडी सरकारांना कंटाळलेल्या जनतेला केंद्रात काही प्रमाणात स्थैर्य हवे होते; तेव्हा जनतेने तुम्हाला स्वीकारले.

'देशातल्या सगळ्या समस्यांचे मूळ इंग्रजांच्या वसाहतवादी राजवटीत आहे', या भावनेच्या लाटेवर नेहरू स्वार झाले; तर अण्णा हजारे यांचे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन आणि आम आदमी पक्षाच्या पहिल्या दिल्ली सरकारची फजिती, यांचा फायदा घेऊन तुम्ही पुढे आलात. तुम्ही खूप शिताफीने 'स्थिर आणि भ्रष्टाचारमुक्त सरकार म्हणजे बिगर काँग्रेस सरकार' अशी भावना मतदारांमध्ये जागी केलीत.

नेहरूंनी त्यांच्या काळी देशवासीयांना आश्वस्त केले की, 'भारतीयांनी वसाहतवादी मानसिकता झटकून राष्ट्रनिर्माणात मनापासून सहभाग घेतला, तर सर्व काही शक्य आहे. आणि तुमच्या काळात 'खऱ्या अर्थाने भ्रष्टाचारमुक्त भारत म्हणजे काँग्रेसमुक्त भारत' हे तुम्ही लोकांच्या गळी उतरवलेत. दोघांचे तंत्र एकच होते. पण नेहरूंनी त्यांच्या आरोपांच्या तोफा देशाबाहेर डागल्या होत्या; तुम्ही त्या काँग्रेसच्या दिशेने वळवल्यात. आणि इथूनच तुम्ही नेहरूंपासून वेगळे व्हायला लागता. दोघांनाही सत्ता पहिल्यांदा मिळाली, तेव्हा देशाची परिस्थिती अराजकाचीच होती; पण नेहरूंनी त्यातून मार्ग काढण्यासाठी 'आशा आणि स्वप्ने' यांची कास धरली, आणि तुम्ही मात्र 'द्वेष आणि ध्रुवीकरणा'चा मार्ग निवडलात!

नेहरू विरोधकांना सामोरे जायचे, ते मुत्सद्दीपणाने आणि सुसंस्कृतपणाने; तुम्ही मात्र पहिल्यापासूनच आणि आक्रमकपणे आणि बेमुर्वतखोरपणे वागत आला आहात. 'आपल्याला आव्हान देऊ शकेल असे नेतृत्व किंवा विरोधी पक्ष देशात अस्तित्वात नाही', हे नेहरूंना ठाऊक होते. तरीही त्यांनी विरोधकांना सन्मानाची वागणूक दिली. ते संसदेत हजर राहायचे, विरोधकांची भाषणं ऐकायचे, प्रसंगी त्यांचं कौतुकही करायचे. नरेंद्रभाई, तुम्ही स्वतःच्या बाबतीत अशा वागण्याची कल्पना तरी करू शकता का?

नेहरूंना जगभरातून प्रेम आणि आदर मिळाला. नासेर आणि टिटो यांच्या सहकार्याने त्यांनी उभारलेली अलिप्त राष्ट्रगटाची चळवळ ही त्यांची महत्त्वाची कामगिरी ठरली. त्या तिघांनंतर त्या चळवळीचा आत्मा हरवल्यासारखा झाला खरा; पण आजही जगात अनेक संघर्ष आणि युद्धं सुरू आहेत, आणि त्यांच्याशी अर्थाअर्थी काहीही संबंध नसलेल्या देशांनाही नाईलाजानं कोणाची तरी बाजू घ्यावी लागते आहे. अशा परिस्थितीत नेहरूंच्या अलिप्ततावादाची गरज प्रकर्षाने जाणवते आहे.

तुम्ही निवडून आल्यावर पहिल्या दोन-तीन वर्षांत असंख्य परदेशवाऱ्या केल्यात. (संघाचे प्रचारक म्हणून देशातच अडकून राहिल्याची भरपाई म्हणून का हो?) तेव्हा तुमचे सगळीकडे अगदी उत्स्फूर्त स्वागत झाले, असे आम्हाला असे दाखवले गेले. पण ते म्हणजे खरे तर गुजराथी लोकांच्या 'आपणो नरेंद्रभाई' या भावनेचे प्रदर्शनच होते, असे नाही वाटत तुम्हाला?

मला वाटते. कारण जगभरात वेगवेगळ्या ठिकाणी स्थायिक झालेल्या भारतीय समाजात गुजराथी लोकांचेच प्रमाण सगळ्यांत जास्त आहे! नुकतेच तुम्ही देशवासीयांना काटकसरीचे आवाहन केलेत, पण विसरू नका, तुमच्या पहिल्या कार्यकाळात तुम्हीही 'सोन्याचा अंगरखा' (Million Dollar Golden Suit) परिधान केला होतात! लोकांची स्मरणशक्ती इतकी क्षीण असते, असे तुम्हाला खरेच वाटते?

तुम्ही चोवीस तास नेहरूंवर टीकेची झोड उठवत असता. त्या निमित्ताने तुम्हाला आठवण करून देतो. भारत आज तीव्र पेट्रोलियम टंचाईपासून वाचला आहे, त्याचे कारण म्हणजे आपला कच्च्या तेलाचा चाळीस टक्क्यांहून जास्त पुरवठा रशियाकडून येतो. तुम्ही इतिहास किती वाचला आहे, ते मला माहीत नाही; पण नरेंद्रभाई, स्वतःला किंवा तुमच्या 'थिंक टँक'ला (असलाच तर!) विचारा. भारत-रशिया किंबहुना भारत-सोव्हिएत मैत्रीचे शिल्पकार कोण होते? नेहरूच ना! त्याच मैत्रीला स्मरून बांगलादेश युद्धाच्या काळातही सोव्हिएत संघ भारताच्या पाठीशी उभा राहिला होता.

नेहरूंची भलामण करण्याचा माझा हेतू नाही. भारतात विकासाची 'शासन-नियंत्रित सोव्हिएत पद्धत' (कमांड इकॉनमी) आणल्याबद्दल आणि झपाट्याने औद्योगिकीकरण करण्याच्या नावाखाली कृषी क्षेत्राकडे पूर्ण दुर्लक्ष केल्याबद्दल मी त्यांच्यावर नेहमीच टीका करत आलो आहे. पण म्हणून तुम्ही इतिहास तुम्हाला वाटेल तसा फिरवू शकत नाही.

उदाहरणार्थ, मध्यंतरी तुम्ही बराच कांगावा केलात की, 'काँग्रेसने 'हिंदू' या शब्दाची, संकल्पनेची आणि समुदायाची खूप बदनामी केली आहे.' त्यापूर्वी 'हिंदू' हा शब्द, 'हिंदू' ही संकल्पना, आणि 'हिंदू समाज' हे अगदी धुतल्या तांदळासारखे होते, अत्यंत कठोर निकषांवर त्यांची परीक्षा केली, तरी ते निर्दोष ठरले असते, याची खात्री तुम्ही देऊ शकता का? कदाचित हा प्रश्न तुमच्या आवाक्याबाहेरचा असेल, पण एवढं तरी सांगा की, काँग्रेस इतकी हिंदूविरोधी असती, तर जिना आणि आंबेडकर यांनी स्वतंत्र पक्ष का स्थापन केले असते? त्यांना त्याची गरज वाटली, कारण काँग्रेस हा मुळात 'हिंदू पक्ष'च होता!

काँग्रेसमधल्या सहकाऱ्यांना नेहरूंचा धाक होता, नेहरूंचे वर्चस्व मान्य करण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हतं. भाजपमध्ये तुमचाही दरारा तसाच आहे. नेहरू जिवंत असताना 'त्यांच्यानंतर कोण?' हा प्रश्न उघडपणे कधीच विचारला गेला नाही. चर्चा झालीच असेल तर अगदी क्वचित, खासगीत आणि आडून आडून झाली असेल. त्यांच्या निधनानंतर मात्र सगळेच बिनसले आणि त्यांच्या अंत्यसंस्काराच्या आधीच गटबाजीमुळे काँग्रेसला पडलेली खिंडारे उघडी पडली. तुमच्या माघारी भाजपला असा धक्का झेपेल का? इथे मी एक गोष्ट स्पष्ट करू इच्छितो: मी तुमच्या अकाली निधनाचे भाकित वगैरे करत नाही. तुम्हाला दीर्घ आणि आणखी चांगले आयुष्य लाभो. तरी पण एक मात्र नक्की की, 'तुमचा उत्तराधिकारी कोण?' हा प्रश्न आज ना उद्या उद्भवणारच आहे. तुम्हाला सर्वाधिक काळ पंतप्रधानपदी राहण्याची संधी मिळावी म्हणून कदाचित भाजप निवृत्तीचे काल्पनिक वय ऐंशी वर्षांवर नेईलही. तरी उत्तराधिकारी कोण हा प्रश्न उरतोच.

टीका करण्याच्या निमित्ताने का होईना, तुम्ही नेहरूंच्याविषयी इतके सतत बोलत असता की, आता तुमचीच एक बाजू 'नेहरूमय' झालेली आहे. गंमत म्हणजे, तुमच्या कट्टर 'विरोधभक्ती' मुळे तुम्ही नेहरू-गांधी कुटुंबाच्या तीन्ही पिढ्यांतले नेमके नको ते गुण (?) अंगी बाणवले आहेत. त्यातही मागच्या पिढीपेक्षा पुढच्या पिढीकडून वाढता 'वसा' घेतला आहे. इंदिरा गांधी त्यांच्या वडिलांप्रमाणे 'एकाधिकारशाही' वृत्तीच्या तर होत्याच; पक्षावर त्यांची जरबही होती. पण त्याही पुढे जाऊन त्यांच्या स्वभावात एक निष्ठूरता आणि सूडबुद्धी होती. त्यांचा मुलगा संजय गांधी. त्याच्या अंगी आजोबा आणि आईमधले हे सगळे गुण(दोष?) तर होतेच; शिवाय त्याचे राजकारण बेतालपणाचे आणि असभ्यही होते. पण तुम्ही तर या सर्वांपेक्षा एक पाऊल पुढे आहात!

तुमच्यात हे सारे 'गुण' तर आहेतच; शिवाय 'दुटप्पीपणा'तही तुमचा हातखंडा आहे. 'मुत्सद्देगिरी' हा राजकारणाचा भाग आहे आणि त्यामुळे काही प्रमाणात दिशाभूल करणारे, संदिग्ध, दुटप्पी बोलणे अपरिहार्य असते, हे मला मान्य आहे. पण त्यामागचा हेतू सहसा दुटप्पी नसतो. तुमच्याकडे मात्र 'दुटप्पी हेतू' आहे. राष्ट्रीय पुनर्निर्माणासाठी विरोधकांनी सरकारसोबत यावे, असे आवाहन तुम्ही त्यांना करता; पण निवडणूक प्रचारसभांमध्ये त्यांनाच 'देशद्रोही', 'जनतेचे शत्रू' आणि काय काय म्हणत सुटता!

'एक देश, एक निवडणूक' म्हणून तुम्ही मारे मोठ्या घोषणा देता; पण देशाच्या वेगवेगळ्या राज्यांत वेगवेगळ्या वेळी जेव्हा विधानसभा निवडणुका होतात, तेव्हा मात्र तुम्ही अगदी उत्साहात असता. कारण तेव्हा तुम्हाला प्रादेशिक पक्ष फोडण्याची आणि त्यातली निवडक 'उपयोगी' मंडळी भाजपमध्ये आणण्याची आयती संधी मिळते. एकीकडे तुम्ही संविधानावर तुमचा पूर्ण विश्वास असल्याचा दावा करता; पण दुसरीकडे त्याच संविधानात, जगातल्या सर्वांत मोठ्या लोकशाहीचा पाया असलेल्या त्याच घटनेत, मूलभूत (तुमच्या सोयीचे) बदल करण्याचा तुमचा अंतःस्थ हेतू असतो. आणि त्याच हेतूने एनडीएच्या खासदारांची संख्या वाढवण्यासाठी तुम्ही रात्रंदिवस प्रयत्न करत असता. नरेंद्रभाई, यात 'खिलाडूपणा'पेक्षा 'खुनशीपणा' जास्त आहे.

तुम्ही जणू यादवी युद्ध लढत असल्यासारखे देश चालवत आहात! हे तुम्हाला शोभत नाही. तुम्ही भले कितीही लोकप्रिय असाल आणि 'मन की बात'द्वारे थेट जनतेशी संवाद साधत असाल, पण तुम्ही संसदेला उत्तरदायी आहात.

मात्र तिथे तुम्ही क्वचितच उपस्थित राहता. विरोधक हे तुमचे शत्रू नाहीत. तुम्ही त्यांच्यासमोर नतमस्तक होण्याची गरज नाही; पण त्यांच्याशी सौजन्याने वागणे आवश्यक आहे. त्यांचे ऐकून घ्या, त्यांच्याशी बोला - ही काही फार मोठी अपेक्षा नाही! बारा वर्षे सत्तेत राहिल्यानंतर देश नेहरूंकडे तारणहार म्हणून पाहत होता, विध्वंसक म्हणून नव्हे. जमले तर त्यातून काही धडा घ्या.

नेहरूंचे राहू द्या एकवेळ; तुमच्याच पक्षाचे माजी पंतप्रधान अटलजी त्यांचे तरी अनुकरण करा. तेही करणे इतके अवघड आहे का? आणि हो, तुमच्या (सोयीस्करपणे) लक्षात नसेल तर आठवण करून देतो अटलजींना 'जनसंघाचे नेहरू' म्हणत असत!

तुमचा निष्ठावान टीकाकार
**विनय हर्डीकर**

# ट्रम्प यांचे पुन्हा घुमजाव !

होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तीन व्यापारी जहाजांवर इराणने ड्रोन्स आणि मिसाईल्सच्या सहाय्याने हल्ला केल्यानंतर त्याला उत्तर म्हणून अमेरिकेने लागोपाठ दोन दिवस इराणवर तुफान हल्ले केले. दरम्यान अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अमेरिका आणि इराण यांच्यातील अंतरिम करार संपल्याचे जाहीर करून खळबळ उडवून दिली. तसेच पेट्रोलियम पदार्थांची निर्यात करण्यासंबंधीची जी सवलत अमेरिकेने इराणला दिली होती, ती आपण मागे घेत असल्याचे ट्रम्प यांनी घोषित केले. शिवाय इराणच्या बंदरांची नाकेबंदी पुन्हा सुरू करण्यात येईल असा इशाराही ट्रंप यांनी दिला आहे. हा इशारा देत असतानाच इराण बरोबरची बोलणी सुरूच रहातील असा यू टर्नही ट्रम्प यांनी घेतला आहे.

ट्रम्प यांच्या धरसोड वृत्तीमुळे त्यांनी सर्व जगाला वेठीस धरले आहे. अमेरिकेने इराणवर नव्याने हल्ले सुरू केल्यानंतर जागतिक बाजारपेठेत क्रूड ऑइलच्या किंमती तीन टक्क्यांनी वाढल्या. होर्मुझ सामुद्रधुनीचा वापर करून, इराणने अमेरिकेचे नाक दाबले आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांना इराणने विशिष्ट मार्ग आखून दिला आहे. त्या मार्गाचे उल्लंघन करणाऱ्या तीन जहाजांवर इराणने ड्रोन्स आणि मिसाईल्सच्या सहाय्याने हल्ला केल्याचे स्पष्टीकरण इराणकडून देण्यात आले आहे. एकंदरित होर्मुझच्या सामुद्रधुनीवर असलेले आपले नियंत्रण इराण काही झाले तरी सोडणार नाही ही गोष्ट वारंवार सिद्ध झाली आहे.

अमेरिकन हल्ल्यांचे टार्गेट होते बंदर अब्बास पोर्ट, सिरिक पोर्ट आणि इराणचा अणू ऊर्जा प्रकल्प असलेले बुशेहर हे शहर. अमेरिकन हल्ल्यांना उत्तर देण्यासाठी इराणने बहारिन आणि कुवैत येथील अमेरिकन मिलिटरी साईट्सवर ड्रोन्स आणि मिसाईल्सच्या सहाय्याने हल्ले केले. बहारिनमध्ये अमेरिकन नेव्हीच्या पाचव्या फ्लिटचे मुख्यालय आहे. इराणवरील अमेरिकन हल्ल्यानंतर अमेरिकेतील स्टॉक मार्केट कोसळले. ब्रेंट क्रूड ऑइलचा दर पाच टक्क्यांपेक्षा जास्त वाढून, एका बॅरेलची किंमत ८० डॉलर्स पर्यंत पोहोचली. अमेरिकन सिनेटर बर्नी सँडर्स यांनी ट्रंप यांच्या धरसोड वृत्तीवर कडाडून टीका केली. ते म्हणाले की इराण बरोबरील युद्ध पुन्हा सुरू केल्यामुळे अमेरिकेची ताकद वाढणार नाही. या युद्धामुळे आणखी प्राणहानी होईल आणि टॅक्स भरणाऱ्या अमेरिकन नागरिकांचा पैसा वाया जाईल. इस्त्रायलच्या नादाने इराण विरुद्धच्या युद्धात उतरलेल्या अमेरिकेला त्यातून काहीही साध्य



करता आलेले नाही. युद्ध छेडण्याची कारणे खोटी होती. आता ट्रम्प यांनी इराण बरोबरील अंतरिम करार संपल्याचे जाहिर करून, आपल्या चंचल वृत्तीचे दर्शन घडवले आहे.

ट्रम्प इराणला धमक्यांवर धमक्या देत आहेत. परंतु इराणने त्या धमक्यांना भीक घातलेली नाही. कारण इराणकडे होर्मुझ सामुद्रधुनीचा हुकुमी एक्का आहे. इराण संसदेचे अध्यक्ष मोहंमद घालिबाफ यांनी ट्रम्प यांच्या दादागिरीला उत्तर देताना असे म्हटले आहे की गुंडगिरी आणि पिळवणुकीचे युग केंव्हाच संपले आहे. घालिबाफ हे अमेरिका आणि इराण यांच्यातील वाटाघाटींमध्ये भाग घेत होते. त्यामुळे त्यांची प्रतिक्रिया महत्वाची आहे. सध्या इराणमध्ये देशाचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांची अंत्ययात्रा सुरु आहे. या अंत्ययात्रेत लाखो लोक सहभागी झाले आहेत. अंत्ययात्रेत सहभागी झालेले लोक 'डेथ टू ट्रंप' आणि 'डेथ टू नेतान्याहू' अशा घोषणा देत आहेत. अंत्ययात्रेच्या मार्गावर ट्रम्प यांचे फासावर लटकवलेले पुतळे जागोजागी दिसत आहेत. इराणमधील जुलुमी राजवट संपुष्टात आणण्याचे ट्रम्प यांचे मनसुबे धुळीला मिळाले असून, इराणमधील जनता आता आपला सर्व राग ट्रम्प आणि अमेरिका यांच्या विरोधात व्यक्त करत आहे. इराण विरोधात युद्ध छेडून ट्रम्प यांनी बरेच काही गमावले आहे. सुपर पॉवर या अमेरिकेच्या प्रतिमेला ट्रम्प यांच्याकडून मोठाच धक्का बसला आहे.

**अभय गोखले**

## आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर स्वच्छ ठेवावी

दरवर्षी आषाढी एकादशीच्या सुमारास अनेक भाविक येथे वारी करण्यासाठी व विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेण्यासाठी पायी चालत येतात. क्षेत्रमाहात्म्यामुळे पंढरपुराला दक्षिण काशी व तसेच विठ्ठलाला महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणतात. हे विठ्ठलमंदिर अवघ्या महाराष्ट्राचे एक चिरंतन स्फूर्तिस्थान आहे. गोरगरिबांचा देव म्हणून श्री विठ्ठलाची ओळख आहे. पंढरपूरच्या उत्तर दिशेला कैकाडी महाराज यांचा मठ आहे तिथे गुंफेत सर्व साधु संतांच्या मूर्ती आहेत याचं पार्श्वभूमीवर पंढरपूरमध्ये वर्षातून चार एकादश्यांना चार यात्रा भरतात- चैत्री, आषाढी, माघी व कार्तिकी. त्यातील आषाढी एकादशीला भरणाऱ्या यात्रेत सुमारे १०-१५ लाखांहून अधिक भाविक सहभागी होतात. पंढरपूरला मोठ्या प्रमाणात आषाढी वारीसाठी भाविक येतात त्यामुळे या ठिकाणी स्वच्छता महत्वाची असते त्याच अनुषंगाने स्थानिक प्रशासन नेहमीच प्रयत्न करीत असते मात्र भक्तांची संख्या मोठी असल्याने स्वच्छतेवर काबू मिळवणे कठीण होऊन बसते विठूमाऊलीच्याद्वारी भिमा अर्थात चंद्रभागा नदी आहे त्यामध्ये भाविक कचरा, प्लास्टिक टाकून नदी प्रदूषित करतात त्यामुळे प्रत्येक भाविकांनी स्वतःपासूनच स्वच्छतेला महत्त्व देऊन कोणत्याही प्रकारची घाणीचे साम्राज्य होणार नाही याची प्रत्येकाने काळजी घेवून तशी कृती करणे गरजेचे आहे आणि स्वच्छतेमध्येच भगवंत असतो असे अनेक महात्म्यांनी सांगितले आहे त्यामुळे स्वच्छतेतून समृद्धीकडे जाणे कधीही हिताचे ठरणार आहे.

**राजू जाधव**

# उच्चशिक्षित उमेदवाराला सोडून अल्पशिक्षित महिलेची निवड..!

## शिफारस, गुणवंतांना डावलून नियुक्ती, हिवरा (संगम) परिचर भरती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. १० :** महागाव तालुक्यातील हिवरा (संगम) येथील आरोग्य उपकेंद्रातील अंशकालीन (स्त्री) परिचर पदभरती प्रक्रियेवर गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले असून, पात्र व उच्चशिक्षित उमेदवारांना डावलून अल्पशिक्षित महिलेची निवड करण्यात आल्याचा आरोप समोर आला आहे.

या प्रकरणात आर्थिक गैरव्यवहार, वशिलेबाजी आणि निवड प्रक्रियेत पारदर्शकते चा अभाव असल्याचा दावा करत पीडित उमेदवार योगिता राजदीप हरणे यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र पोहंडूळ अंतर्गत येणाऱ्या हिवरा (संगम) आरोग्य उपकेंद्रासाठी परिचर पदाची जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर अनेक स्थानिक सुशिक्षित महिलांनी अर्ज सादर केले होते. मात्र, उच्चशिक्षित व पात्र उमेदवारांकडे दुर्लक्ष करून केवळ नववी उत्तीर्ण असलेल्या महिलेची निवड करण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. २४ मार्च २०२६ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत या भरतीवर चर्चा झाली होती. तरीही गुणवत्तेचा निकष न लावता पूर्वनियोजित पद्धतीने एका उमेदवाराची निवड करण्यात आल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण निवड प्रक्रिया निष्पक्ष होती का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

दरम्यान, या प्रकरणातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे आरोग्य विभागाची जाहिरात ८ मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध झाली असताना संबंधित उमेदवाराला ग्रामपंचायत प्रशासकांनी ७ मार्च रोजीच शिफारस पत्र दिल्याचा आरोप आहे. या कालक्रमा मुळे संपूर्ण प्रक्रियेवर संशयाचे सावट निर्माण झाले असून चौकशीची मागणी अधिक तीव्र झाली आहे. पीडित उमेदवारांनी ही निवड रद्द करून पात्र उमेदवाराला न्याय द्यावा, अशी मागणी केली आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई होते की नाही, याकडे आता तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### जाहिराती पूर्वीच शिफारस; भरती आधीच ठरली होती का?

**आरोग्य विभागाने अंशकालीन परिचर पदासाठी जाहिरात ८ मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध केली. मात्र संबंधित उमेदवाराला ७ मार्च २०२६ रोजीच ग्रामपंचायत प्रशासकांकडून शिफारसपत्र देण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे जाहिरात ही केवळ औपचारिकता होती का, भरती प्रक्रिया आधीच निश्चित झाली होती का आणि यात आर्थिक व्यवहार झाला का, अशा प्रश्नांची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी होत आहे.**

### निवड रद्द न झाल्यास तीव्र आंदोलन

**"उच्चशिक्षित व पात्र उमेदवारांवर अन्याय झाला आहे. संबंधित भरती तातडीने रद्द करून निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. अन्यथा संविधानिक मार्गाने तीव्र आंदोलन छेडले जाईल."**

— योगिता राजदीप हरणे, तक्रारदार उमेदवार

# भोजलाच्या निशांत राऊत यांना राज्यस्तरीय 'प्रयोगशील शेतकरी पुरस्कार'

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. 10 :** पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत उत्पादन आणि उत्पन्नात लक्षणीय वाढ साधणाऱ्या भोजला (ता. पुसद) येथील युवा प्रयोगशील शेतकरी निशांत विजय राऊत यांना 'प्रयोगशील शेतकरी पुरस्कार–२०२६' या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले.

स्व. वसंतराव नाईक जयंतीनिमित्त स्व. वसंतराव नाईक फाऊंडेशन व कृषी विकास प्रतिष्ठान, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समारंभात महाराष्ट्राचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. राऊत यांनी स्वतःची १२ एकर व बटईची ८ एकर अशी एकूण २० एकर शेती आधुनिक पद्धतीने विकसित केली आहे. केळी, टोमॅटो, पपई, हळद, टरबूज, मिरची, सोयाबीन आणि कापूस या पिकांचे नियोजनबद्ध उत्पादन घेत त्यांनी शेतीला व्यावसायिक स्वरूप दिले आहे. केळीच्या एका एकरातून सुमारे ४३,५०० किलो उत्पादन घेऊन ४.३५ लाख, टोमॅटोतून २,२०० कॅरेट उत्पादनाद्वारे ९ लाख, तर पपईतून ६ लाखांचे उत्पन्न त्यांनी मिळवले. याशिवाय हळदीच्या एका एकरातून ४२ क्विंटल सुकलेल्या हळदीचे विक्रमी उत्पादन घेत तीन एकरांत १२६ क्विंटल उत्पादनाची नोंद केली. लागवडीसाठी आवश्यक बेणे राखून ठेवूनही सुमारे १७.६४ लाखांचे उत्पन्न त्यांनी मिळवले. ठिबक सिंचन, आधुनिक तंत्रज्ञान, बाजारपेठेचा अभ्यास आणि वैज्ञानिक नियोजनाच्या बळावर शेतीत यश मिळविल्याबद्दल त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाली. "शेतीत यश हे नशिबाने नव्हे, तर ज्ञान, नियोजन, तंत्रज्ञान आणि प्रामाणिक परिश्रमाच्या जोरावर मिळते,अशी भावना पुरस्कार स्वीकारल्यानंतर निशांत राऊत यांनी व्यक्त केली. त्यांच्या या यशाचे शेतकरी, कृषी तज्ज्ञ व विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुक होत असून, ग्रामीण युवकांसाठी ते प्रेरणादायी ठरत आहेत.

# मुकुटबन-पिंपरड बस सेवेसाठी आगार व्यवस्थापकांना निवेदन

### युवासेना आणि ग्रामस्थांची आक्रमक मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. १० :** मुकुटबन ते पिंपरड या मार्गावर तातडीने नियमित बस सेवा सुरू करण्यात यावी, या मागणीसाठी आज परिसरातील ग्रामस्थ आणि शिवसेना-युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी वणी बस डेपोचे आगार व्यवस्थापक (डेपो मॅनेजर) यांना अधिकृत निवेदन सादर केले. गेल्या अनेक दिवसांपासून या मार्गावर बस सेवा नसल्यामुळे शाळकरी विद्यार्थी, महिला आणि नोकरदारांना मोठ्या प्रमाणावर मानसिक व आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे. यावेळी निवेदन देताना युवासेना उपतालुकाप्रमुख सौरव मंडलवार, अंकित पेंदोर, अतुल पाटील, नितेश पेंदोर आणि अरविंद कुशराम प्रामुख्याने उपस्थित होते. त्यांच्यासोबतच मुकुटबन आणि पिंपरड परिसरातील अनेक प्रमुख नागरिक, तरुण आणि बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आगार व्यवस्थापकांना दिलेल्या निवेदनात गावकऱ्यांनी स्पष्ट केले आहे की, नियमित शासकीय बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे पिंपरड व मुकुटबन परिसरातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी वणी किंवा इतर ठिकाणी जाण्याकरिता कमालीचा त्रास सहन करावा लागत आहे.

# जबरी चोरी करणारी टोळी जेरबंद..!

### ८ गुन्ह्यांची उकल, लाखोंचा मुद्देमाल जप्त

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. १० :** पुसद शहरातील बसस्थानक परिसरासह विविध ठिकाणी जबरी चोरी करून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या आरोपीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली असून त्याच्या ताब्यातून चोरीतील मोबाईल, रोख रक्कम, मोटारसायकल, कॉपर वायर असा सुमारे १.१३ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या कारवाईमुळे जबरी चोरीचे दोन आणि शेतीपंप व केबल चोरीचे सहा असे एकूण आठ गुन्हे उघडकीस आले आहेत. ७ जुलै रोजी पुसद बसस्थानक परिसरात अरविंद चव्हाण यांच्याकडील मोबाईल व ३७ हजार रुपयांची रोख रक्कम हिसकावून नेण्यात आली होती. त्याच दिवशी वसंतनगर हद्दीत करण राठोड यांना स्वस्तात पुण्याला ट्रॅव्हल्सने पाठविण्याचे आमिष दाखवत निर्जनस्थळी नेऊन रोख रक्कम व चांदीच्या अंगठ्या जबरदस्तीने लुटण्यात आल्या होत्या. या दोन्ही प्रकरणांचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आला होता. गोपनीय माहितीच्या आधारे पथकाने बरखा टॉकीज परिसरात सापळा रचून अयाज अहमद एजाज अहमद (वय ३२, रा. मधुकर नगर, पुसद) व त्याच्या विधिसंघर्षग्रस्त अल्पवयीन साथीदाराला ताब्यात घेतले. चौकशीत दोघांनी जबरी चोरी सह शेतातील मोटारपंप व केबल चोरीचे गुन्हे कबूल केले. आरोपींकडून मोबाईल, रोख रक्कम, मोटारसायकल तसेच ८.५ किलो कॉपर वायर जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पुसद शहर पोलीस करीत आहेत.

## थोडक्यात

### अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय उमरखेड येथे करा..!

**जन आंदोलनाचा इशारा, पुसदला कार्यालय जोडण्याच्या प्रस्तावावर संघर्ष समितीचा तीव्र आक्षेप, जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन**

**उमरखेड :** पुसद येथे प्रस्तावित अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय जोडण्याच्या शासनाच्या निर्णय प्रक्रिये विरोधात उमरखेड जिल्हा निर्मिती संघर्ष समितीने आक्रमक भूमिका घेतली असून, हा निर्णय तात्काळ मागे घेऊन अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय उमरखेडलाच स्थापन करावे, अशी ठाम मागणी केली आहे. अन्यथा व्यापक जनआंदोलन छेडण्याचा इशारा समितीने दिला आहे. समितीने जिल्हाधिकाऱ्यांकडे अधिकृत आक्षेप नोंदवत सादर केलेल्या निवेदनात, उमरखेड हे भौगोलिक, प्रशासकीय व वाहतूक सुविधांच्या दृष्टीने स्वतंत्र जिल्ह्यासाठी सर्वाधिक सक्षम केंद्र असल्याचे नमूद केले आहे. महागाव उपविभागाचे अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय अन्यत्र जोडल्यास नागरिकांना भविष्यात गंभीर प्रशासकीय गैरसोयींचा सामना करावा लागेल, असा दावा करण्यात आला आहे. निवेदनात उमरखेडची मध्यवर्ती भौगोलिक स्थिती, राष्ट्रीय महामार्ग, प्रस्तावित रेल्वेमार्ग, न्यायालय, पोलीस यंत्रणा, मोठी बाजारपेठ, ऐतिहासिक वारसा तसेच मराठवाड्याशी असलेले निकटचे संबंध यांचा उल्लेख करून कार्यालय उमरखेडलाच ठेवण्याची मागणी करण्यात आली आहे. संघर्ष समितीचे अध्यक्ष नंदकिशोर अग्रवाल व सचिव डॉ. गणेश घोडेकर यांनी शासनाने जनभावनांचा अनादर केल्यास व्यापारी, शेतकरी, युवक व विविध सामाजिक संघटनांना सोबत घेऊन तीव्र जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा दिला आहे. त्यामुळे उमरखेड जिल्हा निर्मितीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, शासनाच्या पुढील भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### अल्पवयीनांच्या बेशिस्त वाहनचालना विरोधात कारवाईची मागणी

**शिवरामजी मोघे महाविद्यालयाचे पोलिसांना निवेदन विशेष मोहीम राबविण्याची अपेक्षा**

**पांढरकवडा :** शहरात अल्पवयीन तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून विनापरवाना आणि वाहतूक नियमांचे उल्लंघन करून दुचाकी वाहने चालविण्याचे प्रमाण वाढत असल्याने गंभीर अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने पांढरकवडा पोलीस स्टेशनला निवेदन देत अशा बेशिस्त वाहनचालक विद्यार्थ्यांविरुद्ध विशेष मोहीम राबवून कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.निवेदनात म्हटले आहे की, पांढरकवडा शहरात अनेक शाळा, महाविद्यालये व खासगी शिकवणी वर्ग असल्याने विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात ये-जा असते. मात्र, अनेक अल्पवयीन विद्यार्थी वाहन चालविण्याचा वैध परवाना नसतानाही भरधाव वेगाने दुचाकी चालवित असून वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघन करत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असून अपघातांची शक्यता वाढली आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांनी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हा विषय अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले. तसेच राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. अमर वंजारी यांनी अल्पवयीनाकडून होणारी बेकायदेशीर वाहन चालना रोखण्यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष तपासणी मोहीम राबवून नियमभंग करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती होण्यास मदत होईल तसेच भविष्यातील अपघातांना आळा बसून सुरक्षित वाहतुकीची सवय निर्माण होईल, अशी अपेक्षा महाविद्यालयाच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

# अक्षत नव्हे, आशीर्वादांचा वर्षाव!

### विवाहातून अन्नसन्मानाचा आदर्श

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**यवतमाळ, दि. १० :** यवतमाळ येथील नायगावकर-राठी परिवाराने विवाह सोहळ्यातील वर्षानुवर्षे चालत आलेल्या अक्षता उधळण्याच्या प्रथेला संवेदनशील पर्याय देत अन्नसन्मानाचा नवा आदर्श समाजासमोर ठेवला. प्रसाद व भैरवी नायगावकर यांची कन्या आसावरी आणि सतीश राठी यांचा मुलगा जयेश यांच्या विवाहात उपस्थित पाहुण्यांना अक्षता वाटण्यात आल्या नाहीत. केवळ पुरोहित आणि दोन्ही कुटुंबांतील आई-वडिलांनीच नवदांपत्यावर अक्षता अर्पण केल्या, तर इतरांनी हात जोडून शुभेच्छा व आशीर्वाद दिले. या निर्णया मागील उद्देश स्पष्ट करताना विवाह सोहळ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात तांदळाची होणारी नासाडी टाळण्यासाठी हा उपक्रम राबविल्याचे सांगण्यात आले.

माहिती मिळताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात या निर्णयाचे स्वागत केले. 'अन्नं ब्रह्म' या भारतीय संस्कृतीतील मूल्याला जपत परंपरेचा सन्मान आणि अन्नाचा आदर एकाच वेळी जपता येतो, असा प्रभावी संदेश या विवाहातून देण्यात आला. नायगावकर-राठी परिवाराच्या या उपक्रमाची शहरात सर्वत्र प्रशंसा होत आहे.

# घरावर जिवंत वीजतार, कासारवेहळ येथील राठोड कुटुंबाचा जीव टांगणीला..!

### वाकलेला खांब व तुटलेली तार तातडीने हटविण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**महागाव, दि. १० :** महागाव तालुक्यातील ग्रामपंचायत कासारवेहळ येथील सेवानगर परिसरात महावितरणच्या (एमएसईबी) हलगर्जीपणामुळे एका कुटुंबाचा जीव धोक्यात आला आहे. वादळी वाऱ्यामुळे वीज खांब वाकून त्यावरील जिवंत विद्युत तार थेट दिलीप राठोड यांच्या घराच्या पत्र्यावर पडली, मात्र यानंतरही महावितरणकडून केवळ वीजपुरवठा तात्पुरता बंद करून कर्मचारी निघून गेल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अलीकडील वादळी वाऱ्यामुळे परिसरातील वीज खांब झुकला आणि त्यावरील तार तुटून राठोड यांच्या घरावर कोसळली. ही घटना घडल्यानंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती तातडीने महावितरण कार्यालय तसेच ग्रामपंचायतीला देण्यात आली. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन वीजपुरवठा बंद केला; मात्र तुटलेली तार हटविणे, वाकलेला खांब दुरुस्त करणे किंवा सुरक्षितरीत्या पुनर्जोडणी करणे यापैकी कोणतीही कायमस्वरूपी उपाययोजना अद्याप करण्यात आलेली नाही. परिणामी राठोड कुटुंबाला जीव मुठीत धरून घरात राहावे लागत असून परिसरातील नागरिकांमध्येही भीतीचे वातावरण आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, ग्रामपंचायतीलाही या धोकादायक परिस्थितीची माहिती देण्यात आली होती; मात्र अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. राठोड कुटुंबाने प्रशासन व महावितरणकडे वाकलेला वीज खांब तातडीने सरळ करून घरावर पडलेली विद्युत तार हटवावी, सुरक्षित पुनर्जोडणी करावी आणि परिसरातील नागरिकांच्या जीविताचे संरक्षण करावे, अशी मागणी केली आहे. अन्यथा भविष्यात घडणाऱ्या कोणत्याही दुर्घटनेसाठी संबंधित यंत्रणेलाच जबाबदार धरावे, असा इशाराही स्थानिकांनी दिला आहे.

# मानधना साठी आशांचा थाळीनाद..! 'बीएलओ'च्या सक्तीवर बहिष्काराचा इशारा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १० :** गेल्या पाच महिन्यांपासून थकीत असलेले मानधन, विविध भत्ते आणि प्रोत्साहनपर मोबदला तातडीने अदा करावा, या प्रमुख मागणीसाठी यवतमाळ जिल्ह्यातील शेकडो आशा स्वयंसेविकांनी शुक्रवारी जिल्हा परिषद कार्यालयासमोर काळे कपडे परिधान करून थाळीनाद करत एकदिवसीय धरणे आंदोलन केले.

'सीटू'च्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) तसेच जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे सविस्तर निवेदनही देण्यात आले. आंदोलनकर्त्यांनी फेब्रुवारी ते जून या पाच महिन्यांचे थकीत मानधन तात्काळ बँक खात्यात जमा करावे, गेल्या तीन-चार वर्षांपासून विविध कामांचे प्रलंबित मोबदले अदा करावेत, केंद्र शासना कडील सहा महिन्यांचे मानधन विलंब न करता द्यावे, प्रत्येक आशा स्वयंसेविकेला कामाची पगार पावती उपलब्ध करून पारदर्शकता ठेवावी, दोन वर्षांपासून प्रलंबित असलेला गणवेश व स्टेशनरी साहित्य तातडीने द्यावे तसेच प्रशासनाने कमी केलेले कामाचे 'हेड' पूर्ववत करावेत, अशा प्रमुख मागण्या केल्या. यावेळी आशा स्वयंसेविकांनी आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित करत, 'बीएलओ' व 'एसआयआर' सर्व्हेची कामे विनामोबदला आणि सक्तीने लादली जात असल्याचा आरोप केला. आरोग्य सेवेसाठी नियुक्त केलेल्या आशां वर अतिरिक्त जबाबदाऱ्या टाकू नयेत. स्वेच्छेने तयार असलेल्या स्वयंसेविका शिवाय इतरांवर अशी कामे लादू नयेत, अन्यथा या कामांवर बहिष्कार टाकण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.यावेळ खालील ठळक मागण्या पूर्ण करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली पाच महिन्यांचे थकीत मानधन तात्काळ जमा करावे.,केंद्रशासना कडील सहा महिन्यांचे मानधन अदा करावे, तीन-चार वर्षांपासून प्रलंबित प्रोत्साहनपर मोबदला द्यावा, प्रत्येक आशाला पगार पावती देण्याची व्यवस्था करावी, गणवेश व स्टेशनरीचा त्वरित पुरवठा करावा. कामाचे 'हेड' पूर्ववत ठेवावेत. अन्यथा बहिष्कार सह आंदोलन तीव्र करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळ करण्यात आली. राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये आशा स्वयंसेविकांना वेळेवर मानधन मिळते. मग यवतमाळ येथे महिनो महिने टाळाटाळ का? प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल असा इशारा सीटूच्या जिल्हा सचिव उषा मुर्खे सह मोठ्या संख्येने आशा स्वयंसेवीका उपस्थित होते.

# आदिवासी जिल्ह्यात आदिवासी महिलेला बेदम मारहान

## अॅट्रॉसिटी दाखल करण्याची निवेदनातून मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. १० :** झरी-जामणी येथील नंदा अनिल गेडाम यांचे पती घरी नसताना राजू मोहितकर हे दारूच्या नशेत सदर आदिवासी महिलेच्या घरात घुसून नंदा अनिल गेडाम या आदिवासी महिलेला बेदम मारहाण करून त्यांचा विनयभंग केला. तसेच त्यांच्या मुलीला ही धक्काबुक्की करून मारहाण केले,दारूच्या नशेत अतिशय घाणेरड्या शब्दात जातीवाचक शिवीगाड केली.गोंडाळे परधाने कोलामे माजले साले,आता एकएकाला शिदेच मी करतो, तुमचा मर्डरच करतो तुम्हा आदिवासींना आता मी मारून टाकतो.

राजू मोहितकर यांच्या गुंडगिरी प्रवृत्तीमुळे झरी जामणी परिसरातील आदिवासींमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.केंद्रीय प्रतिनिधी नरेश गेडाम अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद नवी दिल्ली , तसेच बिरसा ब्रिगेड, बिरसा क्रांती दल, संघटनेने दखल घेऊन दि.९ जुलै २०२६ पोलीस अधीक्षक यवतमाळ यांना सदर घटनेचे गांभीर्य सांगून आरोपी राजू मोहितकर यांच्या मुस्क्या आवरून अॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्याचे निवेदन दिले. यावेळी संघटनाचे प्रतिनिधी नरेश गेडाम,प्रा.वसंत कनाके,एम.के. कोडापे,विष्णू कोवे,जीवन कोवे,निळकंठ तोडसाम,प्रदीप कुमरे,गौरीनंदन कनाके,रमेश आत्राम,पांडुरंग पोयाम,प्रेमप्रसाद सिडाम,गोपाल मडावी,दयाकर गेडाम, विनोद मडावी,चेतन कनाके, सुरज मारस्कोल्हे,सुरेश चिंचोळकर, दिलीप मेश्राम, मधुकर मडावी, तसेच फिर्यादी नंदा अनिल गेडाम आणि त्यांचे पती अनिल गेडाम हे सुद्धा निवेदन देताना हजर होते.संघटनेच्या प्रतिनिधींचा आक्रोश पाहून पोलीस अधीक्षकांनी त्वरित कारवाई करण्याचे आश्वासन दिले, कारवाही न झाल्यास सर्व आदिवासी संघटनांनी आंदोलनाचा इशारा दिला.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# चांदूरबाजार तालुक्यातील ५९ शेतकऱ्यांना सोयाबीनच्या बोगस बियाणांचा फटका

## तालुका कृषी विभागाकडे तक्रारी दाखल, सर्व बोगस बियाणे एकाच कंपनीचे

**चांदूरबाजार/वार्ताहर**

शासनाने शेतकऱ्यांना चांगले बियाणे मिळावे म्हणून बियाणे कंपन्यांसाठी अनेक नियम व अटी घातल्या. तरीही या खरीप हंगामात सुध्दा शेतकऱ्यांना सोयाबीनच्या बोगस बियाणांचा फटका बसला आहे.चांदूरबाजार तालुक्यात ५९ तक्रारी स्थानिक तालुका कृषी कार्यालयात दाखल झाल्या होत्या. विशेष म्हणजे या सर्व तक्रारी एकाच बियाणे कंपनीच्या, सोयाबीन बियाणांबाबतच्या आहेत.या कंपनीच्या बोगस बियाणांमुळे अंदाजे ६५ एकर क्षेत्रावरील पेरणी बुडाली आहे.

पावसाने झोडपले व राजाने मारले तर, तक्रार कोणाकडे करावी. अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. कारण तक्रार करूनही या बियाणे कंपन्यांचे काहीच होत नाही.याच कंपन्या हेच बियाणे पुढील वर्षी विक्रासाठी बाजारात उपलब्ध होते.शासन आणि कृषी खाते अशा बियाणे कंपन्यांचे काहीच करु शकत नाही.मात्र शेतकऱ्यांचा यावर्षीचा खरिप हंगाम बुडतो. तक्रार, पाहणी,पंचनामे व नुकसान भरपाई मिळेपर्यंत शेत तसेच १५ दिवस पडून राहते.तोपर्यंत खरीप पेरणीचा हंगाम निघून गेलेला असतो.बोगस बियाणांच्या सर्व चौकशी अंती शेतकऱ्यांच्या पदरात पडते ती तुटपुंजी रक्कम. बियाणांच्या बॅगची किंमत व पेरणीचा खर्च , एवढीच काय ती मदत. शेतकऱ्यांच्या भरवशावर कित्येक करोडोची उलाढाल करणाऱ्या कंपन्या,बोगस बियाणे बाबत शेतकऱ्यांना मदत देतांना हात आखडता घेतात.कारण प्राथमिक स्तरावर अशी मदत करण्यासाठी, शेतकऱ्यांच्या बाजूने कोणतेही कायदे व नियम नाहीत.याचाच गैरफायदा बियाणे कंपन्या घेतात.



### तक्रार निवारण समितीची प्रत्यक्ष पाहणी व पंचनामे

तालुक्यात सोयाबीनच्या बोगस बियाणे तक्रारी संबंधात तालुका तक्रार निवारण समितीने शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली.काही ठिकाणी फक्त दहाच टक्के बियाणांची उगवण झाल्याचे दिसून आले. काही शेतात एकही दाणा न उगवल्याचे, पाहणी दरम्यान तपासणी पथकात दिसून आले.तसेच या सर्व तक्रारी बुस्टर कंपनीच्या हु तू तू या बियाणाबाबतची असल्याचे दिसून आले. त्यामुळे तक्रार निवारण समितीच्या सदस्यांनी शेताची पाहणी करून तात्काळ पंचनामे तयार केले. यामुळे शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळण्यास सहकार्य मिळेल. तक्रार निवारण समितीत व पंचनामे करणाऱ्या टिममध्ये, उपविभागीय कृषी अधिकारी उज्वल आगरकर, तालुका कृषी अधिकारी प्रवीण मोहोड,गुण नियंत्रण अधिकारी प्रफुल्ल पवार यांचा समावेश होता.

# अमरावतीच्या 'आयुष' रुग्णालयाच्या प्रस्तावाला मंजुरी द्या

## खा. डॉ. अनिल बोंडेंची केंद्रीय सचिवांकडे मागणी

**अमरावती/का.प्र.**



जिल्ह्यात ५० खाटांचे भव्य 'आयुष' रुग्णालय उभारण्याच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रालयाने तातडीने मंजुरी द्यावी, या मुख्य मागणीसाठी भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी दिल्लीत केंद्रीय आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा यांची भेट घेतली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आणण्यासाठी खासदारांनी या भेटीदरम्यान विशेष पाठपुरावा केला.

अमरावती आणि परिसरातील नागरिकांना आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी आणि निसर्गोपचार यांसारख्या पारंपरिक चिकित्सा पद्धतींचा लाभ एकाच छताखाली मिळण्यासाठी या रुग्णालयाची मंजुरी अत्यंत महत्त्वाची आहे. या ५० खाटांच्या प्रस्तावित रुग्णालयासाठी आवश्यक असलेली जमीन, इमारतीचा आराखडा आणि सर्व तांत्रिक दस्तावेज आधीच तयार करून मंत्रालयाकडे सादर करण्यात आले आहेत. आता केवळ केंद्र सरकारच्या अंतिम मंजुरीची प्रतीक्षा आहे. जनहित आणि अमरावतीची निकड लक्षात घेता, केंद्रीय सचिवांनी या प्रस्तावाला प्राधान्य देऊन तात्काळ प्रशासकीय मंजुरी प्रदान करावी, अशी मागणी खा. डॉ. अनिल बोंडे यांनी या भेटीत केली. केंद्रीय सचिव वैद्य राजेश कोटेचा यांनी या प्रस्तावावर सकारात्मकता दाखवत,मंजुरीची प्रक्रिया लवकरच पूर्ण करण्याचे आश्वासन दिले आहे. या भेटीमुळे अमरावतीच्या 'आयुष' रुग्णालयाच्या मंजुरीचा मार्ग आता मोकळा झाला आहे.

### एसआयआर कामासाठी शिक्षकांना

# शाळेतील प्रत्यक्ष उपस्थितीतून दोन तासाची सूट दया

## प्राथमिक शिक्षक संघटनांची सीईओ व प्राथमिक शिक्षणाधिकारी यांना मागणी

**अमरावती/का.प्र**

एसआयआरचे काम करणाऱ्या सर्वच (शिक्षक सोडून) कर्मचाऱ्यांना कार्यालयातून अर्ध्या दिवसाची सवलत देण्यात आली आहे.परंतु या उलट शिक्षकांना मात्र पूर्ण वेळ शाळा व एस आय आर चे काम करण्यास सांगण्यात आले आहे.शालेय वेळातून दोन तासाची सुट देण्याची मागणी निवेदनाव्दारे जिल्हा परीषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी व प्राथमिक शिक्षणाधिकारी सतिश मुगल यांच्याकडे केली आहे.



या एसआयआरमुळे शिक्षकांची चांगलीच कुचंबणा होत आहे.विशेषतः महिला शिक्षकांची.यामधील काही भगिनी गर्भवती,काही स्तनदा माता तर काही दुर्धर व्याधींनी ग्रस्त आहेत.त्यामुळे सहा तासांची शाळा व त्यानंतर किमान तीन ते चार तास एसआयआरचे काम यामुळे शिक्षक बंधू भगिनी तणावात आले आहेत.तसेच काही शिक्षकांना स्वतःचे कार्यक्षेत्र सोडून इतर ठिकाणी सहाय्यक म्हणुन दिले आहे.सहाय्यक म्हणून दिव्यांगाला सुट दयावी असे आदेश असतांना सुध्दा शिक्षकांची सहाय्यक म्हणुन नेमणूक केली आहे.या कामामुळे शिक्षक पुरा खचून गेला आहे.या कामाला विरोध नाही पण मुदत वाढ मिळावी याकरीता शिक्षक संघटना प्रयत्न करत आहे. उष्णतामानामुळे ज्याप्रमाणे शाळेच्या वेळमध्ये शिथिलता आणली होती त्याप्रमाणेच आताही सकाळी १०.०० ते २.२० पर्यंत ६ तासिका घेऊन तिन तासिका ऑनलाइन घेण्याची परवानगी द्यावी. जेणेकरून शिक्षक १० ते २.२० प्रत्यक्ष शाळेत थांबून तद्नंतर एसआयआरचे काम करतील.मानविय दृष्टीकोनातून विचार करावा असे निवेदनातून म्हटले आहे.

निवेदन देतांना किरण पाटील ,गजानन चौधरी सुभाष सहारे,मनोज चोरपगार,अजयानंद पवार, शैलेंद्र दहातोंडे,राजेश सावरकर,मनिष काळे,सुरेंद्र मेटे, राजकुमार खर्चान,राजेश गाड,सुनील केने,गजानन मोरे,विनायक लकडे, अनील कोल्हे,राजाभाऊ राजनकर,वसीम फरहत,प्रभाकर झोड,संदीप देशमुख, मंगेश खेरडे,सतीश डोंगरे,राजेंद्र दिक्षित , किशोर मालोकार,योगेश पखाले,गौरव काळे,रितेश जगताप,चंद्रशेखर डोंगरे,सत्येंदू अभ्यंकर,राजिक हुसेन,नयन काळपांडे,सतिश नांदने,जय साव, गणेश भगत,प्रणीत ,तात्या थोरात,महेंद्र हिवे गोकुळ चारथळ, विजय सावळे आदीची उपस्थीती होती.

# प्रा.उत्तरा जगताप यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

अतुल विद्यामंदिर शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा प्रा. उत्तरा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालय, चांदूर रेल्वे येथे सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थी हिताचा प्रेरणादायी उपक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रा.उत्तरा जगताप यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या पावन स्मृतींना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.त्यानंतर प्राचार्य डॉ. पराग वडनेरकर यांनी अतुल विद्यामंदिर परिवारातर्फे प्रा.उत्तरा जगताप यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी डॉ. वडनेरकर यांनी संस्थेच्या शैक्षणिक, सामाजिक व संस्कारक्षम कार्याचा गौरव करत संस्थेची उज्ज्वल परंपरा अधिक सक्षमपणे पुढे नेण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली.त्यानंतर इयत्ता ८ वी, ९ वी व १० वीच्या गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. तसेच त्यांच्या वाढदिवसानिमित्त महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महाविद्यालय परिसरात त्यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थ्यांना शुद्ध व थंड पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने महाविद्यालयात नव्याने बसविण्यात आलेल्या आर.ओ. वॉटर कूलरचे उद्घाटनही त्यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रा.उत्तरा जगताप यांनी उपस्थितांचे आभार मानले. यापुढेही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच समाजहिताच्या विविध उपक्रमांसाठी अतुल विद्यामंदिर शिक्षण संस्था कायम कटिबद्ध राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.कार्यक्रमाचे संयोजन प्रा. एस. ए. वाणी यांनी केले. कार्यक्रमास राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पराग आर. वडनेरकर, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, स्व. अतुल जगताप हायस्कूल, चांदूर रेल्वेचे मुख्याध्यापक पी. एस. तळोकार, कुणाल सिंगलवार, राजर्षी शाहू इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका भगत तसेच स्व. सुलभाताई जगताप हायस्कूल, निमगव्हाण येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जि.प.जलजीवन मिशनने 'जलसुरक्षा @५०' अंतर्गत जनजागृती अभियान

**अमरावती/का.प्र.**

पावसाळ्यात दुषित पाण्यामुळे उद्भवणाऱ्या आजारांना प्रतिबंध घालण्यासाठी आणि ग्रामीण भागातील प्रत्येक नागरिकापर्यंत सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा संदेश पोहोचविण्यासाठी जिल्हा परिषद अमरावतीच्या जलजीवन मिशनने 'जलसुरक्षा @५०' या विशेष जनजागृती अभियानाला गुरुवारपासून प्रारंभ केला आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या अभियानाद्वारे पुढील ५० दिवस जलसुरक्षेचे विविध पैलू नागरिकांसमोर प्रभावीपणे मांडले जाणार आहेत.

पावसाळ्यात ग्रामीण पाणीपुरवठा योजनांचे सुरक्षित संचालन, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता कायम राखणे आणि पाणीजन्य आजारांपासून नागरिकांचे संरक्षण करणे या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. जल जीवन मिशनच्या माहिती, शिक्षण व संवाद (आयईसी) सेलमार्फत दररोज एक जनजागृतीपर पोस्टर तयार करून ते सामाजिक माध्यमांवर प्रसारित केले जाणार आहे. प्रत्येक पोस्टरमध्ये पाणीपुरवठा योजनांची सुरक्षित देखभाल, क्लोरीनेशन, पाण्याची गुणवत्ता तपासणी, जलस्त्रोतांचे संवर्धन, पाणीजन्य आजारांपासून बचावै, ग्रामपाणी व स्वच्छता समित्यांच्या जबाबदाऱ्या आणि नागरिकांनी घ्यावयाची आवश्यक काळजी याविषयी मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या अभियानाचा प्रभाव केवळ सामाजिक माध्यमांपुरता मर्यादित न ठेवता जिल्ह्यातील प्रत्येक गावापर्यंत पोहोचविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ग्रामपंचायती, ग्रामपाणी व स्वच्छता समित्या, पाणीपुरवठा कर्मचारी, आशा व अंगणवाडी सेविका, स्वयंसेवी संस्था तसेच विविध शासकीय विभागांच्या माध्यमातून जनजागृतीची ही साखळी अधिक व्यापक केली जाणार आहे.

पावसाळ्यात विहिरी, बोअरवेल, नद्या व इतर पाणीस्त्रोत दूषित होण्याची शक्यता वाढते. वाढवून प्रतिबंधात्मक त्यामुळे सुरक्षित पाणीपुरवठा यंत्रणेबरोबरच नागरिकांनीही स्वच्छता, क्लोरीनयुक्त पाण्याचा वापर आणि पाणी साठविताना आवश्यक खबरदारी घेणे गरजेचे असल्याचे अभियानातून अधोरेखित केले जाणार आहे. लोकसहभाग उपाययोजनांची जाणीव निर्माण करणे आणि जल जीवन मिशनची उद्दिष्टे अधिक प्रभावीपणे राबविणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब रायबोले यांच्या नेतृत्वाखाली माहिती, शिक्षण व संवाद सेल कार्यरत असून, जिल्हा व तालुकास्तरीय यंत्रणांच्या समन्वयातून हे अभियान यशस्वी करण्यासाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. आगामी ५० दिवस अमरावती जिल्ह्यातील प्रत्येक गावात जलसुरक्षेचा संदेश पोहोचविण्याचा हा उपक्रम ग्रामीण आरोग्य आणि सुरक्षित पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाचा आहे.

# खरीप हंगाम पीक विमा योजनेला प्रारंभ

## ३१ जुलै २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत खरीप हंगाम २०२६-२७ साठी शेतकऱ्यांचा सहभाग सुरू झाला आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड व रोगांमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण देण्याच्या उद्देशाने ही योजना राबवली जात आहे. अमरावती जिल्ह्यासाठी यंदा 'इफ्को टोकियो जनरल इन्शुरन्स कंपनी'ची विमा कंपनी म्हणून निवड करण्यात आली आहे.




पिकांच्या नुकसानीच्या कठीण काळात शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित राहावे आणि त्यांना नावीन्यपूर्ण व सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान वापरण्यास प्रोत्साहन मिळावे, हा या योजनेचा मुख्य हेतू आहे. उत्पादनात घट झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण आणि नुकसान भरपाई मिळणार आहे.चालू खरीप हंगामासाठी पीक विमा उतरवण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२६ आहे. तालुका कृषी अधिकारी कु. भारती जाधव यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, शेवटच्या दिवशी पोर्टलवर तांत्रिक अडचणी येऊ शकतात. त्यामुळे अंतिम मुदतीची वाट न पाहता लवकरात लवकर जवळच्या सी.एस.सी. केंद्राशी संपर्क साधून योजनेत सहभाग नोंदवावा.सी.एस.सी. केंद्रांमार्फत अर्ज करताना शेतकऱ्यांनी पीकनिहाय निश्चित केलेल्या हिश्श्यापेक्षा जास्त पैसे देऊ नयेत. कोणत्याही केंद्रावर अतिरिक्त पैशांची मागणी झाल्यास कृषी विभाग किंवा तहसील कार्यालयाकडे तात्काळ तक्रार करावी, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

योजनेच्या सविस्तर माहितीसाठी शेतकऱ्यांनी आपल्या गावातील सहाय्यक कृषी अधिकारी, उप कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी किंवा तालुका कृषी अधिकारी, अंजनगाव सुर्जी यांच्याशी थेट संपर्क साधावा. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन आपल्या खरीप पिकांना संरक्षण द्यावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

महत्त्वाच्या अटी व कागदपत्रे-ॲग्रीस्टॅक शेतकरी ओळखपत्र क्रमांक असणे अनिवार्य आहे.ई-पीक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. मृत शेतकऱ्यांच्या नावे किंवा अवैध मार्गाने विमा काढल्यास अर्ज त्वरित रद्द केला जाईल.आवश्यक कागदपत्रे: ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७/१२, ८अ, आधार कार्ड, बँक पासबुक आणि स्वयंघोषणा पत्र.

पीकनिहाय विमा संरक्षित रक्कम व शेतकरी हिस्सा-पीकविमा संरक्षित रक्कमशेतकरी हिस्सा (प्रति हेक्टर)सोयाबीन रु ६२,५००रु १,२५०कापूस रु६५,०००रु ९७५तूर रु४७,०००रु ९४०उडीद रु ३१,०००रु ६२०मूग रु २९,७००रु ५९४.

## संक्षिप्त

### 'एमपीएससी'च्या परीक्षेत भूगर्भशास्त्र विभागाची भरारा

**अमरावती -** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांनी यंदा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशाच्या भिभूमीवर विभागात शैक्षणिक वर्ष २०२६-२७साठी एम. एस्सी. भूगर्भशास्त्र आणि पाणलोट तंत्रज्ञान व व्यवस्थापन पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेलाही सुरुवात झाली आहे. विभागाचा विद्यार्थी महेंद्र गावळी याची वरिष्ठ भूवैज्ञानिक,अनिकेत अनिल गाडेकर आणि अभिजित गजानन ठाकरे यांची सहायक भूवैज्ञानिक, पवन नरेंद्र चिखलकर, अंकिता चिंधुजी नागतोगे, प्रणाली परशराम सुखदेवे, आशिष पांडुरंग भवाने, श्वेता शेखर वाहुरवाघ आणि रश्मी गोपीचंद चव्हाण या विद्यार्थ्यांची कनिष्ठ भूवैज्ञानिक पदावर अंतिम निवड झाली आहे. याशिवाय विभागातील १३ विद्यार्थी जीएसडीआयमधील साहाय्यक भूवैज्ञानिक पदासाठी एमपीएससीच्या मुलाखतीस पात्र ठरले आहेत. विभागामध्ये सध्या १० विद्यार्थी पीएच. डी. संशोधन करीत असून, त्यापैकी दोन विद्यार्थ्यांना भारत सरकारची संशोधन फेलोशिप प्राप्त झाली आहे, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. वाय. के. मावळे यांनी दिली. दरम्यान, या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या 'युनिकनेक्ट' या ॲपद्वारे ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

### डेमोग्राफी विषयाची १७ जुलै रोजी पुनर्परीक्षा

**अमरावती-**संत गाडगेबाबा विद्यापीठाची उन्हाळी मास्टर ऑफ सायन्स सेमि-१ (एनईपी) अभ्यासक्रमाच्या 'डेमोग्राफी' विषयाची पूनर्परीक्षा १७ जुलै, रोजी केंद्र क्र. २०५ या परीक्षा केंद्रावर सकाळी ९ ते दुपारी १२ या वेळेत घेण्यात येणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन विभागाकडून कळविण्यात आले आहे. सदर पूनर्परीक्षेबाबत संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना कळवावे, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे.

### आज कामगार कल्याण मंडळात परिसंवाद


**अमरावती -** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ,अमरावती गटाच्या वतीने जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त कामगार कुटुंबीय सुखी जोडप्यांचा संस्कार या उपक्रमांतर्गत वाढत्या लोकसंख्येचे दुष्परिणाम या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. हा परिसंवाद शनिवार, ११ जुलै रोजी सकाळी ११ वाजता ललित कला भवन येथे होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारप्राप्त प्रेमानंद गडपायले तर प्रमुख पाहुणे म्हणून विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कारप्राप्त संदीप शेंडे उपस्थित राहणार आहेत. यावेळी जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्षाचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. अजय साखरे, डॉ. सुयोगा पानट मार्गदर्शन करणार आहेत. तसेच वैशाली नवघरे, प्रभारी सहाय्यक कल्याण आयुक्त, अकोला विभाग यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. कामगारांमध्ये लोकसंख्या नियंत्रण, कुटुंब नियोजन, आरोग्य जनजागृती आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना दृढ करण्याच्या उद्देशाने या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून, मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कामगार कल्याण अधिकारी सुनील चव्हाण यांनी केले आहे.

### यशवंत अभ्यासिकेचे उद्घाटन



**शिराळा -** येथील म्हस्के भवन येथे यशवंत अभ्यासिका, या नवीनतम प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले.अमरावती समाजकारणी मंडळ, या नवोदित समाजकार्याचा वसा घेतलेल्या मंडळाने हा प्रकल्पाचे आयोजन केले आहे.ज्या मध्ये सर्वश्री प्रफुल्लजी औवघड,प्रदीपरावजी कोल्हे,लक्ष्मण खाडे,ॲड.विश्वास काळे,सुभाष गोहत्रे,रमेश ढवळे,सुरेश ढवळे,राजेंद्र म्हस्के इ.कार्यकारिणी सदस्यांचा समावेश आहे. प्रफुल्लजी औवघड यांनी याकरिता विशेष परिश्रम घेतले. या करिता जागेची उपलब्धता राजेंद्रजी म्हस्के यांनी विनाशुल्क करून दिली.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सर्वच समाजातील,सर्व स्तरातील स्पर्धा परिक्षेकरीता भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ह्या अभ्यासिकेत प्रवेश घेता येईल, ह्याकरता कोणतेही शुल्क आकारल्या जाणार नाही.विद्यार्थ्यांची नोंदणी प्रवेश सुरू झालेला असून सकाळी ९.०० ते रात्री ९.०० पर्यंत स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना ह्या अभ्यासिकेत लाभ घेता येईल.याकरिता विविध विषयांची पुस्तके अभ्यास उपयुक्त ,ज्या कोणाकडे पडून असतील ते डोनेट करू शकतात, त्याची यथायोग्य नोंद घेतली जाईल.तरी या भागातील विद्यार्थ्यांनी (स्पर्धा परीक्षेस बस लेल्या) पुरेपूर लाभ घ्यावा.कार्यक्रमाला विद्यार्थी पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पीडीएमसीतील आयसीटीसीला ५ स्टार मानांकन



**अमरावती -** राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था, नवी दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा रुग्णालये व वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये आयसीटीसी (ऐच्छिक समुपदेशन व चाचणी केंद्र) कार्यरत असून या केंद्रांमध्ये एचआयव्ही तपासणी, समुपदेशन व जनजागृती सेवा प्रभावीपणे दिल्या जातात. एनएसीओने निर्धारित केलेल्या गुणवत्तेच्या निकषांनुसार करण्यात आलेल्या मूल्यमापनात महाराष्ट्रातील केवळ ११ आयसीटीसी केंद्रांना ५ स्टार मानांकन प्राप्त झाले आहे. यामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथील आयसीटीसी केंद्राला सलग दुसऱ्यांदा '५ स्टार' मानांकन मिळाले असून, अमरावती जिल्ह्यातील हे एकमेव आयसीटीसी केंद्र ठरले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, संस्थेचे पदाधिकारी व सदस्य, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख, वैद्यकीय अधीक्षक डॉ. पवन टेकाडे, डॉ. सोमेश्वर निर्मळ तसेच डॉ. स्वप्निल मोहोड यांनी आयसीटीसीच्या संपूर्ण चमूचे स्वागत केले.

# वाढती लोकसंख्या सरकारपुढील मोठे आव्हान



**वाढती लोकसंख्या देशासाठी आव्हान ठरत आहे. त्यामुळे 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब', कुटुंब नियोजन, गर्भनिरोधक साधनांचा योग्य वापर,दोन मुलांमध्ये योग्य अंतर,स्त्री-पुरुष नसबंदी आणि जनजागृती यांसारख्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करून लोकसंख्या नियंत्रणात आणणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.**

## जागतिक लोकसंख्या दिन

**शिवा प्रधान**, अमरावती
**मो.क्र.७०५७६०५९६८**

**द**रवर्षी ११ जुलै हा दिवस संपूर्ण जगात जागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. वाढती लोकसंख्या, तिच्याशी संबंधित सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक प्रश्न याबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. १९८७ मध्ये जगाची लोकसंख्या ५ अब्जांवर पोहोचली. त्या पार्श्वभूमीवर १९८९ मध्ये संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाने (UNDP) ११ जुलै हा दिवस जागतिक लोकसंख्या दिन म्हणून घोषित केला. आजच्या काळात लोकसंख्या ही केवळ आकड्यांची बाब नसून देशाच्या विकासाशी, संसाधनांशी, रोजगाराशी, शिक्षणाशी, आरोग्याशी आणि पर्यावरणाशी थेट संबंधित विषय आहे.भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश आहे. प्रचंड लोकसंख्या ही एका बाजूला मोठी मानवी संपत्ती आहे, तर दुसऱ्या बाजूला विकासाच्या दृष्टीने मोठे आव्हानही आहे. त्यामुळे लोकसंख्येचे नियोजन, शिक्षण, आरोग्य सेवा आणि शाश्वत विकास यांचा समन्वय साधणे काळाची गरज बनली आहे.

**लोकसंख्या वाढीमध्ये जन्मदराची भूमिका**

लोकसंख्या वाढीमध्ये जन्मदराची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात भारतात जन्मदर खूपच जास्त होता. १९५० च्या दशकात जन्मदर सुमारे ४० प्रति हजार इतका होता. म्हणजे दर हजार लोकसंख्येमागे सरासरी चाळीस बालकांचा जन्म होत असे. त्यावेळी आरोग्य सुविधा मर्यादित असल्या तरी मोठे कुटुंब ही सामाजिक प्रतिष्ठा मानली जात होती. कृषिप्रधान अर्थव्यवस्थेमुळे अधिक हात म्हणजे अधिक कामगार अशी मानसिकता समाजात प्रचलित होती. मुलगा असावा, वंशाचा दिवा हवा, वृद्धापकाळी आधार मिळावा अशा सामाजिक समजुतींमुळे अनेक कुटुंबांमध्ये अपत्यसंख्या वाढत गेली. पुढील काळात शिक्षणाचा प्रसार, महिलांचे सक्षमीकरण, कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर, शहरीकरण आणि बदलती जीवनशैली यामुळे जन्मदरात हळूहळू घट झाली. १९८० च्या दशकात जन्मदर सुमारे ३३ प्रति हजार झाला. २००० च्या सुमारास तो सुमारे २५ प्रति हजारपर्यंत खाली आला. २०२५-२६ मध्ये जन्मदर सुमारे १६ ते १७ प्रति हजार इतका झाला आहे.

**लोकसंख्या वाढीमागे अनेक कारणे**

कुटुंब नियोजनाबाबत अपुरी जागरूकता, अशिक्षितपणा, निरक्षरता, गरिबी, सामाजिक मागासलेपणा, महिलांच्या शिक्षणाचा अभाव, पारंपरिक विचारसरणी आणि कुटुंब नियोजनाच्या साधनांचा कमी वापर हीदेखील लोकसंख्या वाढीची महत्त्वाची कारणे आहेत. काही भागांमध्ये अजूनही मोठे कुटुंब म्हणजे आर्थिक सुरक्षितता असे मानले जाते. कृषिप्रधान भागात अधिक सदस्य म्हणजे अधिक कामगार अशी धारणा असल्यामुळे अपत्यसंख्या वाढण्यास प्रोत्साहन मिळते. याशिवाय सामाजिक सुरक्षा योजनांचा अभाव, वृद्धापकाळातील आर्थिक असुरक्षितता आणि कुटुंबातील सदस्यांवर अवलंबून राहण्याची प्रवृत्तीही लोकसंख्या वाढीस हातभार लावते.

**कुटुंब नियोजनाबाबत जागरूकता कमी**

महिलांना शिक्षण, रोजगार आणि निर्णयप्रक्रियेत समान संधी मिळाल्यास अपत्यसंख्या नैसर्गिकरीत्या कमी होत असल्याचे अनेक अभ्यासांतून स्पष्ट झाले आहे. परंतु अनेक ग्रामीण भागांमध्ये महिलांना अजूनही कुटुंब नियोजनाविषयी स्वतंत्र निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मर्यादित आहे. गरिबीमुळे अनेक कुटुंबांना अधिक मुले म्हणजे भविष्यातील आर्थिक आधार असे वाटते. मुलगा जन्माला येईपर्यंत अपत्यप्राप्ती सुरू ठेवण्याची मानसिकता अजूनही पूर्णपणे बदललेली नाही. काही भागांमध्ये धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक गैरसमजांमुळे कुटुंब नियोजनाच्या साधनांचा वापर कमी प्रमाणात होतो.

**वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक गंभीर समस्या**

वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक गंभीर समस्या निर्माण होतात. रोजगाराच्या तुलनेत काम शोधणाऱ्यांची संख्या वाढल्यामुळे बेरोजगारी वाढते. रोजगारासाठी स्पर्धा तीव्र होते आणि अनेक सुशिक्षित युवकांनाही योग्य नोकरी मिळणे कठीण होते. गरिबीचे प्रमाण वाढते, कारण उपलब्ध उत्पन्नावर अधिक सदस्यांचा खर्च करावा लागतो. नैसर्गिक संसाधनांवरील दबाव वाढल्यामुळे भविष्यातील पिढ्यांसाठी संसाधनांची उपलब्धता धोक्यात येऊ शकते. त्यामुळे लोकसंख्या वाढ ही केवळ लोकसंख्येची समस्या नसून ती आर्थिक, सामाजिक, पर्यावरणीय आणि विकासात्मक आव्हान आहे.

**प्रभावी उपाययोजना आवश्यक**

विवाहाचे कायदेशीर व योग्य वय पाळण्याबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी समान आहेत हा संदेश समाजात रुजविणे काळाची गरज आहे. ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, माता व बाल आरोग्य कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे, किशोरवयीन आरोग्य शिक्षण देणे आणि कुटुंब नियोजनाची साधने सहज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जनजागृती मोहिमा, शालेय शिक्षण, माध्यमे आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून लहान कुटुंबाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविले पाहिजे. प्रत्येक कुटुंबाने 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब' ही संकल्पना स्वीकारणे आवश्यक आहे. रोजगारनिर्मिती, कौशल्य विकास, सामाजिक सुरक्षा योजना आणि शाश्वत विकास धोरणांची प्रभावी अंमलबजावणी केल्यास लोकसंख्या वाढीचे दुष्परिणाम कमी करता येतील.

**भारताकडे जगातील सर्वात मोठी युवा लोकसंख्या**

भारताकडे आज जगातील सर्वात मोठी युवा लोकसंख्या आहे. ही लोकसंख्या योग्य शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी, आधुनिक तंत्रज्ञान आणि उत्तम आरोग्य सुविधा मिळाल्यास देशाच्या आर्थिक प्रगतीचे सर्वात मोठे सामर्थ्य ठरू शकते. युवा शक्ती ही उत्पादनक्षमता वाढविणारी, नवकल्पनांना चालना देणारी आणि देशाच्या विकासाला वेग देणारी शक्ती आहे. परंतु योग्य नियोजनाचा अभाव राहिल्यास हीच लोकसंख्या बेरोजगारी, गरिबी, सामाजिक असंतोष आणि संसाधनांवरील ताण वाढविण्याचे कारण ठरू शकते. त्यामुळे लोकसंख्येला ओझे म्हणून न पाहता तिचे प्रभावी नियोजन करणे आवश्यक आहे. लोकसंख्येचा दर्जा वाढविणे, मानवी संसाधनांचा विकास करणे आणि प्रत्येक नागरिकाला शिक्षण, आरोग्य, रोजगार व सन्मानजनक जीवनाची संधी उपलब्ध करून देणे हेच भारताच्या उज्ज्वल भविष्याचे खरे आधारस्तंभ ठरतील. गेल्या सात दशकांतील लोकसंख्या वाढ भारताच्या विकासप्रवासातील एक महत्त्वाचा घटक राहिली आहे. जन्मदरात घट झाली असली तरी लोकसंख्या स्थिर होण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता आहे.

आज भारताला 'लोकसंख्यात्मक लाभांश' (Demographic Dividen) मिळालेला आहे. याचा अर्थ भारतामध्ये काम करण्याच्या वयोगटातील लोकसंख्येचे प्रमाण इतर अनेक देशांच्या तुलनेत अधिक आहे. ही परिस्थिती भारतासाठी सुवर्णसंधी आहे. जर या तरुणांना दर्जेदार शिक्षण, आधुनिक कौशल्य प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी आणि उद्योजकतेला प्रोत्साहन मिळाले, तर भारत जगातील सर्वात शक्तिशाली अर्थव्यवस्थांपैकी एक बनू शकतो. परंतु हीच युवा लोकसंख्या बेरोजगार राहिली, तर आर्थिक विषमता, सामाजिक असंतोष आणि गुन्हेगारी वाढण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे लोकसंख्या ही समस्या नसून तिचे योग्य व्यवस्थापन हेच खरे आव्हान आहे.

**लोकसंख्या वाढीचा परिणाम शेतीवरही**

लोकसंख्या वाढीचा परिणाम शेतीवरही मोठ्या प्रमाणात दिसून येतो. वाढत्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची मागणी सातत्याने वाढत आहे. दुसरीकडे शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्र औद्योगिकीकरण, नागरीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विकासामुळे कमी होत आहे. अनेक शेतकऱ्यांच्या जमिनींचे विभाजन होत असल्यामुळे शेतीचे उत्पन्न घटते. यामुळे अन्नसुरक्षा टिकवून ठेवण्यासाठी आधुनिक शेती, जलसंधारण, सेंद्रिय शेती, अन्नधान्य साठवणूक आणि तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे आवश्यक झाले आहे.

**शहरांवर विशेषतः परिणाम**

लोकसंख्या वाढीचा परिणाम शहरांवर विशेषतः अधिक जाणवतो. रोजगार, शिक्षण आणि आरोग्याच्या शोधात मोठ्या प्रमाणावर ग्रामीण लोक शहरांकडे स्थलांतर करतात. त्यामुळे शहरांमध्ये झोपडपट्ट्या वाढतात, वाहतूक कोंडी होते, प्रदूषण वाढते, घरांच्या किमती वाढतात आणि मूलभूत नागरी सुविधा अपुऱ्या पडतात. अनेक महानगरांमध्ये पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि सार्वजनिक वाहतूक या सेवांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. त्यामुळे संतुलित प्रादेशिक विकास आणि ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती करणे आवश्यक आहे.

**महिलांचे शिक्षण आणि सक्षमीकरण**

महिलांचे शिक्षण आणि सक्षमीकरण हे लोकसंख्या स्थिरीकरणाचे सर्वात प्रभावी साधन मानले जाते. ज्या समाजात महिलांचे शिक्षण अधिक असते, त्या समाजात विवाहाचे वय वाढते, मातामृत्यू आणि बालमृत्यू कमी होतात, कुटुंब नियोजनाचा स्वीकार वाढतो आणि अपत्यसंख्या कमी राहते. त्यामुळे प्रत्येक मुलीला दर्जेदार शिक्षण, आरोग्य सेवा आणि आर्थिक स्वावलंबनाच्या संधी उपलब्ध करून देणे हे लोकसंख्या नियंत्रणासाठी दीर्घकालीन आणि प्रभावी पाऊल ठरते.

**तंत्रज्ञानाचा वापरही महत्त्वाचा**

तंत्रज्ञानाचा वापरही लोकसंख्या व्यवस्थापनामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतो. डिजिटल आरोग्य सेवा, ऑनलाइन जनजागृती, मोबाईल आरोग्य ॲप्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य नियोजन आणि कुटुंब नियोजनविषयक माहिती सहज उपलब्ध करून दिल्यास नागरिकांमध्ये जागरूकता वाढू शकते. त्याचबरोबर लोकसंख्येच्या आकडेवारीचा अभ्यास करून सरकार अधिक परिणामकारक धोरणे आखू शकते.

**'मानवी विकास' हा दृष्टिकोन**

आजच्या काळात लोकसंख्या नियंत्रणाचा अर्थ केवळ जन्मदर कमी करणे असा राहिलेला नाही. प्रत्येक नागरिकाला दर्जेदार जीवनमान, पौष्टिक अन्न, सुरक्षित निवास, चांगले शिक्षण, आरोग्य सेवा, रोजगार आणि स्वच्छ पर्यावरण उपलब्ध करून देणे हेच खरे लोकसंख्या व्यवस्थापन आहे. लोकसंख्या जितकी नियोजित आणि गुणवत्तापूर्ण असेल तितका देशाचा विकास अधिक वेगाने होईल. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाबरोबरच 'मानवी विकास' हा दृष्टिकोन स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

**भारतासमोर लोकसंख्येचे आव्हान**

एकविसाव्या शतकातील भारतासमोर लोकसंख्या हे आव्हान असले तरी त्याचबरोबर ती मोठी संधीदेखील आहे. योग्य धोरणे, प्रभावी अंमलबजावणी, शिक्षणाचा प्रसार, महिलांचे सक्षमीकरण, कौशल्य विकास, पर्यावरण संवर्धन आणि जबाबदार नागरिकत्व यांच्या माध्यमातून भारत आपली विशाल लोकसंख्या देशाच्या प्रगतीचे सर्वात मोठे बळ बनवू शकतो. त्यामुळे वाढती लोकसंख्या ही समस्या नसून तिचे सुयोग्य नियोजन आणि गुणवत्तापूर्ण मानवी विकास हेच भारताच्या समृद्ध आणि शाश्वत भविष्याचे खरे सूत्र आहे.

**भविष्यातील पिढ्यांच्या जीवनमानावरही दूरगामी प्रभाव**

लोकसंख्या वाढीचा परिणाम केवळ वर्तमानावर होत नाही, तर भविष्यातील पिढ्यांच्या जीवनमानावरही त्याचा दूरगामी प्रभाव पडतो.

आज जन्माला येणाऱ्या प्रत्येक बालकाला शिक्षण, आरोग्य, पोषण, रोजगार आणि सुरक्षित पर्यावरण उपलब्ध करून देणे ही प्रत्येक राष्ट्राची जबाबदारी आहे. लोकसंख्या झपाट्याने वाढत असताना या सर्व गरजांची पूर्तता करणे अधिक कठीण होत जाते. त्यामुळे लोकसंख्या नियोजन हा केवळ कुटुंबाचा विषय नसून राष्ट्रीय विकासाचा महत्त्वाचा भाग आहे.

भारतात दरवर्षी लाखो युवक रोजगाराच्या बाजारपेठेत प्रवेश करतात. परंतु त्या प्रमाणात रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होत नाहीत. परिणामी बेरोजगारी, अल्परोजगारी आणि असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या वाढत आहे. बेरोजगारीमुळे आर्थिक असमानता वाढते, कौटुंबिक तणाव निर्माण होतो आणि सामाजिक असंतोषाला खतपाणी मिळते. त्यामुळे लोकसंख्या वाढीबरोबर रोजगारनिर्मितीवर भर देणे अत्यावश्यक आहे.

**शिक्षण व्यवस्थेवरही ताण**

वाढत्या लोकसंख्येमुळे शिक्षण व्यवस्थेवरही मोठा ताण पडत आहे. अनेक शाळा आणि महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना शिक्षक, वर्गखोल्या, प्रयोगशाळा आणि इतर शैक्षणिक सुविधा तुलनेने कमी पडतात. परिणामी शिक्षणाचा दर्जा घसरण्याची शक्यता निर्माण होते. शिक्षणाचा प्रसार हा लोकसंख्या स्थिर करण्यासाठी सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. विशेषतः मुलींच्या शिक्षणामुळे विवाहाचे वय वाढते, आरोग्याबाबत जागरूकता वाढते आणि कुटुंब नियोजनाचा स्वीकार अधिक होतो.

**निष्कर्ष:** -जागतिक लोकसंख्या दिन हा केवळ एक स्मरणदिन नसून जबाबदार नागरिकत्वाची जाणीव करून देणारा दिवस आहे. वाढती लोकसंख्या नियंत्रित करणे ही केवळ सरकारची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. शिक्षण, आरोग्य, स्त्री-पुरुष समानता, कुटुंब नियोजन आणि पर्यावरण संवर्धन यांचा स्वीकार करूनच आपण संतुलित लोकसंख्या आणि विकसित भारताचे स्वप्न साकार करू शकतो. 'लहान कुटुंब, निरोगी कुटुंब आणि समृद्ध भारत' हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचवणे हीच जागतिक लोकसंख्या दिनाची खरी प्रेरणा आहे. लोकसंख्येचे योग्य नियोजन हेच देशाच्या उज्ज्वल, समृद्ध आणि शाश्वत भविष्याचे सर्वात प्रभावी साधन आहे.

२०२६ च्या अंदाजानुसार भारताची लोकसंख्या सुमारे १४७.६ कोटी असून जन्मदर प्रति १,००० लोकसंख्येमागे १५.६ ते १६.४, तर मृत्यूदर ६.७ ते ७.२ इतका आहे. देशाचा एकूण प्रजनन दर प्रति महिलेमागे सुमारे १.९३ मुले असून सरासरी आयुर्मान ७२.७२ वर्षे आहे. भारतात दररोज सुमारे ६३ हजार बालकांचा जन्म तर २७ हजार लोकांचा मृत्यू होतो. वार्षिक जन्मांची संख्या सुमारे २.२९ कोटी, तर मृत्यूंची संख्या ९८.९ लाख आहे. लोकसंख्या अजूनही दरवर्षी सुमारे ०.८६ टक्क्यांनी वाढत असून दरवर्षी १.२ ते १.३ कोटी लोकांची भर पडत आहे. १९७१ च्या तुलनेत जन्मदर व मृत्यूदर जवळपास निम्मे झाले असले, तरी वाढती लोकसंख्या देशासाठी आव्हान ठरत आहे. त्यामुळे 'छोटे कुटुंब सुखी कुटुंब', कुटुंब नियोजन, गर्भनिरोधक साधनांचा योग्य वापर, दोन मुलांमध्ये योग्य अंतर, स्त्री-पुरुष नसबंदी आणि जनजागृती यांसारख्या उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करून लोकसंख्या नियंत्रणात आणणे ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे.

# शेतकऱ्यांची लूट

**स्वा**मीनाथन समितीचा फॉर्म्युला आणि स्पिरीट अनुसार शेतकऱ्यांना हमीभाव मिळाला असता तर २०१६ ते २०२५ या नऊ वर्षात लाभार्थी शेतकऱ्यांना २७ लाख कोटी रुपये अधिक मिळाले असते (अखिल भारतीय किसान सभेने प्रकाशित केलेली पुस्तिका) देशातील मीडियामध्ये, प्रिंट नाहीतर इलेक्ट्रॉनिक, नेहमीच शहरी, कॉर्पोरेट, पगारदार मध्यमवर्गीय बायस ओतप्रोत भरलेला असतो.त्यामुळे ग्रामीण, शेतीआधारित, असंघटित क्षेत्राबद्दल एक प्रकारचा दुजाभाव, खरेतर तुच्छताभाव प्रतिबिंबीत होत असतो. (सोशल मीडियामुळे इतर दृष्टिकोनांना एक पर्यायी व्यासपीठ मिळाले आहे याची नोंद घेऊन पुढे जाऊ) मेनस्ट्रीम मीडियातून शहरी, विशेषतः महानगरीय मध्यमवर्गीय नागरिकात असे इम्प्रेशन तयार केले गेले आहे की केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांसाठी सतत काहीतरी भरघोस करत असते. उदा शेतीमालाला हमीभाव, शेतकऱ्यांतर्फे पिक विमा शासन भरते, शेतीला लागणारी खते आणि इतर रसायनांवर सबसिडी, बँकांमार्फत आणि सहकारी पतसंस्थांमार्फत दिला जाणारा सवलतीच्या व्याजदरातील कर्जपुरवठा, किसान सन्मान योजना आणि अधूनमधून जाहीर होणारी कर्जमाफीष्ठ..आणि तरी देखील शेतकरी आणि शेतीक्षेत्राचे रडगाणे सूरच असते.

**जमिनीवरील वस्तुस्थिती काय आहे ?**

या संदर्भात अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉम्रेड राजन क्षीरसागर यांनी अलीकडेच एक पुस्तिका प्रकाशित केली आहे, त्यावर आधारित हे छोटे टिपण. माझे आणि माझ्यासारख्या मध्यमवर्गीयांचे डोळे उघडणारे.

१. देशात अंदाजे १२ कोटी शेतकरी कुटुंबे आहेत. शेतीशी निगडीत उपजीविका असणारे शेतमजूर आणि इतर वेगळे. हे मांडण्याचा उद्देश हा की शेती किफायतशीर असणे हे फक्त शेतकरी कुटुंबाचाच प्रश्न आहे असे नव्हे तर शेतीशी निगडीत अजून काही कोटी कुटुंबाचा देखील प्रश्न आहे.

२. NCRB च्या आकडेवारीनुसार १९९५ ते २०२३ याकाळात ३,९४,००० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. म्हणजे दिवसाला ४८, तासाला २!

'जेव्हा शेतीचा खर्च वाढतो, शेतीमालाला किफायतशीर भाव मिळत नाही, डोक्यावरील कर्ज वाढते तेव्हा शेतकऱ्यांची आर्थिक कोंडी होते. वर्षमागून वर्षे यातून बाहेर पडण्याचा मार्ग देखील दिसत नाही. त्यातून आत्महत्या होतात. म्हणून शेतकरी आत्महत्यांचा प्रश्न वैयक्तिक दुबळेपणाचा नाही तर हे शेतकरी विरोधी धोरणाने घडवलेले मृत्यू आहेत' इति किसान सभा..

३. स्वामीनाथम आयोगाने हमीभाव ठरवताना 'पूर्ण खर्च अधिक ५० टक्के' असा फॉर्म्युला ठरवला. पण मुळात केंद्र सरकार 'खर्चा'ची व्याख्या करताना चोरी करते. सगळे खर्च जमेस धरतच नाही. शिवाय केंद्रीय कृषी मूल्य आयोग १५ वर्षे जुनाच घाऊक किंमत निर्देशांक वापरून शेतीचे खर्च ठरवते. शेतकऱ्यांची जमीन, त्याने स्वतःने घातलेले भांडवल, शेतकरी व त्याच्या कुटुंबाने घातलेले श्रम विचारातच घेतले जात नाहीत. कापणीनंतर देखील अनेक खर्च असतात ते धरले जात नाहीत.

४. हे सर्व खर्च पकडून आणि त्यावर ५० टक्के नफा लावला असता तर हमीभाव दिलेल्या २० पिकांचा हमीभाव खूप जास्त राहिला असता. २०१६ ते २०२५ या नऊ वर्षात हमीभाव योजनेखाली लाभार्थी शेतकऱ्यांना २७ लाख कोटी रुपये अधिक मिळाले असते

५ शासकीय खरेदी शासकीय संस्थांमार्फत होते. कापूस महामंडळ, NAFED इत्यादी. तेथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा कारभार दमदाटीचा, अपारदर्शी असतो. क्लिष्ट निकष (उदा ओलावा/मॉइश्चर, गुणवत्तेचे निकष लावून घालायला आणलेला माल नाकारला जातो किंवा कमी दर्जा लेबल लावून कमी किंमत दिली जाते. पैसे वेळेवर मिळत नाहीत.

६ देशात ७,४०० नियमित बाजार समित्या आहेत. अनेक गावे मंडई पासून ३० किलोमीटर दूर तर आदिवासी भागात ६० किलोमीटर पेक्षा दूर आहेत. छोट्या आकाराच्या जमिनीतून येणारे पीक असणार किती? त्यांच्याकडे स्वतःचे वाहन नसते , टेम्पो, ट्रकचे भाडे परवडत नाही. असे कोट्यावधी छोटे शेतकरी आपला शेतमाल दलालांना विकतात. जे दलाल हमीभावाने शेतमाल खरेदी करण्यास बांधील नसतात. भाव पाडून माल खरेदी करतात. हे सत्य पुढेच येत नाही

७ शेतीला विविध प्रकारच्या निविष्ठा, इनपुट्स लागतात. डिझेल, खते, बी बियाणे, जंतुनाशके, आणि वीज. त्याचे दर सतत वाढतच असतात. त्यांचा तुटवडा असतो. शेती हंगामाचा मुहूर्त गाठण्यासाठी अनेकानेक शेतकऱ्यांना अशा गोष्टी काळ्या बाजारातून चढ्या भावात विकत घ्याव्या लागतात..


८ शासन आता शेतीक्षेत्रात डिजिटलायझेशन आणत आहे. ॲग्रिस्टॅक, फार्मर आयडी अशा योजना राबवल्या जात आहेत. या योजना शेतीच्या मालकीवर आधारित आहेत. पण आपल्या देशात लँड रेकॉर्ड्स अचूक नाहीत. अनेक बटाईदार शेतकरी आहेत. आदिवासी भागात तर पिढ्यान्पिढ्या कसलेली शेती देखील अजून नावावर नाही. यातून शेतकऱ्यांमध्ये डिजिटल डिव्हाइड वाढणार आहे.

९. भारतातील शेतकऱ्यांची मृत्युघंटा वाजू लागली आहे ती अमेरिका, न्यूझीलंड यांच्याबरोबरच्या झालेल्या / होऊ घातलेल्या मुक्त व्यापार करारांमुळे. या राष्ट्रांकडे यांत्रिकीकरण झालेले, सबसिडी खाणारे शेती आणि दूध क्षेत्र आहे. प्रचंड अतिरिक्त उत्पादन होते. ते त्यांना भारतासारख्या महाकाय मार्केटमध्ये डम्प करायचे आहे.

मेनस्ट्रीम मीडिया,शासकीय प्रवक्ते ज्यावेळी शेती क्षेत्रासाठी आणि शेतकऱ्यांसाठी बरेच काही केले जात आहे असे भासवतात त्यावेळी जमिनीवर नक्की काय परिस्थिती आहे त्याची माहिती घेतली पाहिजे.

**संजीव चांदोरकर**

# अमर्याद संततीमुळे मुलांचे योग्य संगोपन कठीण



**लो**कसंख्या विस्फोट' हा विषय केवळ एका व्यक्तीचा नसून संपूर्ण देशाच्या आणि भावी पिढीच्या भविष्याचा आहे.शहरांमध्ये गर्दी, अपुरे पाणी, वाढत्या झोपडपट्ट्या आणि रोजगारासाठी होणारी ओढाताण आपण रोजच पाहत आहोत. निसर्गाने आपल्याला जी साधनसंपत्ती दिली आहे. जमीन,पाणी,खनिजे ती मर्यादित आहे.पण लोकसंख्या मात्र अमर्याद वेगाने वाढत आहे.जागतिक लोकसंख्या दरवर्षी सुमारे ८३ दशलक्ष लोकांनी वाढते.वाढत्या लोकसंख्येविषयी जगभरात चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याने, वाढत्या लोकसंख्येच्या दुष्परिणामांची जाणीव करून देण्यासाठी आणि कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी दरवर्षी ११ जुलै रोजी जागतिक लोकसंख्या दिवस-२०२६ ची संकल्पना,'एका निष्पक्ष वस्तुनिष्ठ आणि आशादायक जगात, तरुणांना त्यांच्या इच्छेनुसार कुटुंब निर्माण करण्यासाठी सक्षम करणे'पाळला जातो.संयुक्त राष्ट्रांच्या (यूएन )नुसार २०३० मध्ये जगाची लोकसंख्या ८.५ अब्ज तर भारताची १.५१५ अब्ज इतकी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.भारताची लोकसंख्या जागतिक लोकसंख्येच्या एक षष्ठांशाहून अधिक आहे.

समाजातील जास्तीत जास्त कुटुंबे छोटी आणि आरोग्यपूर्ण असावीत आणि लोकांना शाश्वत भवितव्य मिळावे, लोकसंख्यावाढीचा दर घटवून सामाजिक दारिद्र्य कमी करण्यासाठी काही पावले उचलणे अनिवार्य आहे. जिल्हा स्त्री रुग्णालय येथे मातेची प्रसूती झाल्यावर लगेच पीपीआयुसीडी '३८०-ए' ही दहा वर्षाकरिता आणि पीपीआयुसीडी '३७५' ही पाच वर्षाकरिता बसवितात.याचा मातेच्या शरीरावर कुठलाही दुष्परिणाम होत नाही. अंतरा (डीएमपीए) इंजेक्शन तीन महिन्याच्या अंतराने घ्यावी लागतात. जर तुम्हाला गर्भधारणा हवी असेल तर तुम्हाला इंजेक्शन थांबवावे लागेल.छाया (सेंट क्रोमन )हे गोळीचे स्वरूपात आहे ही गोळी आठवड्यातून फक्त दोन वेळा घ्यावी लागते.निरोध हे पुरुषांनी वापरावयाचे गर्भनिरोधक साधन आहे यासोबतच हे लैंगिक संक्रमित सारख्या आजारापासून सुरक्षित ठेवते.इ-पिल्स ही गोळीचे स्वरूपात आहे ही गोळी असुरक्षित जीवन संबंधाच्या ७२ तासाच्या आत घ्यावी लागते.स्त्री नसबंदी शस्त्रक्रीयेच्या तुलनेत पुरुष नसबंदी केली असता पुरुषास फक्त एक दिवसच रुग्णालयात रहावे लागते. केवळ २४ तासाच्या आत सुट्टी देण्यात येते.'एनएसवि' मध्ये कुठलेही टाके मारावे लागत नाही.पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया लाभार्थ्याला ११०० रु चा आर्थिक लाभ तर स्त्री नसबंदी शस्त्रक्रीया लाभार्थिस बी पीएल/एस सी / एसटी असल्यास ६००रु पी एल/ इतरअसल्यास २५० रु आर्थिक लाभ ऑनलाइनप्रणालीद्वारे मिळतो. 'माझी कन्या भाग्यश्री योजना' –एक मुलगी असल्यास ५० हजार रुपये,आणि जर दोन मुली असतील तर बँक खात्यात प्रत्येकी २५ हजार रुपये सरकार खात्यात बचत करेल. त्या मुलीच्या वयाची१८वर्षे पूर्ण झाल्यावर १.४६ लाख रुपये मिळतील. पहिल्या मुलीच्या जन्मानंतर २ वर्षांनी आणि दुसऱ्या मुलीच्या जन्मानंतर १ वर्षापर्यंत कुटुंब नियोजन ऑपरेशन केले असे प्रमाणपत्र सादर करायचे आहे अर्ज, अधिवास प्रमाणपत्र, आई आणि वडिलांचा शाळा सोडल्याचा दाखला, दोघांचे आधारकाड , मोठ्या मुलीचा जन्मदाखला या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती,उत्पन्नाचा दाखला ही सर्व कागदपत्रे रुग्णालयामध्ये येताना सोबत असणे अत्यंत गरजेचे आहे. लाभार्थीला उत्कृष्ठ सेवा देण्याकरिता लाभार्थी चे सहकार्य फार मोलाचे आहेत आपले कुटुंब मर्यादित ठेऊन सुखी आयुष्य उपभोगू शकतो. लोकसंख्या वाढ नियंत्रणात आणण्यासाठी लोकांना, विशेषतः ग्रामीण भागातील लोकांना, शिक्षित करणे आणि कुटुंब नियोजनाच्या पद्धती सहज उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. जर आपण आताच कृती केली, तर आपण सर्वांसाठी एक चांगले पर्यावरण आणि उज्ज्वल भविष्य घडवू शकतो तेव्हा लोकसंख्या नियंत्रणाची ही जबाबदारी,चला आनंदाने स्वीकारू या....

***'दोन अपत्ये-सुखी कुटुंब'***
***हा मंत्र आता अंगीकारायला हवा,***
***अज्ञानाचा अंधकार दूर करून, माणूस जागरूक व्हायला हवा!***

■ **डॉ.विनोद पवार**
**जिल्हा शल्य चिकित्सक**
**सा.रु.अमरावती**

जनमाध्यम

अकोला जिल्हा विशेष

# मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

# २०१९ च्या कर्जमुक्ती योजनेतील १३ लाख शेतकऱ्यांनाही दोन लाखांपर्यंत दिलासा

## आमदार रणधीर सावरकर यांच्या मागणीला यश ; शेतकरी हिताच्या निर्णयाबद्दल मुख्यमंत्र्यांचे मानले आभार

▪ प्रतिनिधी | अकोला ▪

राज्यातील शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा देण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात महत्त्वपूर्ण घोषणा करत सन २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील सुमारे १३ लाख पात्र शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफीचा लाभ देण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना दिलासा मिळणार असून, यासाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या आमदार रणधीर सावरकर यांनी मुख्यमंत्री व महायुती सरकारचे आभार मानले आहेत.

आमदार रणधीर सावरकर यांनी सांगितले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेच्या अंमलबजावणीदरम्यान सन २०१९ च्या महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना केवळ ५० हजार रुपयांपर्यंतच लाभ मर्यादित ठेवण्यात आला होता. या निकषामुळे मोठ्या संख्येने शेतकरी आर्थिक मदतीपासून वंचित राहत असल्याची बाब त्यांनी विधिमंडळात तसेच मुख्यमंत्री यांच्याकडे मांडली होती.

पावसाळी अधिवेशनादरम्यान २३ जून २०२६ रोजी शेतकरी कर्जमाफीवरील चर्चेत



आमदार सावरकर यांनी दुष्काळ, अवर्षण, अतिवृष्टी आणि बदलत्या हवामानामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा उल्लेख करून राज्यातील शेतकऱ्यांना व्यापक स्वरूपात दिलासा देण्याची मागणी केली होती. त्याचबरोबर विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील अनेक आमदारांच्या शिष्टमंडळासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन संबंधित निकषांमध्ये बदल करण्याची मागणीही त्यांनी निवेदनाद्वारे केली होती. निवेदनात सन २०२१-२२ व २०२२-२३ मधील अवर्षण, त्यानंतरच्या अतिवृष्टीमुळे झालेली पिकांची हानी, तसेच २०२६-२७ मधील उशिरा झालेल्या पावसामुळे निर्माण झालेल्या अडचणींचा उल्लेख करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर २०१९ च्या कर्जमुक्ती योजनेतील शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंत लाभ मिळावा, पिककर्ज परतफेडीची काही अटी शिथिल कराव्यात तसेच पुनर्गठित कर्जधारक शेतकऱ्यांचाही योजनेत समावेश करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली होती.

मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात केलेल्या घोषणेमुळे या मागण्यांना मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाल्याचे आमदार सावरकर यांनी नमूद केले. हा निर्णय राज्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक पुनर्बांधणीसाठी महत्त्वाचा टप्पा ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.या निर्णयाबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच महायुती सरकारचे आ. रणधीर सावरकर यांनी आभार मानले. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासनाने घेतलेला हा निर्णय कृषी क्षेत्राला बळ देणारा ठरेल, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

# निकृष्टसोयाबीन बियाण्यांनी शेतक-यांचा घात ; कृषी अधीक्षक कार्यालयात आमदार अमोल मिटकरींचा 'घेराव'

### अधिकारी-प्रतिनिधींना कुलूपबंद करून संतापाचा उद्रेक दुबार पेरणीचे संकट; दोषी कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा

▪ प्रतिनिधी | अकोला ▪

अकोला जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सोयाबीन बियाणे न उगवल्याने हजारो शेतकरी आर्थिक संकटाच्या खाईत लोटले गेले आहेत. कर्ज काढून पेरणी केलेल्या शेतकऱ्यांच्या शेतात उगवणच झाली नसल्याने दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे. मशागत, पेरणी, मजुरी, बियाणे आणि इतर शेतीवरील खर्च वाया गेल्याने बळीराजा हवालदिल झाला असून या संतप्त वातावरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल रा. मिटकरी यांनी शुक्रवारी जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयावर धडक देत आक्रमक आंदोलन छेडले.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसह कृषी अधीक्षक कार्यालयात दाखल झालेल्या आमदार मिटकरी यांनी कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित बियाणे कंपन्यांच्या प्रतिनिधींना तातडीने कार्यालयात बोलावून घेतले. मात्र शेतकऱ्यांच्या प्रश्नावर ठोस निर्णय होत नसल्याने त्यांनी संतप्त भूमिका घेत, 'शेतकऱ्यांना न्याय मिळाल्याशिवाय कोणीही बाहेर जाणार नाही,' असा इशारा दिला. त्यानंतर कृषी अधीक्षक अधिकारी आणि बियाणे कंपन्यांच्या प्रतिनिधींना कार्यालयातच कुलूपबंद करून तीव्र निषेध नोंदविण्यात आला. या घटनेमुळे कृषी विभागात एकच खळबळ उडाली.



आमदार मिटकरी यांनी प्रशासनाला खडे बोल सुनावत, 'शेतकऱ्यांची फसवणूक कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. जगाचा पोशिंदा आज रस्त्यावर उतरला आहे. त्याच्या घामाची किंमत मोजावीच लागेल.

निकृष्ट बियाणे विकून शेतकऱ्यांचे नुकसान करणाऱ्या कंपन्यांना वाचविण्याचा प्रयत्न झाला, तर राज्यभर आणखी तीव्र आंदोलन उभारले जाईल,' असा इशारा दिला.

आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांच्या वतीने प्रशासनासमोर अनेक ठोस मागण्या करण्यात आल्या. तक्रारी असलेल्या सर्व बियाणे कंपन्यांची सखोल चौकशी करून त्यांना तात्काळ ब्लॅकलिस्ट करण्यात यावे, ज्या शेतकऱ्यांचे सोयाबीन बियाणे उगवले नाही त्यांना दुबार पेरणीसाठी महाबीज किंवा अन्य दर्जेदार कंपनीचे बियाणे तातडीने उपलब्ध करून द्यावे, मशागत, पेरणी, मजुरी व इतर सर्व खर्च संबंधित बियाणे कंपन्यांकडून वसूल करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना देण्यात यावा, तसेच सर्व प्रभावित शेतकऱ्यांना तातडीने नुकसानभरपाई जाहीर करावी, अशा मागण्यांवर आमदार मिटकरी ठाम राहिले.

दरम्यान, आंदोलनात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांनी 'शेतकऱ्यांची फसवणूक बंद करा', 'दोषी कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करा', 'शेतकऱ्यांना तात्काळ न्याय द्या' अशा घोषणांनी कृषी अधीक्षक कार्यालय परिसर दणाणून सोडला. संतप्त शेतकऱ्यांनी निकृष्ट बियाणे विकणाऱ्या कंपन्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. आमदार मिटकरी यांनी शेवटी प्रशासनाला स्पष्ट इशारा देताना सांगितले की, 'शेतकरी वाचला तरच देश वाचेल. जगाच्या पोशिंद्यावर अन्याय करणाऱ्यांना जनता कधीही माफ करणार नाही. शेतकऱ्यांना न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील.' या आंदोलनात किसान सेलचे जिल्हाध्यक्ष अरविंद पाटील यांच्यासह राहुल इंगोले, नितीन थडकर, गोपाल ठाकूर, आकाश धवसे, कपील मोडक, कुणाल फुंडकर, संतोष काळे, राहुल कोतवाल, ऋषी पाटील, धनंजय गावंडे, पियुष टकोरे, कार्तिक थोरात, मंगेश साडे, निलेश गुळदे, गणेश थोरात तसेच जिल्ह्यातील मोठ्या संख्येने नुकसानग्रस्त शेतकरी उपस्थित होते.

# दि अकोला अर्बन बँकेची ६३ वी वार्षिक सभा उत्साहात

### १४.१० कोटींचा निव्वळ नफा, ६.७५ टक्के लाभांश जाहीर



▪ प्रतिनिधी | अकोला ▪

महाराष्ट्रातील अग्रगण्य मल्टीस्टेट शेड्युल्ड सहकारी बँक म्हणून ओळख असलेल्या दि अकोला अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि., अकोलाची ६३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी गायवाडा येथील शेतकरी भवन (कृषी उत्पन्न बाजार समिती) येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बँकेचे अध्यक्ष शंतनु जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत बँकेच्या आर्थिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला.

सभेच्या प्रारंभी विविध क्षेत्रांतील दिवंगत मान्यवरांसह बँकेचे सभासद, ग्राहक, ठेवीदार, हितचिंतक व कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर अध्यक्ष शंतनु जोशी यांनी प्रास्ताविकातून बँकेच्या कामगिरीची माहिती देत भागधारकांचे सहकार्य हेच प्रगतीचे मुख्य कारण असल्याचे सांगितले.

३१ मार्च २०२६ अखेर बँकेचे वसूल भागभांडवल ७१.७३ कोटी रुपये, राखीव व इतर निधी २२४.९६ कोटी रुपये, ठेवी १,८९८.३१ कोटी रुपये, तर कर्जवाटप १,१२३.६४ कोटी रुपयांवर पोहोचल्याची माहिती देण्यात आली. बँकेने २०२५-२६ या आर्थिक वर्षात १४.१० कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळविला असून निव्वळ एनपीए केवळ ०.६१ टक्क्यांवर राखण्यात यश आल्याचे सांगण्यात आले. यावर्षीही भागधारकांना ६.७५ टक्के लाभांश देण्यास सुरुवात करण्यात आली आहे. अहवाल वर्षात बँकेने तीन नवीन शाखा सुरू केल्या असून, संपूर्ण गुजरात राज्यात कार्यक्षेत्र विस्तारण्यास रिझर्व्ह बँकेची मंजुरी मिळाल्याची माहितीही अध्यक्षांनी दिली. बँकेच्या सक्षम आर्थिक स्थितीबद्दल सभासदांनी समाधान व्यक्त केले. यावेळी १८ जून २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त मुख्य कार्यकारी अधिकारी आर. एम. सोनटक्के यांनी सादर केले. त्यास सभेने मंजुरी दिली. त्यानंतर उपाध्यक्ष राहुल राठी तसेच संचालक केदार खपली, धनंजय पाटील, किरण खोत, शार्दुल दिगंबर आणि राहुल गोयनका यांनी विषयसूचीतील विविध विषय सभेसमोर मांडले. सर्व विषयांना उपस्थित भागधारकांनी एकमताने मंजुरी दिली. सभेचे संचालन संचालक दीपक मायी यांनी केले, तर आभार प्रदर्शन संचालक माधव बनकर यांनी केले. यावेळी संचालक, बोर्ड ऑफ मॅनेजमेंटचे सदस्य, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी राधेश्याम चिराणिया, कर्मचारी प्रतिनिधी पंजाब अव्हाळे तसेच बँकेचे वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने भागधारक उपस्थित होते.

## जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे विरल मितुलकुमार पटेल यांचे वतीने सदर जाहीर सूचना देतो ती येणेप्रमाने,

**मिळकतीचे वर्णन :** मौजे - केमलापूर, सर्वे क्रं. ३१ / १ (संगणीकृत ७/१२ उताऱ्यानुसार-३१/१/९-B), प्लॉट क्रं. ९-Bयाचे ऐकून क्षेत्रफळ 1065.24 चौ. फुट. (संगणीकृत ७/१२ उताऱ्यानुसार ९९ चौ. मीटर), ता. अकोट आणि जिल्हा. अकोला.

सदर मिळकत माझे पक्षकार नामे विरल मितुलकुमार पटेल यांच्या मालकीची आहे. तदनंतर, त्यांनी PIRAMAL FINANCE LIMITED. येथे गृह कर्जासाठी अर्ज केला असता, सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदीखत ज्याचे दि. १६/०६/२००८ रोजीचे दस्त क्र. २०१९ मूळ दस्त गहाळ झालेले आहे. तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहान / राष्ट्रीयकृत/खाजगी//पतसंस्था/सहकारी/ इतर बँक बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किवा वारस हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही आणि सदर मालमत्ता हि PIRAMAL FINANCE LIMITED. येथे गहाण करण्यात येईल करिता हि जाहीर सूचना.

ठिकाण- तालुका- अकोट आणि जिल्हा अकोला
दि. १०/०७/२०२६

आपला
**ॲड. रवींद्र रु. वाटाणे**
स्नेहगंधा कॉलनी, अमरावती,
मो. नं. ९८२३६९८७४५

# तहसीलदारांची ग्रामपंचायतीला नोटीस

## सावरगाव मुरूम वाहतूक प्रकरणी १३ जुलैला सुनावणी



▪ प्रतिनिधी | खेट्री ▪

पातूर तालुक्यातील सावरगाव येथे सुरू असलेल्या पेव्हर ब्लॉकच्या कामासाठी रात्रीच्या वेळी अवैधरित्या मुरूमाची वाहतूक करून त्याचा वापर केल्याच्या तक्रारीची महसूल प्रशासनाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी तहसीलदार राहुल वानखडे यांनी सावरगाव ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक (सचिव) यांना नोटीस बजावत १३ जुलै रोजी सुनावणीस उपस्थित राहण्याचे आदेश दिले आहेत.

जानू बाबुसिंग राठोड यांनी २९ जून रोजी तहसीलदारांकडे केलेल्या तक्रारीत सावरगावातील दोन ठिकाणी सुरू असलेल्या पेव्हर ब्लॉकच्या कामासाठी रात्रीच्या वेळी मुरूमाची अवैध वाहतूक करून त्याचा वापर करण्यात आल्याचा आरोप केला होता. या प्रकरणाचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर महसूल विभागाने हालचाली सुरू करत ८ जुलै रोजी घटनास्थळी पाहणी केली. महसूल पथकाने स्थळनिरीक्षण करून पंचनामा तयार केला असून त्याचा अहवाल तहसीलदारांकडे सादर करण्यात आला आहे.

त्यानंतर तहसीलदारांनी ९ जुलै रोजी ग्रामपंचायतीच्या सरपंच व सचिवांना नोटीस बजावत १३ जुलै रोजी रॉयल्टीच्या पावत्या आणि संबंधित कागदपत्रांसह लेखी म्हणणे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. सुनावणीस गैरहजर राहिल्यास नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा इशाराही नोटिशीत देण्यात आला आहे.

### रात्रीच्या वाहतुकीवरून संशय

गौण खनिजासाठी रॉयल्टी घेतली असली तरी रात्रीच्या वेळी उत्खनन अथवा वाहतूक करण्यास नियमांनुसार परवानगी नसते. त्यामुळे सावरगाव येथे रात्री मुरूमाची वाहतूक झाल्याच्या आरोपामुळे या प्रकरणाकडे गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे. १३ जुलैच्या सुनावणीत महसूल प्रशासन कोणता निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ९२८/२०२६ — प्रोसेस नं.८१७४/२०२६
चौ.ता. २९/०७/२०२६ — दिनांक : ०१/०७/२०२६

**अर्जदार :** चंदा मोहन इंगळे रा. वार्ड नं. २, कापशी रोड, कापशी रोड, कापशी, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. श्री. गोमा जानु पाटील २. श्रीमती सत्यभामा गोमा पाटील
**पत्ता :-** रा. व्दारा चंदा मोहन इंगळे रा. वार्ड नं. २, कापशी रोड, कापशी रोड, कापशी, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्री. गोमा जानु पाटील यांचे दि. ०५/०२/१९७५ रोजी व तसेच मयत श्रीमती सत्यभामा गोमा पाटील यांचे दि. ०३/०६/१९६६ रोजी मेन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २१३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ४७४/२०२५ — जा. क्र. १७३१/२०२६
ने.ता. ०४/०८/२०२६ — दिनांक : ०८/०७/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला

**विरुध्द**

**प्रतिवादी :-** गायत्री रामकृष्ण ननावरे व इतर

प्रति,
प्रतिवादी क्र. १) गायत्री रामकृष्ण ननावरे रा. पुष्पलता अपार्टमेंट, प्लॉट क्र. ३०४, हनुमान मंदीराजवळ, अकोला क्र. २) पवन नथ्थुजी रायपुरे रा. जलाराम सोसायटी क्र. ५, आकाशवाणी केंद्रासमोर, शास्त्री नगर, अकोला क्र. ३) पंकज बबनराव घुमरे रा. सत्यदेव कॉलनी, वेद मंगल कार्यालयामागे, गुडधी, मोठी उमरी अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,४३,९६३/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जवाब देण्यासाठी दि. ०४ माहे ऑगष्ट, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचें सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची/वादाची एकतर्फी सुनावणी सन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. ०८ माहे जुलै, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का

**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

## जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ४६१/२०२५ — जा. क्र. १७२८/२०२६
ने.ता. ०४/०८/२०२६ — दिनांक : ०८/०७/२०२६

**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला

**विरुध्द**

**प्रतिवादी :-** नितीन प्रमोदराव साकळकर व इतर

प्रति,
प्रतिवादी क्र. १) नितीन प्रमोदराव साकळकर रा. विघ्नहर्ता अपार्टमेंट, सिटी कोतवाली मागे, अकोला क्र. २) योगेश अशोकराव जोशी रा. भारती प्लॉट, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला क्र. ३) युसुफ खान रुस्तम खान रा. महानगर, व्ही. टी. सी. अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु.९०,०२८/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जवाव देण्यासाठी दि. ०४ माहे ऑगष्ट, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी करुन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी.

आज दि. ०८ माहे जुलै, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का

**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

## जाहीर नोटीस

**वि.०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ८४७/२०२६ — प्रोसेस नं.८४९८/२०२६
चौ.ता. १८/०७/२०२६ — दिनांक : ०८/०७/२०२६

**अर्जदार :** १. शांतादेवी मदनलाल राठी २. सतिष मदनलाल राठी दोघेही रा. व्ही. एच. बी. कॉलनी, ५/३, २४ एम. आ. जी. रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. प्रविण मदनलाल राठी रा. ०१, राणीसती अपार्टमेंट, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. प्रेमलता प्रशांत काकाणी रा. मु. पो. कारंजा लाड, ता. कारंजा लाड, जि. वाशिम. ५. मिना संतोष चांडक रा. व्दारा संतोष चांडक, शिवाजी अपार्टमेंट, समर्थ शॉप, बडनेरा रोड, अमरावती, ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मदनलाल व्दारकादास राठी
**पत्ता :-** रा. व्दारा सतिष राठी, रा. व्ही. एच. बी. कॉलनी, ५/३, २४ एम. आ. जी. रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मदनलाल व्दारकादास राठी यांचे दि. १३/०२/२०१८ रोजी ओझोन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), पातुर यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं.९०/२०२६ — प्रोसेस नं.८१८/२०२६
चौ.ता. १७/०८/२०२६ — दिनांक : ०६/०७/२०२६

**अर्जदार :** १. गंगाबाई प्रल्हाद काठोळे वय ८३ वर्ष धंदा - घरकाम २. मंदा प्रमोद कोठोडे उर्फ काठाळे वय ३९ वर्ष धंदा - घरकाम ३. ओम प्रमोद काठोळे वय २० वर्ष धंदा - शिक्षण ४.कविता प्रमोद काठोळे वय २१ वर्ष धंदा - घरकाम नं. १ ते ४ रा. आलेगांव ता. पातुर जि. अकोला ५. कावेरी नरेश तेलंग वय २५ वर्ष धंदा - घरकाम रा. बलदेव ता. मंगरूळपीर जि.वाशिम

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक
**मयताचा पत्ता :-** मयत : प्रमोद प्रल्हादराव काठोळे
**पत्ता :-** रा. आलेगांव ता. पातुर जि. अकोला

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रमोद प्रल्हादराव काठोळे यांचा मृत्यु दिनांक १२/०५/२०१८ रोजी आलेगांव ता. पातुर जि. अकोला येथे झाला.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत उपरोक्त न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही हयाची नोंद घ्यावी. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. ह्याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०६/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक:- ०६/०७/२०२६
पातुर

शिक्का

**आदेशानुसार**
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क. स्तर), पातुर

# कामगारांच्या मागणीला प्रशासनाचा सकारात्मक प्रतिसाद

**वर्धा/ जनमाध्यम**

स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून, बांधकाम कामगारांना ९० दिवसांच्या कामाचे प्रमाणपत्र देण्याबाबत जिल्हा परिषद प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांच्या गटविकास अधिकाऱ्यांना पात्र बांधकाम कामगारांना शासनाच्या नियमानुसार कोणताही विलंब न करता प्रमाणपत्र देण्याचे स्पष्ट लेखी आदेश जारी केले आहेत.

संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश रामसंजीवन अग्निहोत्री यांच्या नेतृत्वाखाली शेकडो बांधकाम कामगारांनी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले होते. प्रमाणपत्र देण्यात होणाऱ्या दिरंगाईमुळे हजारो कामगारांची बांधकाम कामगार मंडळाकडे नोंदणी, नूतनीकरण तसेच शैक्षणिक, आरोग्य, आर्थिक आणि इतर कल्याणकारी योजनांचे लाभ रखडत असल्याकडे निवेदनातून लक्ष वेधण्यात आले होते.

या निवेदनाची तातडीने दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सर्व गटविकास अधिकाऱ्यांना पात्र कामगारांना ९० दिवसांचे कामाचे प्रमाणपत्र त्वरित देण्याचे निर्देश दिले आहेत. कोणत्याही कामगाराला विनाकारण अडथळा निर्माण करू नये तसेच शासनाच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.



**बांधकाम कामगारांना ९० दिवसांचे प्रमाणपत्र तातडीने द्या**

यासंदर्भात उमेश अग्निहोत्री यांनी प्रशासनाच्या निर्णयाचे स्वागत करताना सांगितले की, हा निर्णय जिल्ह्यातील हजारो बांधकाम कामगारांसाठी दिलासादायक आहे. संघटनेने आता जिल्ह्यातील एकाही पात्र बांधकाम कामगाराला केवळ प्रमाणपत्राअभावी शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून वंचित राहू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. तसेच सर्व पंचायत समित्यांमध्ये आदेशाची अंमलबजावणी होत आहे की नाही, यावर संघटना लक्ष ठेवणार असल्याचे सांगितले.

या वेळी विजय आष्टनकर, आशिष बुरखुरे, मारोती मुठाळ, राजू मुठाळ, दिलीप कोरे, नरेंद्र मानकर, खटेश्वर देवलकर, राजेंद्र घोडमारे, श्रीकांत पाल, अतुल रेवसकर, विजय उमाटे, अरविंद गौळकर यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि हजारो बांधकाम कामगार उपस्थित होते.

# विश्वविद्यालयाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न

**वर्धा/ जनमाध्यम**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाचे काही विद्यार्थी विश्वविद्यालयाची प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने सोशल मीडियावर विश्वविद्यालयाविरुद्ध हेतुपुरस्सर दिशाभूल करणारा आणि तथ्यहीन प्रचार करत आहेत. काही विद्यार्थी परवानगीशिवाय प्रशासकीय इमारतीत मनमानीपणे धरणे धरून बसले आहेत. विश्वविद्यालयाच्या प्रशासकीय निर्णयानुसार, स्त्री अध्ययन विभाग आणि फिल्म अध्ययन विभाग वर्धा येथून प्रादेशिक केंद्र प्रयागराज येथे स्थलांतरित करण्यात आले.

२०२२-२३ सत्रासाठी पीएचडी प्रवेश प्रक्रिया थांबविण्याचा खटला, याचिका क्रमांक ६९३/२०२५ अंतर्गत माननीय उच्च न्यायालय, मुंबईच्या नागपूर खंडपीठात विचाराधीन आहे. सध्या, पीएचडी प्रवेश प्रक्रियेवर २७ जुलै रोजी होणाऱ्या विद्या परिषदेच्या आगामी बैठकीत विचार केला जाईल. कुलगुरू स्वतः पीएचडी प्रवेशाबाबत गंभीर असून, त्यांनी हा प्रस्ताव विद्या परिषदेत विचारार्थ सादर करण्यासाठी सकारात्मक पुढाकार घेतला आहे.

कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी पदभार स्वीकारल्यापासून विश्वविद्यालयातील शैक्षणिक उपक्रमांना गती मिळाली आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली नुकताच सहावा दीक्षांत समारंभ पार पडला, ज्यात भारताच्या माननीय राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी विद्यार्थ्यांना पदव्या आणि पदके प्रदान केली. काही दिवसांपूर्वी, विश्वविद्यालयाने 'वंदे मातरम' या गीताच्या शताब्दीनिमित्त एका भव्य सोहळ्याचे आयोजन केले होते. विश्वविद्यालय अनुदान आयोगाच्या निधीतून, भारतीय ज्ञान परंपरेवर आधारित एक वर्षाचा प्रायोगिक प्रकल्प विश्वविद्यालयाच्या रिध्दपूर (अमरावती) येथील सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी मराठी भाषा आणि तत्वज्ञान अध्ययन केंद्रात राबवला जात आहे. या प्रकल्पांतर्गत, सकल लिपीत उपलब्ध असलेल्या १२व्या शतकातील ज्ञानाचे हिंदीत भाषांतर केले जात आहे.

विश्वविद्यालयातील शैक्षणिक आणि प्रशासकीय उपक्रमांना कमकुवत करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित करण्यासाठी एक तथाकथित आंदोलन चालवले जात आहे.

# हिंगणघाट-जाम महामार्गावरील डांबर वाहून गेले

## कोट्यवधींचा टोल, तरी जीवघेणे खड्डे कायम

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

हिंगणघाट ते जाम दरम्यान राष्ट्रीय महामार्ग ४४ वरील खड्डे बुजविण्यासाठी करण्यात आलेले नवीन डांबरीकरण अवघ्या आठ दिवसांत उखडल्याचा आरोप होत असून, त्यामुळे कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पावसाच्या काही सरींमध्येच डांबर वाहून गेल्याने रस्त्यावर पुन्हा जीवघेणे खड्डे निर्माण झाले असून वाहनचालकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

हिंगणघाट आणि समुद्रपूर तालुक्यांना जोडणारा तसेच नागपूर-चंद्रपूर या प्रमुख शहरांना जोडणारा हा महामार्ग दररोज हजारो विद्यार्थी, नोकरदार, व्यापारी आणि नागरिक वापरतात. मात्र निकृष्ट कामामुळे अपघातांचा धोका वाढल्याने जनतेत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.



दरवर्षी टोल आणि विविध करांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांचा महसूल शासनाच्या तिजोरीत जमा होत असताना, जनतेच्या पैशातून होणारी विकासकामे एवढ्या कमी कालावधीत उखडत असतील तर हा निष्काळजीपणा आहे की भ्रष्टाचार, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

हिंगणघाट विधानसभेचे कार्यसम्राट म्हणून ओळखले जाणारे आमदार समीर कुणावर या गंभीर प्रकरणावर कोणती भूमिका घेतात, दोषी कंत्राटदारांवर कारवाईसाठी पुढाकार घेतात का आणि जनतेला सुरक्षित रस्ता मिळवून देण्यासाठी प्रशासनाला धारेवर धरतात का, याकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

नागरिकांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि संबंधित विभागाकडे कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्याची, तसेच निकृष्ट कामासाठी जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज ॲंड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक - २२४
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/ २०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

सी.जी.-एम.एच.-अ.-22062026-273691
CG-MH-E-22062026-273691

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II–खण्ड ३–उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. ३१२३। नई दिल्ली, शुक्रवार, जून १९, २०२६/ ज्येष्ठ २९, १९४८
No. ३१२३। NEW DELHI, FRIDAY, JUNE 19, 2026/JYAISTHA 29, 1948

रेल मंत्रालय
(मध्य रेलवे)
**अधिसूचना**
मुंबई, १७ जून, २०२६
**रेलवे (संशोधन) अधिनियम २००८ की धारा २०E के तहत**

**का.आ. ३२४६(अ).** - केन्द्रीय सरकार ने रेल अधिनियम, १९८९ (१९८९ का २४) एवं रेल्वे (संशोधन) अधिनियम २००८ (२००८ का ११) (जिसे इसमें इसके पश्चात उक्त अधिनियम कहा गया है) की धारा २०'क' की उपधारा (१) के अधीन जारी, भारत के राजपत्र असाधारण भाग II, खंड ३, उपखंड (ii) ०७ अप्रैल २०२६ में प्रकाशित भारत सरकार के रेल मंत्रालय (रेलवे बोर्ड) की अधिसूचना संख्यांक का. आ. १७०९ तारीख ०८ अप्रैल २०२६ इसमें उसके पश्चात उक्त अधिसूचना कहा गया है, द्वारा उक्त अधिसूचना से उपाबद्ध अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि को, महाराष्ट्र राज्य के **वर्धा जिले** में विशेष रेल परियोजना अर्थात, **'वर्धा- नागपूर चौथी रेल्वे लाईन'** के निष्पादन, अनुरक्षण, प्रबंधन और प्रचालन के लिए उचित ऐसी भूमि का अर्जन करने के आशय की घोषणा की थी।

और, उक्त अधिसूचना का सार उक्त अधिनियम की धारा २०-(ए) की उपधारा (४) के अधीन दैनिक स्थानीय समाचार पत्रों अर्थात **'दैनिक जनसंग्राम'** एवं **'दैनिक आरवी टाइम्स'** २३ अप्रैल २०२६ को प्रकाशित किया गया था। और सक्षम प्राधिकारी को कोई आक्षेप प्राप्त नहीं हुए थे और उन पर विचार किया गया है तथा सक्षम प्राधिकारी द्वारा तदनुसार आदेश पारित कर दिए गए हैं।

THE GAZETTE OF INDIA : EXTRAORDINARY [PART II—SEC. 3(ii)]

**और सक्षम प्राधिकारी ने उक्त अधिनियम की धारा २० (ई) की उप-धारा (१) के अनुसरण में अपनी रिपोर्ट केंद्रीय सरकार को सौंप दी है।**

अतः अब केंद्रीय सरकार, सक्षम प्राधिकारी से उक्त रिपोर्ट के प्राप्त होने पर और उक्त अधिनियम की धारा २०(ई) की उपधारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह घोषणा करती है कि इसमें उपाबद्ध अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि पूर्वोक्त प्रयोजन के लिए अर्जित की जाएगी। और यह की केंद्र सरकार उक्त अधिनियम की धारा २०-(ड) कि उपधारा (२) के अनुसरण में यह घोषणा करता है की, राजपत्र अधिसूचना के प्रकाशित होने पर इसमें उपाबद्ध अनुसूची में विनिर्दिष्ट भूमि सभी विलगमो से मुक्त होकर केन्द्रीय सरकार में अत्यंतिक रूप से निहित हो जाएगी।

**अनुसूची**

**महाराष्ट्र राज्य के वर्धा, जिला में सेलू तालुका के अंतर्गत का, सक्षम प्राधिकारी अर्थात भूसंपादन अधिकारी तथा उप-जिलाधिकारी (विपाविम), वर्धा के अधीन विशेष रेल परियोजना 'वर्धा-नागपूर चौथी रेल्वे लाईन' रेल्वे मार्ग के लिए अर्जित की जाने वाली भूमि का संरचना या उसके रहित संक्षिप्त विवरण इस प्रकार है।**

| अ. क्र. | भूसंपादन प्रकरण क्रमांक | गाँव का नाम | तालुका | ७/१२ अनुसार भूधारक का नाम | सर्वे न. | भूधारण पध्दती | ७/१२ अनुसार कुलक्षेत्र (हे.आर.) | संपादन क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ०२/एलएक्यु/४७/२०२४-२५ | चारमंडल | सेलू | मनोज ज्ञानेश्वर भोयर, निखिल ज्ञानेश्वर भोयर, दिपाली ज्ञानेश्वर भोयर, | २५१/अ | १ | १.५००० | ०.१६८१ |
| 2 | | | | आनंदराव दौलतराव करडे | २५१/ब/१/अ | १ | १.०६०० | ०.०३६५ |
| 3 | | | | इंदुबाई ज. आनंदराव करडे | २५१/ब/१/ब | १ | ०.८१०० | |
| 4 | | | | सुनिल आनंदराव करडे | २५१/ब/२ | १ | २.११०० | ०.०८२५ |
| | | | | | | कुल | ५.४८०० (हे.आर.) | ०.२८७१ (हे.आर.) |

फा. सं.: G197/WR-NGP 4th Line/Charmandal Vlg/20E]

भुवनेश कुमार गुप्ता, मुख्य प्रशासनिक अधिकारी (निर्माण)

**MINISTRY OF RAILWAYS**
**(CENTRAL RAILWAY)**
**NOTIFICATION**
**Mumbai, the 17th June, 2026**
**Under clause 20E of the Railway (Amendment) Act 2008**

**S.O. 3246(E).**—Whereas, by the notification of the Government of India in the Ministry of Railways (Railway Board), number S.O. 1709, dated the 8 April 2026, published in the Gazette of India, Extraordinary, Part-ii, section 3, Sub-section (ii), dated the 7 April, 2026 (hereinafter referred to as the said notification ) and issued under sub-section (1) of section 20A of the Railway Act, 1989 (24 of 1989) and Railway (Amendment) Act, 2008 (11 of 2008) (hereinafter referred to as the said Act), the Central Government declared its intention to acquire the land in the schedule annexed to the said notification for the purpose of execution, maintenance, management and operation of the Special Railway Project namely **'Wardha- Nagpur 4th line'** in Wardha District in the State of Maharashtra.

And whereas, the substance of the said notification has been published in the daily local newspapers, namely, **'Dainik Jansangram'** and **'Dainik Arvi Times'** dated 23 April 2026 under sub-section (4) of section 20A of the said Act.

**भारत का राजपत्र : असाधारण**

And whereas, no objections were received and same have been considered by the Competent Authority accordingly orders have been passed. And whereas, in pursuance of sub-section (1) of section 20 (E) of the said Act, the Competent Authority has submitted its report to the Central Government.

Now therefore, upon receipt of the report of the Competent Authority and in exercise of the powers conferred by sub-section (1) of section 20 (E) of the said Act, the Central Government hereby declares that the land specified in the Schedule annexed here to shall be acquired for the a foresaid purpose.

And further, in the pursuance of sub-section (2) of section 20 (E) of the said Act, the Central Govt. hereby declares that on publication of the notification in the Official Gazette, the land specified in the Schedule annexed hereto shall vest absolutely in the Central Government free from all encumbrances.

**SCHEDULE**

Brief description of the land to be acquired, with or without structures, falling within the Special Railway Project **'Wardha- Nagpur 4th line'** in the Taluka Seloo & district of Wardha, the State of Maharashtra.

| Sr. No | Land Acquisition Case No. | Village Name | Tahsil | Name of Landholder | Survey No. | Land holding practices: | Total area as per 7/12 (Ha.): | Acquisition Area (Ha.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 02/LAQ-47/24-25 | Charmandal | Seloo | Manoj Dhyaneshwar Bhoyar, Nikhil Dhyaneshwar Bhoyar, Dipali Dhyaneshwar Bhoyar | 251/A | 1 | 1.5000 | 0.1681 |
| 2 | | | | Aanandrao Daulatrao Karde | 251/B/1/A | 1 | 1.0600 | 0.0365 |
| 3 | | | | Indubai J. Aanandrao Karde | 251/B/1/B | 1 | 0.8100 | |
| 4 | | | | Sunil Aanandrao Karde | 251/B/2 | 1 | 2.1100 | 0.0825 |
| | | | | | | Total | 5.4800 (Ha.) | 0.2871 (Ha.) |

**[F.No.: G197/WR-NGP 4th Line/Charmandal Vlg/20E]**

**Bhuvnesh Kumar Gupta, Chief Administrative Officer (Construction).**

**क्र. जिमाका - वर्धा / ६७ / २०२६ - २७**

# चौकीदाराला मारहाण करून लूट करणारा युवक अटकेत

**अमरावती/प्रतिनिधी:-** बांधकामस्थळी रात्रपाळीवर असलेल्या एका वृद्ध चौकीदाराला बेदम मारहाण करून त्याच्याकडील रोख रक्कम लुटणाऱ्या आरोपीला अमरावती शहर गुन्हे शाखेने अटक केली आहे. गुन्ह्यानंतर आरोपी शहरातच लपून बसल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी सापळा रचून त्याला घरातून ताब्यात घेतले. पुढील कारवाईसाठी आरोपीला फ्रेजरपुरा पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. उषा कॉलनी परिसरात राहणारे देवनारायण शिवचरण पांडे (वय ७२) हे फुलबासा, मंगलधाम कॉलनी परिसरातील एका बांधकामस्थळी चौकीदार म्हणून कार्यरत आहेत. १ जुलै रोजी पहाटे दोनच्या सुमारास ते ड्युटीदरम्यान झोपले असताना श्रवण राजेश बनारसे आणि त्याच्या तीन साथीदारांनी त्यांच्यावर अचानक हल्ला केला. चौघांनी पांडे यांना मारहाण करून त्यांच्या खिशातील १ हजार ५० रुपयांची रोख रक्कम जबरदस्तीने हिसकावून घटनास्थळावरून पलायन केले.

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१३०१/२०२६
श्रीमती व्दारका अधिक तीन विरुध्द निरंक
पुढील ता.१८.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. **Dwarka Kisanrao Mankar** Age 72 Yrs. Occu.: Housewife W/o Late Kisanrao Mankar, R/o. Tembha, Post-Pusada, Tq. & Dist. Amravati-444801
2. **Pravin Kisanrao Mankar S/o.** Late Kisanrao Mankar, Age 50 Yrs. Occu.: Farmer. R/o. Tembha VTC Pusada, Po. Pusda, Sub. Dist. Amravati Dist. Amravati- 444801
3. **Varsha Vilasrao Pund S/o.** Late Kisanrao Mankar, Age 49 Yrs. Occu.: Housewife, R/o. Rama, Tq. Bhatkuli, Dist. Amravati- 444602
4. **Nilima Thakare, W/o. Pravinraoji Thakare,** Age 44 Yrs. Occu.: Housewife, R/o. Near 11 Kholi Jawahar Ward, VTC- Pandhurna, Post. Pandhurna, Sub Dist. Pandhurna, Dist. Chhindwara, (M.P.)- 480334

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत किसनराव भिमराव मानकर** हे **दि.२५.०३.२०२०** रोजी टेभा, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **व्दारका अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती व्दारका अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०८.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

---

प्रो.नं.१६३४/२०२६
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर
दि.०६.०७.२०२६

वि.सहदिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय
किरकोळ अर्ज क्र./२७८/२०२६ दिनांक ०३.०८.२०२६

## जाहीर नोटीस

**अर्जदार** -१. यशवंत वकीला गवई, वय ५२ वर्षे, धंदा - मजुरी रा.अशोक नगर, दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अमरावती

**--- विरुध्द ---**

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, **वकीलाजी गुणाजी गवई** हे दिनांक **२६.०३.२०११** रोजी मरण पावले आहेत.

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०६.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
सहा.अधीक्षक (प्रशासन)
दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

---

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की माझे पक्षकार नामे **शुभम नरेंद्रपंत चौधरी** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन** - मौजे - आलमपूर, प्रणो- करजगाव, मालमत्ता क्र.८० याचे एकुण क्षेत्रफळ १७१२ चौ.फुट, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **शुभम नरेंद्रपंत चौधरी** यांना वारसाने वडिलोपार्जित मिळाली आहे. तसेच वरील नमुद मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय इतर भागगड, कोणाचा मालकी अथवा वारसा हक्क, इतर बँक गहाण, बोझा, नोंद, कोणतीही हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.वर ही जाहीरात प्रसिद्ध झाल्याच्या ७ दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर मालमत्ता Piramal Finance Limited, येथे कर्जासाठी गहाण ठेवण्यास अर्जानुसार गहाण करण्यात येईल. करीता ही जाहीर सुचना देत आहे.

ठिकाण - चांदूर बाजार
जि. अमरावती
दि.१०.०७.२०२६

शिक्का
**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.११२३/२०२६
**संतोष व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०४.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
१. संतोष रामनारायण साहु (गुप्ता), वय ५१ वर्षे, व्यवसाय - मजुरी रा.खामगांव बँकेजवळ, चित्रा चौक, अमरावती
२. ईशान संतोष साहु, वय २३ वर्षे, व्यवसाय - शिक्षण रा.राकेश मार्केटीग समोर, चित्रा चौक, बच्छराज प्लॉट, अमरावती
३. वेदांश संतोष साहु, वय १९ वर्षे, व्यवसाय - शिक्षण रा.खामगांव बँकेजवळ, चित्रा चौक, अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत रीना संतोष साहु** यांचे दिनांक **२७.०९.२०२५** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार संतोष व ईतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **संतोष व ईतर** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०३.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील**

ने.ता.१०.०८.२०२६
किरकोळ (RMJC) अर्ज क्र.१७५/२०२६

१. **निर्मला राजेंद्र बकसरे**
रा.राजुरा, अकोला, अकोली जहांगिर, अकोला
२. **वनिता राघुनाथ पंडे**
३. **अर्जुन राघुनाथ पंडे**
क्र.२ व ३ रा. फुबगांव, ता.नांदगाव खंडे. जि.अमरावती

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी **मयत ताई भिमराव पंडे** यांचा **मृत्यू दि.२७.११.२०१९** मध्ये **फुबगांव, ता. नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती** येथे झाला. मयताचा मुलगा नामे **रघुनाथ भिमराव पंडे** यांचा मृत्यू दि.१२.०२.२०२१ मध्ये **टी.बी. हॉस्पिटल, अमरावती,** ता.जि. अमरावती येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ ही मुलगी असून अर्जदार क्र. २ ही सून व अर्जदार क्र.३ हा नातु आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक ०२ जुलै २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
मा. दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

---

## NAME CHANGE

सर्वत्र लोकांना जाहीर करण्यात येते की माझे नाव **ANKUSH MANOHARRAO NEWARE** नसून **ANKUSH MANOHARAO NEWARE** हे नाव आहे. आणि सदर व्यक्ती एकच आहे. यापुढे मला **ANKUSH MANOHARAO NEWARE** या नावाने ओळखावे.

**ADDRESH** : S/O MANOHARAO NEWARE, MU. PO. PALA, TA. MORSHI, MORSHI RULAR, AMRAVATI MAHARASHTRA- PIN- 444905

---

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्क:**
**९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९**

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

## चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 338/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व**शालीमार महा बचत गट पाटीपुरा, अमरावती**
नोंदणी क्रमांक ता.जि.अमरावती एफ-२८६९७
बाबत अर्जदार - **नासीर हुसैन मुजुफ्फर हुसैन**
गैरअर्जदार - १) निकहत परवीन अब्दुल साजिद

या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत-

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२३.०६.२०२६** रोजी दिली.

शिक्का
**अधीक्षक,**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

प्रो.क्र.३६८/२०२६
दिनांक २३.०३.२०२६

**नमुना कमांक ७**
**दिवाणी न्यायालय, भातकुली**
**श्री.व्ही.जी.परवरे याचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर) भातकुली, जि.अमरावती**

**अंमलबजावणीचा आदेश का देण्यात येऊ नये, याचे कारण दाखविण्याविषयी नोटीस (आज्ञावली २१, नियम १६)**

**नियमित दरखास्त/१/२०१९**
**मधुकर नामदेवराव चारथड --वि-- श्रीमती गोरजा उर्फ गिरजा नारायण सोमाणी**
**पुढील ता.१८.०७.२०२६**

प्रति,
श्रीमती गोरजा उर्फ गिरजा नारायण सोमाणी
पुणे, ह.मु.श्री.सदन वलगांव,
ता.जि.अमरावती (महाराष्ट्र)

ज्याअर्थी **मधुकर नामदेवराव चारथड** यांनी दावा कमांक यामधील हुकूमनामा त्याच्याकडे अभिहस्तांकित करुन (किंवा अभिहस्तांकित न करता) हस्तातरित करण्यात आला आहे. या सबबीवरुन, उक्त हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीसाठी या न्यायालयाकडे अर्ज के आहे. म्हणून अंमलबजावणीचा आदेश का देण्यात येऊ नये, याचे कारण दाखविण्यासाठी तुम्हाला तारीख १८.०७.२०२६ रोजी या दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भातकुली न्यायालयासमोर हजर व्हावे लागेल याची तुम्ही यावरुन दखल घ्यावी.

आज २३.०३.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)**
**भातकुली जि.अमरावती**

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३१८/२०२६ ने.ता.०१.०८.२०२६

**अर्जदार ः**
१. उमा जनार्दन धोटे, वय ५९ धंदा - घरकाम
२. अंकित समीर धोटे, वय २५ धंदा - खाजगी नोकरी
३. अनंत समीर धोटे, वय १७ वर्षे, धंदा - शिक्षण (अज्ञान)
अज्ञान पालन कर्ता आई मनिषा समीर धोटे
सर्व रा.मुंगाबाई कॉलनी, मुरवारा, कटनी, ता.जि.कटनी (म.प्र.)

**-- विरुध्द --**

गैरअर्जदार ः निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत सुधा भाऊराव निनावे** यांचा मृत्यू दिनांक **२७.०९.२०१७** रोजी मेट्रो हॉस्पीटल ॲंड रिसर्च सेंटर, जबलपूर (म.प्र.) येथे उपचारादरम्यान झालेला असून ते कायमचे रा.महाराणी लक्ष्मीबाई वार्ड नं.२७ कटनी, ता.जि.कटरी (म.प्र.) येथे रहिवासी होते.तसेच **मृतक भाऊराव रामचंद्र निनावे** यांचा मृत्यू दि.**२७.१२.२०१८** रोजी झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३१८/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**३०.०६.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

No.6
CIVIL JUDGE SENIOR DIVISION
IN THE COURT OF Shri R.V.Kadam
11th Jt.Civil Judge, Sr. Dn. Amravati, AMRAVATI

**SUMMONS FOR LEGAL REPRESENTATIVE OF DECEASED DEFENDANT (0.22, R. 4)**

Spl.C.S.256/2019
**BANK OF MAHARASHTRA -- Vs-- Balasaheb Satpute**
**Next Date 12.08.2026**

To,
1) Balasaheb Dnyaneshwar Satpute, R/o Belona Po.Hiwarkhed, Tq.Morshi, Dist.Amravati.
2) Sau.Mita Baburao Yawale, R/o Dawargaon, Tq. Dist. Amravati.

Whereas **BANK OF MAHARASHTRA** nstituted a suit in this Court on the against the defendant Dnyaneshwar Krushnarao Satpute, who has since deceased, and whereas the said plaintiff has made an application to this Court alleging that you are the legal representative of the said Dnyaneshwar Krushnarao Satpute deceased, and desiring that you be made the defendant in his stead

You are hereby summoned to attend in this court on the 12.08.2026 at 11.00 A.M. to defend the said suit and, in default of your apprance on the day specified, the said suit will be heard and determined in your absence.

Given under my hand and the seal of the Court, this 06.07.2026

शिक्का **11th Jt.Civil Judge, Sr.Dn.,Amravati**

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१३३१/२०२६
**अनुराग व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.१९.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Anurag Mangeshrao Watane, Age 36 Yrs. Occu.: Labour
2. Sulbha Mangeshrao Watane, Age 60 Yrs. Occu.: Household
Both R/o 17, Pooja Colony, Deep Nagar-2, Farshi Stop, Amravati
3. Sneha Mangeshrao Watane, Age 38 Yrs. Occu.: Household
R/o A-105, Aeropolis Phase 1, Porwal Road, Lohgaon, Pune

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **मंगेश गणेशराव वाटाणे** हे दिनांक 29.05.2026 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **अनुराग व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **अनुराग व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०९.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२३४/२०२६
**अशोक -वि- श्रीमती छाया अधिक दोन**
पुढील ता.०६.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Shri Ashok Vinayak Pohokar, Age 63 Yrs. Occu.: Farmer R/o Pohokar Pura, Walgaon, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः
1. Smt.Chaya Ganesh Pohokar, Age 62 Yrs. Occu.: Housewife
2. Shri Pranjal Ganesh Pohokar, Age 37 Yrs. Occu.: Service
3. Smt.Yogine Manoj Thakre, Age 33 Yrs. Occu.: Housewife
1 to 3 R/o Tower No.2, Flat No.411, Near Shell Petrol Pump, Bus Road, Mulshi Pune, Bhukum-412115

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Smt.Shantabai Vinayak Pohokar हे दिनांक 09.09.2007 रोजी **वलगांव, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Shri Ashok Vinayak Pohokar -- Vs -- Smt.Chaya Ganesh Pohokar+2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shri Ashok Vinayak Pohokar -- Vs -- Smt.Chaya Ganesh Pohokar+2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०२.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.३१६/२०२६ ने.ता.०७.०८.२०२६

**अर्जदार ः**
१. मनिषा समीर धोटे, वय ५० धंदा - घरकाम
२. अंकित समीर धोटे, वय २५ धंदा - खाजगी नोकरी
३. अनंत समीर धोटे, वय १७ वर्षे, धंदा - शिक्षण (अज्ञान)
अज्ञान पालन कर्ता आई मनिषा समीर धोटे
सर्व रा.मुंगाबाई कॉलनी, मुरवारा, कटनी, ता.जि.कटनी (म.प्र.)

**-- विरुध्द --**

गैरअर्जदार ः निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत समीर जनार्दन धोटे** यांचा मृत्यू दिनांक **०७.०१.२०२४** रोजी मार्बल सिटी हॉस्पीटल ॲंड रिसर्च सेंटर, जबलपूर (म.प्र.) येथे उपचारादरम्यान झालेला असून ते कायमचे रा.मुंगाबाई कॉलनी, मुरवारा, कटनी, ता.जि.कटरी (म.प्र.) येथे रहिवासी होते.तसेच **मृतक शेवंतीबाई जनार्दन धोटे व मृतक जनार्दन बकाराम धोटे** यांचा मृत्यू दि.**०४.०२.१९९३ व २६.०३.१९७५** रोजी रा.मुंगाबाई कॉलनी, मुरवारा, कटनी, ता.जि.कटरी (म.प्र.) येथे झालेला आहे. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.३१६/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**३०.०६.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१२९३/२०२६
**श्री.गोविंदराव अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१७.०८.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार ः
1. Mr.Govindrao Dattatray Bahiruwale, Age 72 Yrs. Occu.: Retired
Late Nandkishor Dattatray Bahiruwale,
Legal Heirs of Late Nandkishor D.Bahiruwale
2. Smt.Pratiksha Nandkishor Bahiruwale, Age 49 Yrs. Occu.: Housewife
3. Mr.Kiran Nandkishor Bahiruwale, Age 27 Yrs. Occu.: Service
4. Ku.Snehal D/o Nandkishor Bahiruwale, Age 21 Yrs. Occu.: Education
All R/o Near Nanda Market, Rajapeth, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दत्तात्रय विश्श्वनाथ बहीरवाले** हे दिनांक 24.12.2017 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. व मयत **शकुंतला दत्तात्रय बहीरवाले** ही दि.१२.०२.१९८७ रोजी अमरावती येथे मरण पावली. अर्जदार **गोविंदराव अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **गोविंदराव अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०८.०७.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

Shri Shivaji Education Society, Amravati's
**SHRI SHIVAJI ARTS & COMMERCE COLLEGE, AMRAVATI**
**TENDER NOTICE 2026-27**
No.SSC/ 2026 Dated : /07/2026

Sealed Tenders/Quotations are invited for :-

Stationery, Printing Material, Computer, Laptop, Sports Material, Furniture, Furniture Material / Electric Material with Wages (Office & Class Rooms) Battery, Inverter, UPS, Plumbing Material, Building Material & Labour Charges, Colouring Material and Labour Charges, College Instruments & its repairs, Women Hostel Mess, Canteen (On Contract Basis), etc. other requirements list is available in Office.

Distributor, Dealers are advised to submit the competitive offers in the prescribed format available in the College Office (excluding holidays) at the cost of Rs.200/- and should submit their willingness and required documents for MOU alongwith sealed quotation. Last date of issue and submission of Quotations is 16 July 2026 upto 5.00 pm. The concerned should note that College Purchase Committee will open all the tenders and will be informed to concerned for negotiation. All the rights to accept or reject the offer without assigning any reason is reserved with the Principal.

**Shri Harshavardhan P. Deshmukh**
**President,**
**Shri Shiraji Education Society, Amravati**

**Shri Dilipbhau B.Ingole**
**Treasurer,**
**Shri Shiraji Education Society, Amravati**

**Dr.Mahendra V.Mete,**
**I/c Principal,**
**Shri Shivaji Arts & Commerce College, Amravati.**

---

## WANTED
### Walk-In-Interview

**SHRI SHIVAJI EDUCATION SOCIETY, AMRAVATI'S**
**SHRI SHIVAJI SHARIRIK SHIKSHAN MAHAVIDYALAYA, AMRAVATI.**

Applications are invited for appointments of Candidates for Teaching in the College on contributory (CHB) basis as under.

**Vacancies for Grant in aid Courses/Programmes**

As per Regulation No.2/2020, and its para-11, G.R. Dated 17.10.2022

| Sr. No. | Subject/ Course | Total No. of Contri-butory Post |
|---|---|---|
| 01 | B.P.Ed. | 40 |
| 02 | B.P.E. | 24 |

**Eligibility :**
Academic qualifications shall be as per U.G.C.Regulation 2018 (University Direction No.08/ 2019 & 14/2019) for the post of Assistant Professor as directed in the Govt. Resolution No.संकिर्ण 2018/(१८५/१८)/मशि-३ Dtd.14-11-2018. The other conditions and remuneration shall be as fixed by Govt. in the said G.R.

**Interview Date 21-07-2026, Time 12.00 A.M. to 3.00 P.M.**
**Venue - Shri Shivaji College of Physical Education, Shivaji Nagar, Amravati-444603, Ph.No.9422361735, 9890691547**

**Shri Harshwardhan P.Deshmukh**
**President,**
**Shri Shivaji Education Society, Amravati.**

**Dr.Subhash P.Gawande**
**Off.Principal**
**Shri Shivaji College of Physical Education, Amravati.**

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३०३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### नगर परिषद शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप

**चांदूर रेल्वे-**शहरातील पालकांचा खाजगी शिक्षण संस्थेकडे असलेला कल लक्षात घेता नगरपरिषदेमधील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत आहे. त्यासाठी प्रभागातील नगरसेविका निलोफर यांनी स्वतःच्या खर्चातून गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. चांदुर रेल्वे शहरातील नगरपरिषद अंतर्गत छत्रपती शिवाजी प्राथमिक शाळा मध्ये प्रभागातील नगरसेविका निलोफर मोहम्मद आसिफ यांच्या तर्फे गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.यावेळी मुख्याध्यापक नितीन नंदनवार,शिक्षिका वैशाली कोरडे, पदमा सोनवणे,सोनू बुल्ले,वैशाली वानखडे उपस्थित होते.गोरगरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करताना गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना सुद्धा दरवर्षी शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येईल असे नगरसेविका निलोफर मोहम्मद आसिफ यांनी सांगितले.कार्यक्रमाचे संचालन वैशाली कोरडे यांनी केले तर प्रास्तविक मुख्याध्यापक नितीन नंदनवार तर आभार प्रदर्शन वैशाली वानखडे यांनी केले.

### बीएलओ प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

**मोर्शी-**काँग्रेसचे मोर्शी विधानसभा प्रमुख विपुल भडांगे यांच्या मार्गदर्शनात मतदार यादी विशेष सखोल पुननिरीक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत बीएलओ प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन ११ जुलै रोजी दौलतराम प्लाझा सिंभोरा रोड येथील सभागृहात करण्यात आले आहे.या कार्यक्रमाला प्रमुख प्रशिक्षक म्हणून निखिलराजनकर उपस्थित राहणार आहे.निवडणूक आयोगाच्या आदेशावरून जिल्ह्यात विशेष सखोल मतदार पुननिरीक्षण मोहीम सुरू झाली आहे.मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी बीएलओ यांना थेट तुमच्या घराच्या दारावर जाऊन गणना अर्ज भरण्याची सूचना करण्यात आली आहे.जर तुम्ही हा अर्ज भरून दिला नाही तर तुमचे नाव मतदार यादीतून वगळले जाऊ शकते. जिल्हा निवडणूक कार्यालयाने जिल्ह्यातील कामासाठी ३७२३ बीएलओ ची नियुक्ती केली आहे.या कामात बी एल ओ सोबत मतदारांची सजगता आवश्यक आहे.या मोहिमेत मतदारांचे नाव पत्ता जन्मतारीख छायाचित्र या सर्व तपशिलांची अचूक खात्री केली जात आहे.मृत व्यक्ती,कायमस्वरूपी स्थलांतरित झालेले नागरिक आणि दुबार नावे मतदार यादीत आहे त्यांना हटवून मुक्त करण्याचे आदेश देण्यात आले.तरी मोर्शी विधानसभा मतदारसंघात खरोखरच बीएलओ आले आहेत की नाहीत,आपले नाव मतदार यादीत राहणार आहे की नाही याची खातरजमा मतदारांनी करणे आवश्यक असल्याचे सामाजिक कार्यकर्ता विपुल भडांगे यांनी सांगितले.



### डॉ.तन्मय बुब यांचा सत्कार

**अमरावती-**समाजसेवक डॉ. गोविंद कासट यांच्या ‘गोविंदम’ या निवासस्थानी अमरावतीचे महापौर यांच्या हस्ते युवा हृदयरोगतज्ज्ञ डॉ. तन्मय बुब व त्यांच्या स्त्री रोग तज्ञ प्रणिता यांचा शाल व पुस्तक देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.‘गोविंदम’ हे सामाजिक व वैचारिक देवाणघेवाणीचे प्रेरणास्थान असून यापूर्वी डॉ. शिवाजीराव पटवर्धन, साधना व बाबा आमटे,पद्मश्री प्रभाकर वैद्य, डॉ. विकास आमटे, डॉ. भारती आमटे, डॉ. प्रकाश आमटे, डॉ. मंदाकिनी आमटे तसेच सिंधुताई सपकाळ यांसारख्या अनेक मान्यवरांनी डॉ. कासट यांच्या निवासस्थानी भेटी दिल्या आहेत. हृदयरोग विषयावरील ‘ह्रूर्ेिर्े र्द ऍ्दत्दुब’ हे त्यांचे पुस्तक येत्या ऑगस्ट महिन्यात प्रकाशित होत असून, या विषयावर पुस्तक लिहिणे ते देशातील कदाचित सर्वात युवा हृदयरोगतज्ञ असणार आहेत.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुदर्शन गांग होते. या सत्कार प्रसंगी सीए निलेश लाठीया, मातोश्री कमलताई गवई, धीरूभाई सांगाणी, प्राचार्य डॉ. सुभाष गवई, रितेश बुब, डॉ. रवींद्र कासट, डॉ. गोविंद कासट, सुभाषजी अग्रवाल, दिनेश सेठिया आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती.कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ. गोविंद कासट यांनी केले.याप्रसंगी डॉ. राजू डांगे, डॉ. चारुदत्त चौधरी, दिलीप सदार, प्रवीण वासनिक, घनश्याम राठी, मंजु राठी,प्रभा आवारे,दीपक दार्वेकर,अनिल सरदार,संजीवनी वाट, संजय खोंडे,लक्ष्मण तडस,अनिल वानखडे, विष्णुपंत कांबे, तारा शर्मा, हर्षल बनसोड, विवेक सहस्त्रबुद्धे तसेच मित्रपरिवार उपस्थित होते.

# महानगर पालिकेच्या स्वच्छता निविदा प्रक्रियेत अनियमितता

## आ.संजय खोडके यांचा विधान परिषदेत आरोप

**अमरावती/वार्ताहर**

महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापनाच्या तब्बल ४३ कोटी रुपयांच्या निविदाप्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली असून कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला ५० टक्के बिल अदा करण्यात आल्याने अमरावती महानगर पालिकेला जवळपास २ कोटींचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून सदरची निविदा प्रक्रिया रद्द करून फेर निविदा करण्याची मागणी आ.संजय खोडके यांनी विधान परिषदेतून केली आहे.

आ.संजय खोडके यांनी सभागृहाला अवगत केले कि, अमरावती महानगर पालिकेच्या निवडणुकीपूर्वी प्रशासकराज काळात स्वच्छतेच्या कामांसंबंधी निविदा प्रक्रिया राबवून २८-११-२०२५ रोजी मेसर्स कोणार्क इन्फ्रास्ट्रक्चर या कंपनीसोबत करारनामा करण्यात आला. मात्र सदर कंपनीने निविदेतील करारनामा नुसार स्वच्छतेची कामे केली नसल्याने त्यासंदर्भात नागरिकांच्या तक्रारी समोर आल्या आहे.

पूर्वीची घनकचरा व्यवस्थापनाच्या संदर्भातील निविदा ही ३० कोटींची असतांना नंतर ४३ कोटींचे टेंडर काढण्यात आले. पूर्वीच्या टेंडरमध्ये घरगुती कचरा संकलन व विल्हेवाट लावण्याचो कामाबरोबरच धुवारणी, फवारणीची कामे सुद्धा अंतर्भूत होती.

त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले कि, निविदेमध्ये स्पष्ट नमूद करण्यात



आले कि, कोणार्क कंपनीला करारानुसार नवीन वाहनांचा वापर करावा लागणार आहे. मात्र त्यांनी जुनीच वाहने वापरली असून तीही कमी असल्याने अमरावती शहरात स्वच्छतेच्या कामांचा दर्जा व गुणवत्ता ढासळली आहे. नवीन वाहने उपलब्ध करण्यासंदर्भात कंपनीला ९० दिवसाची सूट सुद्धा देण्यात आली असतांना सुद्धा त्यांनी अद्यापपर्यंत वाहने घेतली नाही तर करारानुसार कंपनीला एक वर्षानंतर बिलामध्ये ५ टक्के वाढवून देऊ असे सांगण्यात आले. परंतु एग्रीमेंट मध्ये त्यांनी मूळ काम डिसेंबरपासून चालू केले असतांना सुद्धा बिलामध्ये नवीन आर्थिक वर्षापासून म्हणजेच १ एप्रिलपासून त्यांना बिलात पाच



टक्के रक्कम वाढवून देण्यात आली.

त्यामुळे अमरावती महानगर पालिकेला २ कोटी रुपयांचा भुर्दंड सहन करावा लागत आहे. अशा प्रकारे करारनाम्यातील अनेक बाबी संशयास्पद असून अमरावतीमध्ये साफसफाईच्या कामात प्रचंड अनियमितता झाली असल्याचा आरोप आ. संजय खोडके यांनी केला असून ही निविदा प्रक्रिया रद्द करून फेर निविदा काढण्याची मागणी त्यांनी सभागृहासमक्ष लावून धरली.

### विभागीय चौकशी करून ९० दिवसात कार्यवाही

मंत्री उदय सामंत यांनी अमरावतीमध्ये घनकचरा व्यवस्थापन संदर्भात कंपनीला करारानुसार ५० टक्के बिल अदा करण्यात आले आहे. पूर्वी ३० कोटींचे टेंडर ४३ कोटींवर करण्यात आले असल्याचे मान्य केले. अमरावती महानगर पालिकेच्या स्थायी समितीने देखील यावर आक्षेप नोंदविला असल्याचे सुद्धा खरे आहे. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची दखल घेत या संपूर्ण प्रकरणाची विभागीय आयुक्तांमार्फत सखोल चौकशी करण्यात येईल, अशी घोषणा मंत्री ना. उदय सामंत यांनी सभागृहात केली. तसेच ९० दिवसामध्ये या प्रकरणाचा संपूर्ण अहवाल प्राप्त होताच त्याप्रमाणे कार्यवाही करणार असल्याचे आश्वासन सुद्धा मंत्रिमहोदयांनी सभागृहातुन दिले आहे.

# बोगस बियाणांचा विषय कृषीमंत्र्यांच्या दालनात

## कंपनीवर फौजदारी कारवाईची प्रशांत कांबळे यांची मागणी

**तिवसा/वार्ताहर**

निसर्गाची अवकृपा आणि आर्थिक संकट झेलणाऱ्या बळीराजावर आता बोगस बियाणे कंपन्यांमुळे दुबार पेरणीचे मोठे संकट ओढवले आहे. अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यासह राज्यभरात अनेक नावाच्या कंपनीच्या निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची फसवणूक झाली असून, याप्रकरणी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी थेट राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे पहिली अधिकृत तक्रार दाखल केली आहे.

यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांनी घरातील दागिने गहाण ठेवून,धान्य विकून तर काहींनी सावकारांकडून कर्ज काढून सोयाबीनची पेरणी केली होती. मात्र काही कंपनीच्या



बियाण्यांनी शेतकऱ्यांचा मोठा घात केला. पेरणी करून अनेक दिवस उलटूनही शेतात एकही अंकुर फुटलेला नाही.

यामुळे तिवसा तालुक्यातील शेकडो एकर क्षेत्रातील शेतकरी हवालदील झाले आहेत. बाजारात अनधिकृत आणि निकृष्ट बियाणे विक्रीस उपलब्ध असताना स्थानिक कृषी विभाग आणि गुणवत्ता नियंत्रण यंत्रणा काय करत होती, असा संतप्त सवाल या निवेदनातून उपस्थित करण्यात आला आहे.

स्थानिक पातळीवर अधिकारी शेतकऱ्यांच्या तक्रारी गंभीर घेत नसल्याने थेट मंत्र्यांकडेच तक्रार केली आहे. यात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या बियाणे कंपनीवर तातडीने फौजदारी गुन्हे दाखल करून तिला संपूर्ण महाराष्ट्रात ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी केली आहे.

तसेच, कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ तिवसा तालुक्यातील बाधित भागातील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन १०० टक्के पंचनामे पूर्ण करावेत, नुकसानग्रस्त अल्पभूधारक शेतकऱ्यांना शासन किंवा कंपनीकडून रोख आर्थिक भरपाई मिळावी आणि दुबार पेरणीसाठी शासनाने मोफत दर्जेदार बियाणे व खते पुरवावीत, तिवसा तालुक्यातील शेतकरी गेल्या हंगामाच्या थकीत नुकसान भरपाईपासून अद्याप वंचित असून, ती मदतही तात्काळ त्यांच्या बँक खात्यात जमा करावी, अशी आग्रही मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांनी केली आहे.

### युवा सायकलपटू सुजल कोहळे यांचा गौरव

**अमरावती-**श्री. शिवाजी बहुउद्देशीय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अमरावती येथे सोळा वर्षांच्या युवा सायकलपटू सुजल कोहळे याच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले. विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रसाद देशमुख यांनी सुजल कोहळे यांना विशेष निमंत्रित म्हणून आमंत्रित करून विद्यार्थ्यांसमोर त्यांच्या प्रेरणादायी प्रवासाची माहिती मांडण्याची संधी उपलब्ध करून दिली.सुजल कोहळे यांनी अवघ्या १६ व्या वर्षी कन्याकुमारी ते श्रीनगर असा सुमारे ३,००० किलोमीटरचा प्रदीर्घ आणि आव्हानात्मक सायकल प्रवास केवळ १२ दिवस १२ तासांत पूर्ण करून जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वासाचा आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या या अभूतपूर्व कामगिरीबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ, शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार



करण्यात आला. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत आपल्या सायकल मोहिमेतील अनुभव, आलेली आव्हाने, शारीरिक व मानसिक तयारी, वेळेचे नियोजन तसेच कठोर परिश्रम, सातत्य आणि सकारात्मक दृष्टिकोन यांच्या बळावर कोणतेही ध्येय गाठता येते, हा प्रेरणादायी संदेश दिला.उपस्थित शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनीही त्यांच्या या ऐतिहासिक कामगिरीचे टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## निकृष्ट सोयाबीन बियाणांचा फटका

# सावळापूर पूर्णा परिसरातील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट

## उगवण न झाल्याने वाढला आर्थिक बोजा; पंचनामे, नुकसानभरपाई व दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

अचलपूर तालुक्यातील सावळापूर पूर्णा परिसरात निकृष्ट दर्जाच्या सोयाबीन बियाण्यांचा फटका बसल्याने अनेक शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. समाधानकारक पाऊस होऊनही अनेक शेतांमध्ये बियाण्यांची उगवण न झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

मौजा सावळापूर, पूर्णा, खानापूर, टोंगलाबाद आणि बाजीतपूर येथील शेतकऱ्यांनी विविध कंपन्यांचे प्रमाणित सोयाबीन बियाणे पेरले होते. मात्र अनेक ठिकाणी उगवण अत्यल्प राहिल्याने पुन्हा पेरणी करण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. त्यामुळे बियाणे, मशागत, मजुरी व इतर शेती खर्चात मोठी वाढ झाली असून शेतकऱ्यांचे आर्थिक गणित कोलमडले आहे.

परिसरातील शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे लेखी तक्रारी



दाखल करून तातडीने शेतांची पाहणी व पंचनामे करण्याची मागणी केली आहे. निकृष्ट बियाणे पुरवणाऱ्या संबंधित कंपनीची सखोल चौकशी करून दोषी आढळल्यास कंपनी व विक्रेत्यावर कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत व नुकसानभरपाई देण्याबरोबरच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बियाण्यांच्या गुणवत्तेची काटेकोर तपासणी करावी, अशी एकमुखी मागणी परिसरातील शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे.

गावातील कृषी सेवा केंद्रातून इनोव्हेज कंपनीच्या १०८ जातीच्या सोयाबीनच्या पाच बॅग खरेदी करून पेरणी केली.मात्र समाधानकारक पाऊस होऊनही बियाण्यांची उगवण झाली नाही. त्यामुळे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.याप्रकरणी कृषी विभागाकडे तक्रार दाखल केली असून शासनाने सखोल चौकशी करून नुकसानभरपाई देत दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी अपेक्षा आहे.’

**मिलिंद गोदे,** शेतकरी (सावळापूर)

‘मी ३ जुलै २०२६ रोजी माझ्या शेतात इनोव्हेज कंपनीच्या १०८ जातीच्या सोयाबीनची पेरणी केली. काही दिवसांनी शेताची पाहणी केली असता बियाणे उगवण्याऐवजी पूर्णपणे कुजलेले दिसले. त्यामुळे मोठा आर्थिक फटका बसला असून दुबार पेरणीचे संकट निर्माण झाले आहे. याबाबत कंपनीच्या प्रतिनिधीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रतिसाद मिळाला नाही.त्यामुळे कृषी विभाग, अचलपूर येथे लेखी तक्रार करून संबंधित बियाणे कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.’

**बाळू नांदणे,** शेतकरी सावळापूर

# डॉ.राजेंद्र गोडे वैद्यकीय महाविद्यालयात ‘हर्निया कॉन्क्लेव्ह २०२६’चे यशस्वी आयोजन

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र स्टेट चॅप्टर ऑफ असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडिया (MASI) आणि असोसिएशन ऑफ सर्जन्स, अमरावती (ASA) यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच डॉ. राजेंद्र गोडे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथील शल्यचिकित्सा विभागाच्या सहकार्याने आयोजित ‘हर्निया कॉन्क्लेव्ह २०२६’ चे उत्साहपूर्ण आणि शैक्षणिक वातावरणात यशस्वी आयोजन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष योगेंद्रजी गोडे यांच्या प्रेरणेने तथा सचिव तन्वी गोडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या राज्यस्तरीय शैक्षणिक परिषदेत हर्नियाच्या उपचारांमधील अत्याधुनिक तंत्रज्ञान, आधुनिक शस्त्रक्रिया पद्धती आणि कौशल्याधारित प्रशिक्षण यावर सखोल चर्चा करण्यात आली.

डॉ. राजेंद्र गोडे वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अमरावती येथील अत्याधुनिक ऑपरेशन थिएटर कॉम्प्लेक्समध्ये लाईव्ह ऑपरेटिव्ह वर्कशॉपचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत देशभरातील नामवंत शल्यचिकित्सकांनी हर्नियाच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया, आधुनिक लॅप्रोस्कोपिक (दुर्बिणीद्वारे) शस्त्रक्रिया,रुग्ण व्यवस्थापन तसेच हर्निया उपचारांतील नवीन संशोधनाचे थेट प्रात्यक्षिक सादर केले. अत्याधुनिक ऑपरेशन थिएटरमधून करण्यात आलेल्या थेट प्रक्षेपणामुळे सहभागी शल्यचिकित्सक, पदव्युत्तर विद्यार्थी आणि निवासी डॉक्टरांना शस्त्रक्रियेतील सूक्ष्म बारकावे प्रत्यक्ष पाहण्याची तसेच तज्ज्ञांशी संवाद साधून शंकांचे निरसन करण्याची संधी मिळाली

कार्यशाळेचे औपचारिक उद्घाटन MASI चे अध्यक्ष डॉ. आनंद कामत यांच्या हस्ते झाले. यावेळी असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडिया (ASI) चे इमिजिएट पास्ट प्रेसिडेंट डॉ. प्रवीण सूर्यवंशी, डॉ. राजेंद्र गोडे वैद्यकीय महाविद्यालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) डॉ. योगेश गोडे, ASI चे EC सदस्य व SEPA चे राष्ट्रीय प्रमुख डॉ. तरुण मित्तल, ASI चे



EC सदस्य डॉ. राजेंद्र शिंदे, MASI चे उपाध्यक्ष डॉ. विकास जैन, तसेच महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. सुधा जैन यांची प्रमुख उपस्थिती लाभली. महाराष्ट्रभरातील अनेक ज्येष्ठ प्राध्यापक व नामवंत शल्यचिकित्सकही या कार्यक्रमास उपस्थित होते.

या वैज्ञानिक परिषदेत विदर्भ, महाराष्ट्रातील विविध जिल्हे तसेच देशभरातील सुमारे १०० प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला. यामध्ये नामांकित शल्यचिकित्सक, वैद्यकीय तज्ज्ञ, प्राध्यापक, पदव्युत्तर विद्यार्थी आणि निवासी डॉक्टरांचा समावेश होता. कंटिन्यूइंग मेडिकल एज्युकेशन (CME) अंतर्गत चार व्हिडिओ-आधारित व्याख्याने, तज्ज्ञांचे पॅनेल चर्चासत्र, प्रश्नोत्तर सत्र, हर्नियाच्या आधुनिक निदान पद्धती, प्रगत शस्त्रक्रिया तंत्र, क्लिष्ट प्रकरणांचे व्यवस्थापन आणि नवीन संशोधन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या हर्निया कॉन्क्लेव्ह व SEPA उपक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे संस्थेचे अध्यक्ष योगेंद्र गोडे, सचिव मा. तन्वी गोडे मॅडम, उपाध्यक्षा मा. सोनालीताई गोडे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. योगेश गोडे, अधिष्ठाता डॉ. सुधा जैन, संचालक डॉ. सुनील हटकर तसेच उप-अधिष्ठाता डॉ. विनय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व लाभल्याचे आयोजकांनी नमूद केले.

या संपूर्ण परिषदेच्या यशस्वी आयोजनात शल्यचिकित्सा विभागाचे योगदान मोलाचे ठरले. डॉ. योगेश गोडे, डॉ. गिरीश जाटकर, डॉ. सीमा सुने, डॉ. जयश्री इंगोले आणि डॉ. आशिष डागवार यांनी संपूर्ण कार्यक्रमात मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच डॉ. अजिंक्य पुरी, डॉ. पंकज, डॉ. तेजस, डॉ. अर्पिता, तसेच कनिष्ठ निवासी डॉक्टर डॉ. प्रांजली, डॉ. सीमा, डॉ. अलिना आणि डॉ. मिहिर यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी असोसिएशन ऑफ सर्जन्स, अमरावतीचे अध्यक्ष डॉ. मुरलीधर बूब, सचिव डॉ. कौस्तुभ सरडा, आयोजन अध्यक्ष व ASI चे EC सदस्य डॉ. राजेंद्र गणेरीवाल, आयोजन सचिव डॉ. आशिष डागवार, तसेच असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य, प्राध्यापक, निवासी डॉक्टर आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ऑपरेशन थिएटर कर्मचारी, फ्लोअर स्टाफ, वॉर्ड स्टाफ तसेच सर्व सहाय्यक कर्मचाऱ्यांनी दिलेल्या समर्पित सेवेसाठी आयोजकांनी विशेष आभार व्यक्त केले.वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा उंचावणे, आधुनिक शस्त्रक्रिया तंत्रज्ञानाचा प्रसार करणे, व्यावसायिक उत्कृष्टतेला चालना देणे आणि रुग्णसेवेची गुणवत्ता अधिक प्रभावी बनविणे या दृष्टीने हा कॉन्क्लेव्ह अत्यंत यशस्वी ठरला.

## 'एटीएस'ची अकोल्यातही धडक
# शहजाद भट्टीच्या कथित नेटवर्कप्रकरणी ५ ते ६ ठिकाणी छापे

**पाच ते सहा जण चौकशीसाठी ताब्यात; आणखी काही संशयित एटीएसच्या रडारवर असल्याची माहिती**




**अकोला :** महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (ATS) शुक्रवारी राज्यभर राबविलेल्या समन्वित धडक कारवाईचा फटका अकोल्यालाही बसला. शहरातील विविध भागांतील सुमारे पाच ते सहा ठिकाणी एकाचवेळी छापेमारी करण्यात आली. या कारवाईत पाच ते सहा जणांना चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

ताब्यात घेण्यात आलेल्या व्यक्तींचा पाकिस्तानस्थित गँगस्टर शहजाद भट्टीच्या कथित सोशल मीडिया नेटवर्कशी संबंध असल्याचा प्राथमिक संशय तपास यंत्रणांना आहे. मात्र, या व्यक्तींचा नेमका सहभाग, संपर्काचे स्वरूप आणि त्यामागील उद्देश काय होता, याबाबतचा अंतिम निष्कर्ष सखोल चौकशी आणि तपासानंतरच स्पष्ट होणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.

एटीएसच्या पथकाने छापेमारीदरम्यान संबंधितांकडील मोबाईल फोन, लॅपटॉप आणि अन्य डिजिटल उपकरणांची तपासणी केल्याची माहिती समोर येत आहे. जप्त करण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांतील माहितीचे विश्लेषण करून सोशल मीडिया व्यवहार, डिजिटल संपर्क, आर्थिक देवाणघेवाण तसेच परदेशी नेटवर्कशी संबंधित बाबींची पडताळणी केली जात आहे.

विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, अकोल्यातील आणखी काही व्यक्ती एटीएसच्या चौकशीच्या रडारवर असून तपासाच्या पुढील टप्प्यात त्यांचीही चौकशी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे येत्या काही दिवसांत या प्रकरणात आणखी घडामोडी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, राज्यभर सकाळी सुमारे सात वाजल्यापासून मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, नांदेड, जळगाव, अकोला तसेच अन्य शहरांमध्ये एकाचवेळी छापेमारी करण्यात आल्याने मोठी खळबळ उडाली. या कारवाईत राज्यभरात १०० हून अधिक संशयितांची चौकशी सुरू असून त्यांच्या डिजिटल व्यवहारांसह परदेशी ☞(पान २ वर)

# ६७ कोटींच्या बडनेरा उड्डाणपुलाच्या लोकार्पणावर श्रेयवाद
## -खासदार व आमदाराचे नाव गाळून रवी राणांचा 'वन मॅन शो'?

-रेल्वेच्या अधिकृत पत्रिकेत खा. बळवंत वानखडे यांचे नाव
-रवी राणांच्या निमंत्रणातून खासदार व प्रवीण पोटे गायब, राजकीय वर्तुळात संताप




**अमरावती/प्रतिनिधीः-** मध्य रेल्वेच्या बडनेरा–अमरावती रेल्वे स्थानकांदरम्यान रेल्वे फाटक क्रमांक एस-०१, जुनीवस्ती, बडनेरा येथे सुमारे ६७ कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या चार लेनच्या रेल्वे उड्डाणपुलाचे लोकार्पण रविवार, (दि. १२) रोजी सकाळी ११ वाजता जुना जकात नाका चौक येथे होणार आहे. मात्र या लोकार्पणापूर्वीच श्रेयवादाच्या राजकारणाने जोर धरला असून आमदार रवी राणा यांच्या निमंत्रण पत्रिकेमुळे नवा वाद निर्माण झाला आहे.

मध्य रेल्वेने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत कार्यक्रम पत्रिकेत अमरावतीचे खासदार बळवंत वानखडे यांचे नाव स्पष्टपणे समाविष्ट आहे. मात्र आमदार रवी राणा यांनी प्रसिद्ध केलेल्या स्वतंत्र निमंत्रण पत्रिकेत खासदार बळवंत वानखडे तसेच विधान परिषदेचे आमदार प्रवीण पोटे-पाटील यांची नावेच वगळण्यात आल्याचा आरोप होत आहे.

विशेष म्हणजे, निमंत्रण पत्रिकेत स्थानिक नगरसेवकांची नावे मात्र ठळकपणे देण्यात आली आहेत. त्यामुळे जाणीवपूर्वक वरिष्ठ लोकप्रतिनिधींना डावलून संपूर्ण कार्यक्रमाचे श्रेय स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.राजकीय जाणकारांच्या मते, सरकारी विकासकामांचे श्रेय घेण्यासाठी लोकप्रतिनिधींमध्ये स्पर्धा असते; मात्र अधिकृत कार्यक्रमातील प्रमुख लोकप्रतिनिधींची नावेच गाळणे हे संसदीय परंपरेला आणि राजकीय शिष्टाचाराला धरून नसल्याची टीका होत आहे.

या निमंत्रण पत्रिकेमुळे रवी राणा प्रसिद्धीसाठी विकासकामांनाही राजकीय रंग देत आहेत का? ☞(पान २ वर)

# अचलपुरात बल्लू जवंजाळ यांच्या बॅनरवरील फोटोचे विद्रुपीकरण प्रकरण तापले

प्रहार-शिवसेना पक्षाचे पदाधिकारी आक्रमक

- सीसीटीव्ही कॅमेरामध्ये प्रकार कैद
- अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी



**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बच्चू कडू यांच्या वाढदिवसानिमित्त लावण्यात आलेल्या बॅनर वरील प्रहार जनशक्ती पक्षाचे महाराष्ट्र राज्याचे कार्याध्यक्ष तथा अचलपूर नगरपरिषदेचे माजी बांधकाम सभापती बदलू उर्फ महेंद्र जवंजाळ यांच्या फोटोला अज्ञात इस्मानी काळे फासल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या कृत्यामुळे शिवसेना-प्रहारच्या कार्यकर्त्यांमध्ये संताप व्यक्त होत असून याप्रकरणी अचलपूर पोलीस स्टेशनमध्ये असंख्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्या अज्ञात व्यक्तीविरुद्ध निवेदनाच्या माध्यमातून तक्रार दाखल केली आहे.या प्रकरणातील अज्ञात आरोपींविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.यावेळी प्रहार - शिवसेना पक्षाचे पदाधिकारी ,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि.५ जुलै २०२६ रोजी विधान परिषद सदस्य, प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक तथा शिवसेना नेते ☞(पान २ वर)

# चेक अनादर प्रकरणी आरोपीला २ लाख रुपये दंड व तीन महिन्याची शिक्षा

**पुसद/प्रतिनिधीः-** चेक अनादर प्रकरणी पुसद न्यायालयाने आरोपीला तीन महिन्याची शिक्षा सुनावली आहे सोबतच दंडाची रक्कम सुद्धा भरण्याचे आदेश दिले आहे. हा आदेश दि. ९ जुलै रोजी पुसद न्यायालयाच्या न्यायाधीशांनी दिला आहे.



सुनील वसंतराव डुब्बेवार रा. उदासी वार्ड असे शिक्षा झालेल्या आरोपीचे नाव आहे. चेक अनादर प्रकरणी पुसद न्यायालयामध्ये शंकर बाळूभाऊ पदमवार यांनी सदर प्रकरण न्याय प्रविष्ट केले होते. याबाबत सविस्तर माहिती अशी की, शंकर व सुनील यांचे मित्रत्वाचे संबंध होते. मित्रत्वाच्या संबंधाखातीर हात उसनवारी म्हणून शंकरला दोन लाख रुपये उसनवारीने दिले होते. त्या २ लाख रुपयांच्या मोबदल्यामध्ये इंडियन ओव्हरसीज बँकेचा चेक दिला होता. तो चेक बँकेमध्ये वटविण्याकरिता दिला असता चेक अनादरीत झाला होता. त्यानंतर आरोपीला वारंवार सुचना पत्र देऊन सुद्धा कुठल्याही प्रकारची दखल घेतली नाही, त्यानंतर सदर प्रकरण पुसदच्या न्यायालयातील न्याय दंडाधिकारी बिरहारी यांच्या न्यायालयात दाखल केले होते. त्या प्रकरणाचे पुरावे व अंतिम युक्तीवाद झाल्यानंतर शंकर यांच्या ☞(पान २ वर)

# ऑनलाइन चक्री जुगारावर गुन्हे शाखेचा छापा

पाच जण ताब्यात, १.६६ लाखांचा मुद्देमाल जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात सुरू असलेल्या ऑनलाइन चक्री जुगाराविरोधात अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट-२ ने शुक्रवारी धडक कारवाई करत यशोदा नगर क्रमांक १ येथील 'अरमान ट्रेडर्स' या दुकानावर छापा टाकला. या कारवाईत पाच जणांना ताब्यात घेण्यात आले असून रोख रक्कम, ऑनलाइन जुगाराचे साहित्य आणि मोबाईल असा एकूण १ लाख ६६ हजार ६१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये कलम ४ व ५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी ☞(पान २ वर)

# 'संवाद तरुणाईशी'तून तरुणांना मिळणार यशाचा मंत्र

## आयएएस तुकाराम मुंढे यांचे अमरावतीत प्रेरणादायी मार्गदर्शन

**१ ऑगस्ट रोजी होणार कार्यक्रम**

**अमरावती/प्रतिनिधीः-** प्रामाणिक, शिस्तप्रिय आणि जनाभिमुख प्रशासकीय अधिकारी म्हणून राज्यभर ओळख असलेले आयएएस तुकाराम मुंढे यांच्या मार्गदर्शनाखाली 'संवाद तरुणाईशी' या प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमाच्या प्रवेशिका आता उपलब्ध झाल्या आहेत. विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा देणारे उमेदवार, करिअरची दिशा शोधणारे युवक-युवती तसेच विविध क्षेत्रांत यश मिळविण्याची जिद्द असलेल्या तरुणांसाठी हा कार्यक्रम प्रेरणादायी ठरणार आहे.

हा कार्यक्रम शनिवार, १ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता स्वामी विवेकानंद सभागृह पोटे एज्युकेशन



इन्स्टिट्यूट पोटे इस्टेट कठोरा नाका अमरावती येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमादरम्यान तुकाराम मुंढे हे तरुणांशी थेट संवाद साधत स्पर्धा परीक्षा, करिअर नियोजन, प्रशासकीय सेवेतले अनुभव, नेतृत्वगुण, प्रामाणिकपणा, सकारात्मक विचार आणि यशाचा प्रवास या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच उपस्थितांच्या प्रश्नांनाही ते उत्तरे देणार आहेत.

कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी प्रवेशिका आवश्यक असून, इच्छुकांनी ८०१०४२६२१८ या क्रमांकावर सकाळी ११ ते सायंकाळी ६ या वेळेत संपर्क साधावा. प्रवेशिका अमरावती जिल्हा मराठी पत्रकार संघ, वालकट कंपाऊंड, अग्निशामक केंद्राजवळ, ☞(पान २ वर)

# बांधकामाधीन घरातील वायर चोरीचा गुन्हा उघड

आरोपी अटकेत, १.५८ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** त्रिमूर्ती विहार, नवसारी परिसरातील बांधकाम सुरू असलेल्या घरातून विद्युत वायर चोरी करणाऱ्या आरोपीला गाडगेनगर पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत जेरबंद केले. तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीचा शोध घेत त्याला ताब्यात घेण्यात आले असून, त्याच्याकडून चोरीतील तांब्याची तार आणि गुन्ह्यात वापरण्यात आलेली ऑटोरिक्षा असा एकूण १ लाख ५८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

त्रिमूर्ती नगर येथील विद्युत तांत्रिक कॉलनीत राहणारे रवि अर्जुन झाडे यांच्या नव्याने बांधकाम सुरू असलेल्या दोन मजली घरामध्ये विद्युत वायरिंगचे काम पूर्ण झाले होते. ४ ते ५ जुलैदरम्यान अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून सुमारे ७५ हजार रुपयांच्या इलेक्ट्रिक वायर लंपास केल्या. याप्रकरणी गाडगेनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर डीबी पथकाने तपासाची सूत्रे हाती घेतली.

तांत्रिक माहिती आणि गोपनीय सूत्रांच्या आधारे पोलिसांनी शेख अझरुद्दीन शेख कमरुद्दीन (वय २३, रा. गुलजार नगर, अमरावती) याची ओळख पटविली. राजपूत ढाबा चौक परिसरात तो ऑटोरिक्षातून फिरत असल्याची माहिती मिळताच सापळा रचून त्याला ताब्यात घेण्यात आले.☞(पान २ वर)

## दर्यापूर जिल्हा वकील संघ निवडणुक
# परिवर्तन पॅनलची एकहाती सत्ता, सर्वच उमेदवार विजयी



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर जिल्हा व सत्र न्यायालयाची निवडणूक आज १० जुलै रोजी न्यायालयिन परिसरात शांततेत पार पडली. या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे सर्वच सदस्य निवडून आले.

समता व परिवर्तन या दोन पॅनल मध्ये निवडणूक निवडणूक झाली. अध्यक्षपदाचे उमेदवार अॅड.प्रदीप शेळके, उपाध्यक्ष पदाचे अॅड.देवानंद पर्वतकर, सचिव पदाचे अॅड.अनुराधा गोमासे, सहसचिव पदाचे अॅड.लीना गहरवाल, कोषाध्यक्ष पदाचे अॅड.वैभव इंगळे.हे उमेदवार निवडून आलेत. तर सदस्यपदासाठीचे अॅड.उषा अग्रवाल , अॅड.दिघडे, अॅड.आम्रपाली चौरपगार, अॅड.रितेश गवई, हे आधीच अविरोध निवडून आले होते.

ज्येष्ठ विधिज्ञ संतोष धर्माधिकारी , अॅड.राजाभाऊ गोमासे, अॅड.जगदीश विल्हेकर, अॅड.जगदीश डालके, अॅड. दिलीप अग्रवाल ,अॅड.विद्यासागर वानखडे, अॅड.मुकुंद नळकांडे, अॅड.निशिकांत पाखरे, अॅड. नरेंद्र पवार, अॅड.सुमेन चक्रे, अॅड. नंदकिशोर रायकवार, अॅड. सदानंद जाधव, अॅड.उमाकांत रामेकर, अॅड.आदित्य धर्माधिकारी, अॅड.सुजाता सिरसाट, अॅड.अनुप गोमासे ,अॅड.हर्षवर्धन कोलखेडे, अॅड.स्वप्निल बारब्दे, अॅड. धम्मपाल वाघमारे, अॅड.सचिन आठवले, अॅड.संतोष निकोरे, अॅड.रोशन ठाकूर, अॅड.अंकिता गहलोद,अॅड.सविता चव्हाण, अॅड.सुनिल☞(पान २ वर)

# जिल्ह्यातील उद्योगांना अखंडित वीज पुरवठा करण्याचे जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांचे निर्देश

**जिल्हा उद्योग मित्र व जिल्हा निर्यात प्रचलन समितीची बैठक संपन्न**

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील उद्योजकांच्या शासकीय विभागाशी संबंधित अडीअडचणी दूर करून औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली व खासदार डॉ. अनिल बोंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा उद्योग मित्र समिती तसेच जिल्हा निर्यात प्रचलन समितीची संयुक्त सभा महसूल भवन येथे नुकतीच संपन्न झाली.

नांदगाव पेठ, सातुर्णा व अमरावती एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रात खंडित वीज पुरवठ्यामुळे उद्योगांचे आर्थिक नुकसान होत असल्याची तक्रार औद्योगिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी बैठकीत केली. या समस्येची गंभीर दखल घेत, जिल्हाधिकारी आशिष येरेकर व खासदार अनिल बोंडे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना पुढील एक महिन्यात निश्चित केलेल्या कृती आराखड्यानुसार काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले. यामध्ये ३३ केव्हीए बडनेरा सबस्टेशनच्या जागेचा प्रस्ताव, नवीन फीडर तसेच पॉवरहाऊस केबलचे काम तातडीने पूर्ण करून सर्व उद्योगांना अखंडित वीज पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच 'सियाराम' उद्योग घटकाचा वीज पुरवठा दुसऱ्या फीडरवर त्वरित स्थलांतरित ☞(पान २ वर)

# १३ जुलै रोजी, विभागीय महिला लोकशाही दिन

**अमरावती :** येत्या सोमवारी दि. १३ जुलै रोजी, विभागीय आयुक्त कार्यालयात सकाळी ११ वाजता विभागीय महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे, असे, महिला व बालविकास विभागीय उपआयुक्त ए. आर. चौधरी यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्तस्तरावर, तिसऱ्या सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालय तर दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तालुकास्तरावर तहसील कार्यालय या ठिकाणी माहिला लोकशाही दिन आयोजित करण्यात येतो.

तरी समस्याग्रस्त व पिडीत महिलांनी या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असेही महिला व बाल विकास विभागाद्वारे कळविण्यात आले आहे.

# 'भाजपात या, मगच जिम वापरा ?'
## चांदूरवाडीत उपसरपंचाचे फर्मान, राजकीय भेदभावाचा गंभीर आरोप

**'सार्वजनिक जिमवर राजकीय अट ? ग्रामस्थांचा उपसरपंचाविरोधात एल्गार'**



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** 'भाजपात या, मगच जिम वापरा', अन्यथा समाजमंदिरातील सार्वजनिक जिममध्ये प्रवेश नाही, असे उपसरपंचाने म्हटल्याचा गंभीर आरोप करत चांदूर रेल्वे तालुक्यातील मौजा चांदूरवाडी येथील काही ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासन आणि पंचायत समितीकडे धाव घेतली आहे. सार्वजनिक निधीतून उभारण्यात आलेल्या समाजमंदिरातील जिमचा वापर राजकीय विचारांच्या आधारावर रोखला जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला असून, या प्रकारामुळे गावातील वातावरण बिघडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

ग्रामस्थांनी ग्रामपंचायत सचिव तसेच चांदूर रेल्वे पंचायत ☞(पान २ वर)

**गावकऱ्यांच्या सुविधेसाठी पाठपुरावा करून जिम आणली - उपसरपंच**

पाठपुरावा करून गावातील समाजमंदिरात जिम उपलब्ध करून दिली आहे. ही जिम कोणत्याही एका गटासाठी किंवा पक्षासाठी नसून संपूर्ण गावातील सर्व नागरिकांसाठी खुली राहणार आहे. जिमच्या देखभाल व दुरुस्तीचा खर्च भागविण्यासाठी नाममात्र शुल्क आकारण्याचा विचार असून, त्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येणार आहे. जिम सोमवारपासून नियमित सुरू करण्याचा विचार आहे. निवेदनात करण्यात आलेला 'भाजपात या, त्यानंतरच तुमच्या मुलांना जिमचा वापर करू देणार,' असा आरोप पूर्णपणे खोटा आणि बिनबुडाचा असल्याचे उपसरपंच अब्दुल शहजाद उर्फ सोनू यांनी स्पष्ट केले.

# अमरावतीच्या 'आयुष' रुग्णालयाच्या प्रस्तावाला मंजुरी द्या
## -खा.डॉ.अनिल बोंडेंची केंद्रीय सचिवांकडे मागणी

**अमरावतीः** जिल्ह्यात ५० खाटांचे भव्य 'आयुष' (AYUSH) रुग्णालय उभारण्याच्या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रालयाने तातडीने मंजुरी द्यावी, या मुख्य मागणीसाठी भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी दिल्लीत केंद्रीय आयुष मंत्रालयाचे सचिव वैद्य राजेश कोटेचा यांची भेट घेतली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आणण्यासाठी खासदारांनी या भेटीदरम्यान विशेष पाठपुरावा केला.



अमरावती आणि परिसरातील नागरिकांना आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी आणि निसर्गोपचार यांसारख्या पारंपरिक ☞(पान २ वर)

# अचलपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय होणार
## -मेळघाटात मिनीबस व सेमाडोह येथे बस डेपोचाही मार्ग मोकळा

**आमदार बच्चू कडूंच्या पाठपुराव्याला यश**

**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाटातील वाहतूक व्यवस्था, दिव्यांग बांधवांच्या एस.टी. सवलती, यू-डीआयडी (U-DID) प्रक्रियेतील अडचणी, ई-बस प्रवास सवलत, बसस्थानकांच्या सुविधा तसेच अचलपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सुरू करण्याच्या दीर्घकालीन मागणीवर माजी मंत्री तथा आमदार बच्चू कडू यांनी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासमवेत मंत्रालयात निर्णायक बैठक घेतली. या बैठकीत परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत मांडलेल्या



मागण्यांवर मंत्री प्रताप सरनाईक यांनी सकारात्मक भूमिका घेत आवश्यक कार्यवाही सुरू करण्याचे आश्वासन दिल्याने अचलपूरसह संपूर्ण मेळघाटासाठी मोठा दिलासा मिळाला आहे.

अचलपूर येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय व्हावे, ही मागणी बच्चू कडू अनेक वर्षांपासून सातत्याने लावून धरत आहेत. भविष्यातील जिल्हा म्हणून वेगाने विकसित होत असलेल्या अचलपूरला स्वतंत्र परिवहन कार्यालयाची नितांत गरज असल्याचे त्यांनी बैठकीत ठामपणे मांडले. अचलपूर येथे कार्यालय सुरू झाल्यास अचलपूर, अंजनगाव सुर्जी, दर्यापूर, ☞(पान २ वर)

# खुनाच्या प्रयत्नातील फरार मुख्य आरोपी अखेर जेरबंद
## आश्रय देणाऱ्या काका-आतेभावालाही अटक

**गुंगारा देणारा आरोपी परतवाड्यातून ताब्यात**

**अमरावती/प्रतिनिधीः-** खुनाच्या प्रयत्नाच्या गंभीर गुन्ह्यातील आठ दिवसांपासून फरार असलेल्या मुख्य आरोपीला राजापेठ पोलिसांनी परतवाड्यातून अटक करण्यात यश मिळविले. विशेष म्हणजे, आरोपीला पोलिसांपासून लपून राहण्यासाठी मदत केल्याप्रकरणी त्याच्या काका आणि आतेभावालाही अटक करण्यात



आली असून तिघांविरुद्ध पुढील कायदेशीर ☞(पान २ वर)